ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय सौर अधिक आषाढ-भाद्रपद १९३७

जुलै-सप्टेंबर २०१५ / खंड ३९ अंक २



[illegible] महिला [illegible]

[illegible] ग्रामीण विकासाचा नवा मार्ग

[illegible] महिला बँकेची वाटचाल

[illegible] र उद्योग : सद्यस्थिती

[illegible] आंदोलन

[illegible]

[illegible] अभ्यास

सामाजि[illegible] योजना - [illegible] निर्णय

भारतीय [illegible]माल निर्याती[illegible] अभ्यास

जलनियोजन, जलसाक्षरता काळाची गरज

महाराष्ट्रातील रो.ह.योजना व फळझाड लागवड

मागास, दुर्बल समाज व शासनाची भूमिका

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

जुलै-सप्टेंबर २०१५ / खंड ३९ अंक २

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**
अविनाश रामलाल निकम

**सहाय्यक संपादक**
शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**
(२०१५-१८)
तेजस्विनी मुडेकर
अरूण पिसे
राजेंद्र गव्हाळे
विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**
**डॉ.अविनाश निकम**
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

## अनुक्रमणिका

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद: चिनी अर्थव्यवस्थेचं अर्थसंकट..........११५
पांडुरंग महादेव कडुकर, मुंबई
समतावादी समाजनिर्मितीत कामगार चळवळीचे योगदान....११७
विश्वजित कदम, नाशिक
ग्रीक शोकांतिका..........................................१२५
सुभाष पाटील, पुणे
आर्थिक सुधारणा आणि कृषि क्षेत्राची कामगिरी............१३७
तेजस्विनी बी. मुडेकर, कोल्हापूर
महाराष्ट्रातील महिला विकास: एक दृष्टिक्षेप.................१४३
संतोष कदम, मंद्रुप
कृषि पर्यटन: ग्रामीण विकासाचा नवा मार्ग.................१५३
हरिभाऊ नरसिंग गिलबिले, भूम
भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल............१५८
शंकर सुदामराव पवार, शहादा
महाराष्ट्रातील साखर उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य........१६२
अविनाश कुलकर्णी, नवी दिल्ली
महाराष्ट्रातील गिरणी कामगारांचे आंदोलन..................१६९
सुरेश रा. जगताप,अमरावती
अमरावती जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या: अध्ययन.......१७६
रसुल गफुर कोरबू, कोल्हापूर
विश्वासाचे विज्ञान आणि विकास.........................१८४
उदय श्रीकृष्ण काळे, मेहकर
सामाजिक सुरक्षा योजना:केंद्राचा धोरणात्मक निर्णय........१९०
धर्मा रानबा धेडे, वारणानगर
भारतीय शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास.............१९४
दादाजी रघुनाथ बच्छाव, नाशिक
जलनियोजन, जलसाक्षरता ही काळाची गरज..............१९९
बाजीराव ज्ञानू इंगवले, वैभववाडी
महाराष्ट्रातील रो.ह.योजना आणि फळझाड लागवड.........२०४
नारायण चिंतामण पाटील, लासूर
मागास, दुर्बल समाज आणि शासनाची भूमिका.............२०९
उत्तम दे. वाकोडकर, अंबाजोगाई
पुस्तक परिचय: मानवी अर्थशास्त्र..........................२१८
ज.फा.पाटील,कोल्हापूर, अर्थ शब्दांची वाट पाहे:ओढ.....२२२

**मराठी अर्थशास्त्र परिषद**

**कार्यकारी मंडळ २०१५-१६**

**अध्यक्ष**

सुहास धोंडिबा आव्हाड (संगमनेर)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

आर. बी. भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

मुक्ता जहागिरदार (अमरावती)
अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)

**सदस्य**

राहुल म्होपरे (कोल्हापूर)
संजय तुपे (नाशिक)
बालाजी सुरवसे (फोंडा)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नन्नवरे (अकलुज)
सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिलीप पाटील (नंदुरबार)
आर. के. दातीर (नाशिक)
रामभाऊ खाडे (बारामती)

**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: आर. बी.भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली यांच्याकडून रु.१,५०,०००/- रक्कम २०१४-१५ या वर्षासाठी मिळाली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

**अक्षर रचना-** सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.

**मुद्रणालय-** सातपुडा ऑफसेट, जळगाव.

# संपादकीय संवाद...

## चिनी अर्थव्यवस्थेचं अर्थसंकट

जागतिकीकरणाच्या युगात प्रत्येक मोठ्या अर्थव्यवस्थेचं कसं चाललं आहे हा आर्थिक घडामोडीच्या विश्लेषकांचा जिव्हाळ्याचा विषय असतो. हे असण्याचं कारणही तसंच आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारात फारसा सहभाग न घेणारी एखादी लहान अर्थव्यवस्था असेल तर अशा अर्थव्यवस्थेत थोडेफार आर्थिक चढउतार झाले तरी त्या घडामोडींचे पडसाद जागतिक बाजारावर उमटत नाहीत. म्हणून अशा घडामोडींकडे विश्लेषकांचे लक्ष पटकन वेधलं जात नाही. अनेक देश अशा घटनांकडे गांभीर्यानं पहात नाहीत. मात्र चीनसारख्या विस्तारलेल्या अर्थव्यवस्थेत एखादी लहानात लहान आर्थिक घटना घडली तरी ती आंतरराष्ट्रीय स्तरावरील ब्रेकिंग न्यूज होत असते. पण ही वर्तमानकालीन घटना मोठी आहे. २०१५ मधील जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात आर्थिक जगताचं लक्ष चिनी अर्थव्यवस्थेच्या दिशेनं वेधलं गेलं. त्याचं कारणही तसंच आहे. चिनी शेअर बाजार अनपेक्षितपणे तब्बल ३२ टक्क्यांनी कोसळला. अन् याचे पडसाद जगभरातील शेअर बाजारात उमटले. परिणामी जगात खजिन तेलाचे दर घसरले. हे सगळं होऊन अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याच्या भीतीनं चीन सरकारने त्या आधी दहा-पंधरा दिवसांपासून शेअर बाजारातील पडझड रोखण्यासाठी हस्तक्षेप केला. या हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून ही पडझड रोखली जाण्याऐवजी परिस्थिती अधिकच बिकट होत असल्याचं चित्र दिसत आहे. चिनी अर्थव्यवस्थेतीत शेन्झेन कॉम्पोझिट अन् शांघाय कॉम्पोझिट या दोन प्रमुख निर्देशांकातील जवळपास १४५० पेक्षा अधिक कंपन्यांच्या रोख्यांचे व्यवहार ठप्प राहिले. शेअर बाजारातील मोठ्या घसरणीमुळे चिनी अर्थव्यवस्थेवर निश्चितच विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. या पडझडीत तेथील सामान्य गुंतवणूकदारांचे सुमारे ३.४ ट्रिलीयन डॉलर्स इतकं प्रचंड नुकसान झालं आहे. सामान्य गुंतवणूकदार या अनपेक्षित घटनेनं हादरला आहे. चीनमधील १४.५ टक्के लोक शेअर बाजारात गुंतवणूकदार आहेत, हे विशेष. साहजिकच शेअर बाजाराकडे वळताना हे गुंतवणूकदार यापुढे सावधतेनं पावलं टाकतील. सामान्य गुंतवणूकदारांचं शेअर बाजारात जितकं आर्थिक नुकसान झालं आहे तितक्याच प्रमाणात या वर्गाची खरेदी शक्ती घटली आहे. त्याचा परिणाम म्हणून ग्राहक बाजारपेठेत निराशेचं वातावरण निर्माण होण्यास सुरूवात झाली. तर दुसऱ्या बाजूनं कंपन्यांची विक्री अन् नफ्यावर विपरीत परिणाम होण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. सामान्य गुंतवणूकदारांची बँक कर्जेपरतफेड करण्याची क्षमता घटली आहे. याचा परिणाम म्हणून चिनी अर्थव्यवस्था घसरणीला लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही वस्तुस्थिती पाहता तेथील सरकार खडबडून जागं झालं आहे. चिनी शेअर बाजारातील अलिकडच्या पडझडीत सामान्य गुंतवणूकदाराचं प्रचंड आर्थिक नुकसान पाहता चिनी सरकारनं शॉर्ट सिलिंगवर बंदी आणली आहे. सामान्यपणे १५०० कंपन्यांच्या शेअर्स व्यवहारावर बंदी घातली आहे. अनेक कंपन्यांमधील मोठा हिस्सा असलेल्या गुंतवणूकदारांना शेअर्स विक्री करण्यावर बंदी घातली आहे. या सर्व घडामोडी पाहता इंग्लंड मधील नॉटिंगहॅम युनिर्व्हसिटीतील अर्थतज्ज्ञ मायकेल गेरासी यांनी चिनी शेअर बाजाराचा कॅसिनो असा उल्लेख केला.

शिवाय चीनमधील सामान्य गुंतवणूकदारांनी यातून धडा घ्यावा, असा सल्ला दिला आहे. सामान्य गुंतवणूकदारांना चिनी शेअर बाजारातील तेजी-मंदीच्या लाटा त्सुनामी लाटांसारख्या वाटल्या. या लाटांनी त्यांचं खूप काही हिरावून नेलं आहे. परंतु वेगानं तेजीकडे झेपावणाऱ्या शेअर बाजारानं अचानक आपटी का खाल्ली हे पहावं लागेल.....

चीनची अर्थव्यवस्था ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था मानली जाते. भरभराटीस आलेली विस्तृत शहरं, गजबजलेल्या बाजारपेठा, बँका-कंपन्यांचे मोठ्या संख्येने अस्तित्व, भव्य मॉल्स्, आकर्षक पर्यटन स्थळे हे येथील वैशिष्ट आहेत. हा देश कच्चे खनिज तेल, धातू व काही वस्तुंचा प्रमुख आयातदार आहे. शिवाय निर्यातीत वेगानं वाढ करण्यात यशस्वी ठरलेला जगातील एक प्रमुख निर्यातदारही आहे. चीनने आयात-निर्यातीत बदल केल्यास त्याचा आंतरराष्ट्रीय बाजारावर निश्चितच परिणाम होतो. चीनमधील बँका बचत ठेवींवर केवळ तीन-साडेतीन टक्के व्याज देतात. हे पाहता तेथील नागरिकांना रियल इस्टेटमध्ये गुंतवणूकीचा उत्तम पर्याय उपलब्ध होता. परंतु रियल इस्टेट क्षेत्रात सरकारने कडक कायद्याद्वारे नियंत्रण आणल्यानं गुंतवणूकदारांना या क्षेत्रात गुंतवणुकीची दारं जवळ जवळ बंद झाली. हे पाहून चिनी व्यापारी बँकांनी रियल इस्टेट मार्केटमध्ये गुंतवणूक करण्यास बँक ग्राहकांसाठी पर्याय उपलब्ध करून दिला. परिणामी गुंतवणूकदारांना परतावा देखील चांगल्यापैकी मिळू लागला. परंतु एक वर्षापूर्वी चिनी अर्थव्यवस्थेची स्थिती बदलली. विकासदर घटला. चीनचा विकासदर जानेवारी २०१४ (७.९%) पासून जुलै २०१५ (७.१%) पर्यंत क्रमश: घटता राहिला. अनेक क्षेत्रांमध्ये घसरणीला सुरुवात झाली. रियल इस्टेट मार्केट यातून सुटलं नाही. व्यापारी बँका आपल्या गुंतवणूकदारांना उत्तम परतावा देण्यात असफल ठरल्या. बँका संकटात सापडल्या तेव्हा सरकारनं बँकांना तात्पुरती मदत करून कसं तरी वाचवलं. बँका सावरल्या. अन् बँकांनी फायद्याच्या अपेक्षेनं शेअर बाजाराकडे धाव घेतली. चिनी नागरिकांनी बँकात चांगल्या परताव्याच्या अपेक्षेनं गुंतवणूक वाढवली. चीनच्या शेअरबाजाराचा निर्देशांक सुधारला. चिनी बँका शेअर बाजारातील परतावा बघून उत्साहित झाल्या. वायदे बाजार व्यवहारात फारच तेजीत आले. खरा प्रॉब्लेम झाला तो इथंच. या तेजीच्या वादळात अनेक मोठ्या व स्मार्ट गुंतवणूकदारांनी संधीचं सोनं करण्याच्या इराद्यानं शेअर्स विक्रीचा वेग वाढवला. परिणामी सामान्य गुंतवणूकदारात घबराट पसरली. त्यांनी देखील शेअर विक्रीची प्रचंड लाट त्या पाठोपाठ आणली अन् शेअर बाजाराला घसरणीचा मोठा तडाखा बसला. फायद्याच्या हेतूनं शेअर बाजारात झालेल्या व्यवहारांच्या अतिरेकाचा हा परिणाम आहे. कुठलाही अतिरेक वाईटच. शेअर बाजारातील ही स्थिती सुधारण्यासाठी चिनी सरकारनं आज पुढाकार घेतला आहे. असं असलं तरी तात्पुरती उपाययोजना तर करून भागणार नाही, सरकारनं चिनी अर्थव्यवस्थेची घसरण रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणं गरजेचं आहे.

स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य. डॉ.चंद्रशेखर मुरुमकर, उपप्राचार्य डॉ. एम.के.कोकरे, स्थानिक कार्यवाह डॉ.रामभाऊ खाडे यांनी अर्थसंवादसाठी जाहिरात उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

अर्थसंवादच्या या अंकास शोधनिबंध पाठविलेल्या सर्व लेखकांचे आभार मानतो. या अंकास वाचक स्वीकारतील अशी अपेक्षा आहे.

अविनाश रामलाल निकम,
प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# समतावादी समाजनिर्मितीमध्ये भारतीय कामगार चळवळीचे योगदान

**पांडुरंग महादेव कडुकर, मुंबई,**
कै. नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र
श्रम विज्ञान संस्था (महाराष्ट्र शासन),
डी. सी. मार्ग, परळ - ४०० ०१२.
भ्रमणध्वनी : ९३७१६०४६९४

सुमारे १५० वर्षापूर्वी भारतामध्ये औद्यौगिकरणाचे वारे वाहू लागले आणि भांडवलदारांनी आपले कारखाने उभारण्यास सुरुवात केली. कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी गरीब, कष्टकरी बहुजन समाज पुढे येऊ लागला. मुंबई, मद्रास, कोलकाता सारखी शहरे उद्योगांची केंद्रे होऊ लागली. त्याकाळी कापड उद्योग मोठ्या प्रमाणात सुरु झाला. सन १८५६ मध्ये पहिली कापडगिरणी मुंबईत एका पारशी भांडवलदाराने सुरु केली. पुढे ही संख्या वाढत जाऊन एकट्या मुंबईत गिरण्यांची संख्या ६२ वर जाऊन पोहोचली आणि कामगारांची संख्या अडीच लाखांवर पोहोचली, परंतु अधिकाधिक नफा मिळविण्याच्या भूमिकेतून भांडवलदारांकडून कामगारांचे शोषण होऊ लागले. तुटपुंज्या पगारावर कामगारांना १२ ते १५ तास काम करावे लागत असे. तो पगारही वेळेवर मिळत नसे, ना आठवड्याची सुट्टी, ना जेवणाची सुट्टी, ना कामाची वेळ निश्चित, एवढेच काय कामावर असताना अपघात झाला, मृत्यू आला तरीदेखील त्याची भरपाई नाही. या अवस्थेत कामगारांची प्रचंड घुसमट आणि आर्थिक, शारीरिक शोषण होत असे. या शोषणातूनच संघर्षाची ठिणगी पडली आणि त्याची सुरुवात कामगारांमधुनच एक क्रांतिकारक नेता जन्माला आला ज्यांनी शोषणाविरुद्ध पहिला आवाज उठविला आणि आज भारतातील कामगार चळवळीचे जनक म्हणून संबोधले जातात ते रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी खऱ्या अर्थाने कामगार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनसामग्रीवर आधारित असून समतावादी समाजनिर्मितीमध्ये भारतीय कामगार चळवळीचे योगदान काय आहे याचा

आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## कामगार चळवळ-ऐतिहासिक पार्श्वभूमी:

गोरगरीब, कष्टकरी कामगार वर्गामध्ये जागृती करुन समतावादी समाजनिर्मितीसाठी निस्वार्थी व त्यागी वृत्तीने प्रयत्न करुन नारायण मेघाजी लोखंडे यांनी तत्कालिन परिस्थितीत जो लढा उभारला तो देशातील कामगार वर्गाच्या लढ्याचा पहिला यशस्वी प्रयोग मानला जातो. कारण आजच्या संपूर्ण कामगार वर्गाला मिळत असलेल्या कामगार कल्याणाच्या व सामाजिक सुरक्षिततेच्या सोयी सवलतीचे श्रेय हे लोखंडेनी उभ्या केलेल्या कामगार लढ्यालाच द्यावे लागेल. १८८४ मध्ये बॉम्बे मिल हँडस असोसिएशन ही भारतातील पहिली कामगार संघटना लोखंडेनी कष्टकरी कामगार वर्गाला एकत्र करुन स्थापन केली. समग्र कामगार वर्गाच्या दृष्टीने नव समाज निर्मितीसाठी उचललेले ते पहिले क्रांतिकारक पाऊल मानले जाते. १८८१ च्या फॅक्टरी ॲक्ट मध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटीश सरकारच्या विरोधात लढा सुरु केला. या लढ्याची पहिली ऐतिहासिक सभा मुंबई परळ येथे २३ सप्टेंबर १८८४ रोजी चार हजार कामगारांच्या उपस्थितीत, त्यानंतर भायखळा रेसकोर्स मैदान या ठिकाणी दहा हजार कामगारांच्या उपस्थितीत ब्रिटीश सरकार व भांडवलदारांच्या विरोधात आंदोलन उभे केले. या घटनेला अनेक बाजुंनी महत्व होते. कारण ही घटना म्हणजे कामगार चळवळीने समतावादी समाज जागृतीचा एक महत्वाचा टप्पा पूर्ण केल्याचे ते प्रतिक होते. या ऐतिहासिक लढ्याचे फलित म्हणजे १८९१ मध्ये नवा फॅक्टरी ॲक्ट मंजुर केला व त्यामध्ये रविवारची सुट्टी, अर्धा तास जेवणाची सुट्टी, कामाची वेळ निश्चिती, पगाराची तारीख निश्चिती तसेच कामावर असताना अपघात अथवा मृत्यु आल्यास नुकसान भरपाई या महत्वाच्या मागण्या मान्य झाल्या. एकूणच त्यांनी सुरु केलेली कामगार चळवळ ही विषमतेविरुद्ध आणि शोषणमुक्त समाजासाठी होती. *दीनबंधु* या आपल्या मुखपत्रातून सामाजिक विषमता, शुद्रातिशुद्रांसाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये संधी यासारख्या अनेक सामाजिक विषयांवर अत्यंत निर्भिड आणि परखड मते मांडून दीनबंधुला समाजातल्या सर्वंकष बदलाचे माध्यम बनवले, हिंदु-मुस्लिमांमध्ये जातीय दंगलीच्या प्रसंगी कामगार वर्गामध्ये विश्वास संपादन करुन एकोप्याचे दर्शन घडवुन आणले. त्यासाठी ब्रिटीश सरकारने रावबहादूर ही सनद बहाल करुन त्यांचा सन्मान केला. एकूणच लोखंडेंची चळवळ ही सामाजिक परिवर्तनाची चळवळ होती. विषमता कमी करुन समता प्रस्थापित व्हावी यासाठी तत्कालिन परिस्थितीत सुरु केलेल्या चळवळीने पुढे व्यापक स्वरुप प्राप्त केले.

## समतावादी समाजनिर्मितीमध्ये कामगार चळवळीचे योगदान:

नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगार कष्टकरी वर्गाला सोबत घेऊन चालू केलेला लढा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बी. पी. वाडीया, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, अशोक मेहता, एस. ए. डांगे, ना. म. जोशी, आर. ए. खडकीकर, गं. द. आंबेकर, लाला लजपतराय यासारख्या अनेक दिग्गज नेत्यांनी समर्थपणे चालविला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये

सुद्धा कामगार चळवळीचे योगदान हे महत्त्वपूर्ण आहे. देशातील सर्वच कामगार संघटनांना एकत्र आणून देशव्यापी पहिली ऑल इंडिया कॉन्फरन्स मुंबईत आयोजित केली, त्याचे अध्यक्ष स्वातंत्र्य चळवळीतील खंदे पुढारी लाला लजपतराय होते. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (एआयटीयुसी) ही राष्ट्रीय स्तरावरची पहिली कामगार संघटना १९२० मध्ये स्थापन केली. यामध्ये समाजवादी विचारधारेचे, साम्यवादी तत्वज्ञान मानणारे, गांधीवादी विचारसरणीचे आणि स्वतंत्र विचारसरणीचे अशा सगळ्याच विचारधारा एकत्र येऊन देशव्यापी चळवळ सुरु केली. स्वातंत्र्य लढ्यामध्ये या सर्वांनी स्वतःला झोकून दिले. स्वातंत्र्याची चळवळ नेटाने पुढे नेण्यामध्ये कामगार चळवळीची साथ शेवटपर्यंत राहिली.

राजकीय नेते व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब एक आदर्श कामगार पुढारी होते, समतावादी समाज निर्मितीसाठी कामगार चळवळीच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्यही उल्लेखनीय आहे हे कोणालाच नाकारता येणार नाही. देशातील कामगार, कष्टकरी, गरीब बहुजन समाजाचे प्रश्न मांडण्यासाठी आणि त्यांची शोषणातून मुक्तता व्हावी यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. भारतातील कामगार वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ते कामगार कायदे झाले पाहिजे यासाठी त्यांनी या पक्षाच्या माध्यमातून आपली भूमिका आग्रहीपणे सातत्याने मांडली. फेब्रुवारी १९३८ मध्ये अस्पृश्य रेल्वे कामगारांची मोठी संघटना निर्माण करण्यासाठी जाहीर परिषद मनमाड या ठिकाणी बोलाविली. या परिषदेला प्रचंड प्रतिसाद मिळाला. सुमारे वीस हजार अस्पृश्य रेल्वे कामगारांनी या परिषदेमध्ये सहभाग घेतला. साम्राज्यशाहीप्रमाणे भांडवलशाहीशीही लढण्याची तयारी या क्षणापासून आपण केली पाहिजे असा इशारा कामगारांना त्यांनी दिला, पण पुढे ते म्हणतात केवळ कामगार संघटनेच्या बळावर मालकांच्या विरोधात कामगार वर्ग विजयी होऊ शकत नाही त्यासाठी कामगार संघटनांनीही राजकारणात शिरलेच पाहिजे कारण शासन सत्तेशिवाय कामगारांच्या हिताचे रक्षण करणे अशक्य आहे इतकेच नव्हे तर किमान मजुरीचे दर, कामाच्या वेळा व अन्य नियम इत्यादी मूलभूत स्वरुपाच्या सुधारणा केवळ संघटनेच्या जोरावर घडवून आणणे अशक्य आहे. म्हणून त्यासाठी कायद्याच्या शक्तीची जोड मिळायलाच पाहिजे आणि देशाच्या राजकारणात भाग घेतल्याशिवाय हे शक्य नाही असे स्पष्ट करुन ही परिषद तर यशस्वी केलीच पण त्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघटन कौशल्याने ऐक्य निर्माण होऊन भारतीय कामगार चळवळीतील एक वेगळी ओळख निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विधी मंडळामध्ये समतावादी समाजनिर्मितीला पुरक अशा धोरणांना प्राधान्य देऊन संघाच्या अधिकारांवर बंदी घालणाऱ्या विधेयकाला कडाडून विरोध केला होता. त्यांनी विधीमंडळामध्ये केलेल्या अनेक भाषणांमध्ये कामगार वर्गाच्या हिताच्या दृष्टीने अनेक सूचना सरकारला केल्या. कोणत्याही उद्योगास मिळणारा नफा हा फक्त भांडवलावर नाही तर श्रमिकांच्या घामावर अवलंबुन असतो, त्यामुळे

होणाऱ्या नफ्यातील हिस्सा कामगारांनाही मिळाला पाहिजे अशी मागणी केली होती. समान कामाबाबत समान वेतन, लहान बालकांना उद्योगामध्ये काम करण्यास बंदी, प्रसुतीविषयक लाभ, कामगारांना सामाजिक सुरक्षितता या सर्व गोष्टींना प्राधान्य देऊन कामगार वर्गाला समतावादी समाजरचनेच्या प्रवाहात आणण्यासाठी जी चळवळ उभी केली त्याचेच फलित आज काही प्रमाणात का असेना पण कामगार वर्गाला मिळत आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक आदर्श समाजनिर्मितीच्या बांधणीतील एक महत्वाचा आधारस्तंभ होते हे कोणालाच नाकारता येणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बरोबरच महात्मा गांधीजींचाही देशातील कामगार चळवळीमधील एक कामगार नेता म्हणून प्रभाव होता. महात्मा गांधीजींनी मजुर महाजन या कामगार संघटनेची स्थापना अहमदाबाद शहरातील गिरणी कामगारांच्या सहकार्याने केली. त्यांनी सुरु केलेल्या स्वदेशी चळवळीला कामगार वर्गाकडून अत्यंत चांगले सहकार्य मिळाले. विदेशी मालावर बहिष्कार घालण्याच्या चळवळीत विदेशी माल घेऊन जाणाऱ्या रेल्वेखाली झोकुन देऊन हुतात्मा झालेला माथाडी कामगारच होता. ब्रिटीश सरकारने लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली शिक्षा केली तेव्हा मुंबईतील लाखो गिरणी कामगारांनी उस्फुर्तपणे सलग सहा दिवस सार्वत्रिक संप करुन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

कामगार चळवळीच्या दबावामुळेच १९२३ मध्ये कामगार संघटना कायदा मंजूर करण्यात आला आणि तेव्हापासून कामगार संघटनांना कायदेशीर मान्यता मिळाली. पुढे कामगार वर्गाच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी *रॉयल कमिशन ऑन लेबर*ची स्थापना केली. दुसऱ्या महायुद्धानंतर महागाई भत्त्यासाठी मुंबईतील गिरणी कामगारांनी सलग ६५ दिवस संप केला आणि सरकारने महागाई भत्ता देण्याचे मान्य केले. खरंतर तेव्हापासूनच महागाई भत्ता देण्याची पद्धत संपूर्ण देशामध्ये सुरु झाली. कामगार वर्गाचे जीवनमान उंचावुन स्थिर होण्यासाठी व सामाजिक, आर्थिक समता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीकोनातून कामगार चळवळीला एक आगळे वेगळे महत्व प्राप्त झाले. कामगार चळवळीची ताकद, अधिकाधीक वाढत गेली आणि त्याची नोंद सरकारला घ्यावी लागली. कामगार वर्गाच्या संरक्षणासाठी, सामाजिक कल्याणासाठी अनेक कायदे करणे सरकारला भाग पाडले यामध्ये प्रामुख्याने औद्योगिक कलह कायदा, कारखाने कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा, किमान वेतन कायदा, कर्मचारी राज्य विमा कायदा, प्रॉव्हिडंट फंड कायदा, ग्रॅच्युएटी कायदा आणि रेग्युलेशन ऑफ कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. कामगारांना योग्य वेतन व मोबदला मिळावा यासाठी अनेक समित्या, आयोग नेमण्यात आले. फेअर वेजेस कमिटी ही त्यापैकीच एक महत्वाची समिति ज्यामध्ये उद्योगपती नवल टाटा, अशोक मेहता, एस. ए. डांगे यासारख्या मोठ्या कामगार नेत्यांचा समावेश होता.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संपूर्ण देशातील कामगार चळवळीच्या दृष्टीने एक मोठी

घटना म्हणजे कामगार चळवळीतील फुट ही होती. एआयटीयुसी (AITUC) मधुन इंडियन नॅशनल ट्रेड युनियन कॉंग्रेस (INTUC) ची स्थापना झाली. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकाराने ही दुसरी केंद्रिय कामगार संघटना अस्तित्वात आली. INTUC ही तशी कॉंग्रेस प्रणित संघटना होती. त्यामुळे महाराष्ट्रातील व देशातील काही कामगार नेत्यांना राजकीय पक्षांशी बांधीलकी असलेली कामगार संघटना नको होती. म्हणून १९४८ मध्येच हिंद मजदुर सभेची स्थापना झाली ज्यामध्ये प्रामुख्याने अशोक मेहता, एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, मणीबेन कारा, पी. डिमेलो, रुईकर, देसाई, खडकीकर यांचा समावेश होता. त्याच वर्षी युनायटेड ट्रेड युनियन कॉंग्रेस ची ही स्थापना झाली आणि देशातील कामगार वर्ग चार केंद्रिय कामगार संघटनामध्ये विभागला. सन १९५० मध्ये आपल्या देशाने लोकशाही राज्य पद्धती स्वीकारली आणि सर्व राजकीय पक्षांना समान संधी मिळाली. त्यामुळे प्रत्येक राजकिय पक्ष आपल्या प्रभावाखालील कामगार संघटना असाव्यात म्हणून कार्यरत झाला. पुढे पुर्वीच्या जनसंघाने भारतीय मजदूर संघ ह्या केंद्रीय कामगार संघटनेची निर्मिती केली. प्रजा समाजवादी पार्टीतून बाहेर पडून समाजवादी पार्टी स्थापन झाल्यानंतर त्यांनी हिंद मजदूर किसान पंचायत स्थापन केली. भारतीय कम्युनिस्ट पक्षातून मार्कसिस्ट बाहेर पडले. त्याच दरम्यान एआयटीयुसी मधुन बाहेर पडून सेंटर फॉर इंडियन ट्रेड युनियन (सीआयटीयु) ची स्थापना झाली. थोडक्यात जसजशी राजकीय पक्षांमध्ये फुट पडली तशी कामगार संघटना मध्येही फुट पडत गेली. पुढे भारतीय कामगार सेना, लाल निशाणी पार्टी, अशा वेगवेगळ्या संघटना या राजकिय पक्षांशी जवळीक साधणाऱ्या संघटना निर्माण झाल्या आणि कामगार चळवळीची ताकद अशा संघटनांमध्ये विभागली गेली. त्यामुळे समतावादी समाज निर्मितीचे काम काही प्रमाणत मागे पडले असे याठिकाणी प्रामाणिकपणे नमुद करावेसे वाटते.

परंतु १९५० ते १९८० चे पर्व हे देशातील सार्वजनिक व खाजगी उद्योगांच्या निर्मितीचे पर्व होते. नवीन निर्माण झालेल्या उद्योगधंद्यांमध्ये कामगार चळवळीने कामगार वर्गाच्या कल्याणासाठी अनेक हक्कांचे लढे उभे केले आणि कामगार वर्गासाठी दीर्घकालीन फायदे करुन दिले. टाटा, बिर्ला, मफतलाल, किर्लोस्कर यासारख्या मोठ्या खाजगी उद्योगामध्येही संघर्ष केला आणि अनेक फायदे मिळवून दिले. गोवा मुक्ती संग्राम आणि संयुक्त महाराष्ट्राचा लढा यामध्येही कामगार चळवळीचे योगदान मोठे आहे. या चळवळीत ३१ हजार लोकांना अटक केली व १०६ जणांनी हौतात्म्य पत्करले त्यामध्ये बहुसंख्य कामगार वर्ग होता. पुढे १९७४ मध्ये जॉर्ज फर्नांडीस यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे कामगारांचा ऐतिहासिक संप झाला. लगेचच देशामध्ये सरकारने आणीबाणी जाहीर केली तेव्हा कामगार हितासाठी कामगारांच्या हक्कावर गदा आणणाऱ्या आणिबाणीला गोदी कामगारांच्या संघटनांनी कडाडून विरोध केला म्हणून गोदी कामगारांचे नेते डॉ. शांती पटेल, एस. के. शेट्ये व त्यांचे सहकारी यांना सरकारने तुरुंगात टाकले. या सगळ्या पार्श्वभुमीवर डॉ.दत्ता सामंत यांनी कामगार चळवळीत प्रवेश केला. कम्युनिस्ट

विचारसरणीचा प्रभाव कमी होत असतानाच लढाऊ कामगार नेता म्हणून डॉ. दत्ता सामंत यांचे नेतृत्व अल्पावधीतच कामगार वर्गाने स्विकारले आणि १९८२ चा संप हा देशातील कामगार चळवळीतील संघटितपणा दर्शविणारा एक प्रचंड मोठा लढा होता. जवळजवळ अडीच लाख कामगार या लढ्यात सहभागी होते. त्याच दरम्यान संपूर्ण जगामध्ये कापड उद्योगात मंदीची लाट आली आणि मालक वर्ग देखील गिरण्या बंद करण्याची कारणे शोधत होता. डॉ. सामंतांच्या नेतृत्वाखालील संपाचा आधार घेत मोठ्या कुशलतेने मालकांनी गिरण्या बंद करण्यास सुरुवात केली त्यामुळे कामगार वर्ग मात्र बेरोजगार झाला आणि मोठ्या आर्थिक संकटात सापडला. कागदोपत्री संप आजही चालुच आहे. दत्ता इस्वलकर यांच्या अध्यक्षतेखाली गिरणी कामगार संघर्ष समितीची चळवळ अखंडपणे मोठ्या एकजुटीने चालू आहे. खरं तर ही चळवळ म्हणजे समतावादी समाजनिर्मितीचाच भाग आहे. कारण तत्कालीन कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना न्याय देण्यासाठीच ही चळवळ आहे. कामगारांना घराचा हक्क आणि रोजगाराचा हक्क देण्यासाठी सरकारला कायद्यात बदल करण्यास भाग पाडले व त्याची अंमलबजावणी व्हावी ही चळवळ अधिक तीव्र होत आहे कामगार वर्गाच्या तीन पिढ्यांचे योगदान मुंबईचे वैभव वाढवण्यामध्ये आहे, तेव्हा या कामगारांचे जीवन समृद्ध व्हावे, सामाजिक समता निर्माण व्हावी यासाठी नव्या समाज निर्मितीसाठी ही चळवळ आजही चालूच आहे.

**जागतिकीकरणानंतरची कामगार चळवळ:**

जागतिकीकरणाचे वारे हे संपूर्ण जगात १९८० च्या दशकात वाहू लागले आणि १९९१ मध्ये ते भारताला स्वीकारावेच लागले. भांडवली व्यवस्थेला पोषक असे खासगीकरणाचे वातावरण तयार होत गेले आणि कंत्राटी पद्धतीचा शिरकाव सगळीकडे मोठ्या प्रमाणात झाला व कायमस्वरुपी कामगार वर्ग कमी होऊ लागला. गेली अनेक वर्षे सार्वजनिक व खासगी क्षेत्रात कायमस्वरुपी कामगारांची भरती जवळ जवळ थांबलेलीच आहे. नवीन निर्माण होणारे काम कंत्राटी तत्वावर करुन घेतले जाते. ही कामगार वर्गाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. कंत्राटी पद्धतीमध्ये काम करणाऱ्या कामगारांना कायदेशीर संरक्षण, इतर सेवा-सुविधा फारशा मिळत नाहीत त्यामुळे त्यांना संघटीत करणे व न्याय मिळवून देणे हे एक आव्हानच निर्माण झाले आहे. तसेच स्पेशल इकॉनॉमिक झोन हे जागतिकीकरणानंतर वाढत आहेत परंतु ते *स्पेशल एक्सप्लॉयटेशन झोन* तयार होत आहेत की काय असे चित्र आहे. कारण भांडवलदारांना सर्व सुविधा दिल्या जातात, कायद्यातून सूट दिली जाते परंतु त्या ठिकाणी काम करणारा कामगार वर्ग मात्र भरडला जात आहे. १९९१ पर्यंत कामगार चळवळीने अनेक लढे यशस्वी करुन संपूर्ण कामगार वर्गाचे संरक्षण व सामाजिक न्याय देऊन समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक कामगार कायदे पदरात पाडून घेतले परंतु त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्यामुळे योग्य सामाजिक न्याय मिळण्यास सद्या अडचणी निर्माण होत आहेत. कामगार चळवळ वेगवेगळ्या संघटनांमध्ये विभागली आहे. त्यामुळे एकुणच कामगार चळवळीची

ताकद कमी होत आहे. या सगळ्यांचा परिणाम म्हणजे समतावादी समाज परिवर्तनाचा लढा मागे पडत गेला व भांडवलशाही व्यवस्थेमुळे पुन्हा विषमतेची दरी वाढत जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी असून त्यापैकी ४० कोटी संख्या ही कष्टकरी कामगार वर्गाची आहे. या ४० कोटी कामगारांपैकी फक्त ७ टक्के कामगार हे संघटित क्षेत्रात मोडतात तर उर्वरित ९३ टक्के कामगार असंघटीत क्षेत्रात आहेत. हे ९३ टक्के म्हणजे ज्यांना नोकरीची शाश्वती नाही, पुरेसे वेतन नाही, कामगार कायद्याचे फारसे संरक्षण नाही, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव आहे. परिणामी एकूण त्यांच्या राहणीमानाची स्थिती फारसी समाधानकारक नाही. एका बाजुला कामगार चळवळ दुर्बळ झालेली दिसते तर दुसऱ्या बाजुला कामगारांची स्थिती खालावत जाऊन सामाजिक, आर्थिक असमानता वाढत असल्याचे विदारक चित्र निर्माण होत आहे.

**समारोप:**

या गंभीर परिस्थितीतून मार्ग काढायचा असेल आणि समतावादी समाजनिर्मितीकडे यशस्वी वाटचाल करावयाची असेल तर देशातील सर्व कामगारांनी एकत्र येऊन एकजुटीने कामगार चळवळीची ताकद वाढविण्याची नितांत गरज आहे. संघटित कामगारांनी व कामगार संघटनांनी असंघटीतांना साथ दिली पाहिजे. कामगार वर्गाचे व्यापक सामाजिक हित लक्षात घेऊन सामाजिक व आर्थिक समता कशी प्रस्थापित होईल याचा विचार केला पाहिजे. सामाजिक न्यायाचे पाऊल उचलण्यासाठी सामाजिक सुरक्षिततेचे कार्यक्रम केंद्रस्थानी ठेऊन ते प्रभावीपणे राबविण्यासाठी सरकारला भाग पाडणे आवश्यक आहे. देशातील विषमता नष्ट करण्यासाठी देशाच्या सामाजिक आर्थिक धोरणांच्या मध्यभागी कामगार कष्टकरी सामान्य जनता असली पाहिजे. जागतिकीकरणाच्या या पार्श्वभूमीवर एकूण व्यवस्थेमध्ये झपाट्याने बदल होत आहेत. त्यामुळे सामाजिक, आर्थिक व वित्तीय विकासाच्या प्रक्रियेत कामगार वर्गाच्या राहणीमानात व त्यांच्या कल्याणात वाढ होणे आवश्यक आहे. यासाठी कामगार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी त्यांच्या संरक्षणासाठी सर्व कामगार संघटनांनी एकत्रित येऊन मोठी चळवळ उभी करण्याची गरज आहे. तसेच कल्याणकारी विकासाचे प्रारुप स्वीकारलेल्या देशात सामाजिक कल्याण केंद्रित विकासाची गरज आहे. सर्वसमावेशक चिरस्थायी विकास (Inclusive Sustainable Development) हे बाराव्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी समतावादी समाजनिर्मिती हा महत्वाचा अजेंडा असला पाहिजे असे म्हटल्यास वावगे ठरु नये. एकूणच आतापर्यंत कामगार चळवळीचे योगदान हे कष्टकरी सामान्य वर्गाच्या हितासाठीच झाले आहे. अगदी भारतीय कामगार चळवळीचे आद्यप्रवर्तक रावबहादुर नारायण मेघाजी लोखंडे पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, अशोक मेहता, एस. ए. डांगे, ना. म. जोशी ते गं. द. आंबेकर, डॉ. शाती पटेल अशी कितीतरी नावे घेता येतील ज्यांनी कामगार हित व सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेऊन कामगार चळवळ उभी केली. एकुणच आतापर्यंत कामगार चळवळीचे योगदान

समतावादी समाजनिर्मितीमध्ये महत्वपूर्ण आहे परंतु भविष्यातील कामगार चळवळ अधिक सक्षम होण्यासाठी सर्व कामगार संघटनांनी एकत्र येण्याची गरज आहे. जर कामगार चळवळीची एकजुट झाली तर सामाजिक समता प्रस्थापित झाल्याशिवाय राहणार नाही. ही सामाजिक समताच समतावादी समाजनिर्मिती घडवून आणू शकेल.

**संदर्भ सूची:**


१) पोर्ट ट्रस्ट कामगार विशेषांक (२००७ ते २०१२) मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अॅन्ड जनरल एम्प्लॉईज युनियन.

२) शरद राव (२०११), कामगार चळवळीचे एकत्रीकरण व सशक्तीकरण काळाची गरज, शिवनेर विशेषांक पृ. ४-७.

3) Thomas Jayan Jose (0-005), Labour in the New Jorunal of Labour Economics, Vol. 48, No. 4, Oct-Dec 2005, pp821-835.

4) Report of the second National Commission on Labour (2002) pp 291-931.

# ग्रीक शोकांतिका

**विश्वजीत कदम, नाशिक,**
अर्थशास्त्र विभाग,
आर. एन. सी. आर्ट्स, जे. डी. बी. कॉमर्स
आणि एन. एस. सी. सायन्स महाविद्यालय
भ्रमणध्वनी: ७७९८६२७७१८.
ई-मेल: vishwajeetdkadam@gmail.com

ग्रीसमध्ये जानेवारी २०१५ मध्ये सिरीझा हा डाव्या विचारसरणीचा पक्ष विधिमंडळातील जवळजवळ निम्म्या जागा मिळवून विजयी झाला तेव्हाच ग्रीसमधील आर्थिक संकट एक वेगळे वळण घेणार हे नक्की होते. ३२० बिलियन युरो कर्ज (द न्यूयॉर्क टाईम्स २०१५) असलेल्या ग्रीसला कर्जाची परतफेड करता यावी म्हणून युरोपियन सेन्ट्रल बँक, युरोपियन कमिशन आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्या त्रिकुटाकडून (Troika) जी नवीन आर्थिक मदत मिळणार होती त्या संदर्भातील आर्थिक काटकसरीच्या अटी ग्रीसने स्वीकाराव्यात की स्वीकारू नयेत ह्याबद्दल जनतेचा कौल जाणून घेण्यासाठी सत्ताधारी पक्ष सिरीझा आणि पंतप्रधान अलेक्सिस त्सिप्राझ ह्यांनी जनमतदर्शन घ्यावयाचे ठरवले. अपेक्षित होते त्याप्रमाणे ग्रीसच्या जनतेने बहुमताने (तब्बल ६१% जनतेने) *मान्य नाही* च्या बाजूने मतदान केले.

आता ग्रीस आणि युरोझोनच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेमधून ग्रीसला पुढील तीन वर्षांच्या काळामध्ये सुमारे ८६ बिलियन युरोंची आर्थिक मदत देण्याचा करार मान्य झाला असून (६१% जनतेने *मान्य नाही* असा कौल देऊनही) त्यासाठी ग्रीक सरकारला आर्थिक काटकसरीच्या अनेक अटी पूर्ण कराव्या लागणार आहेत.

**त्रिकुटाने लादलेल्या आर्थिक सुधारणा व मंदीत गेलेली ग्रीक अर्थव्यवस्था:**

मे २०१० मध्ये ग्रीसने आर्थिक वर्ष २०१० पासून आर्थिक वर्ष २०१३ पर्यंत स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १६% राजकोषीय समायोजन करण्याचे स्वीकारून स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या १०% प्राथमिक तुटीच्या स्थितीपासून २०१४ मध्ये प्राथमिक समतोलाची स्थिती गाठली. अरिष्ट्योत्तर युरोपमध्ये अशा परावर्तनाचे हे एकमेव उदाहरण आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने असा अंदाज वर्तविला होता की

आर्थिक सुधारणा स्वीकारल्यानंतर ग्रीसचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न २०१०-११ च्या दरम्यान ५.५% ने घटेल, २०१२ मध्ये स्थैर्याची पातळी गाठेल आणि त्यानंतर वृद्धीच्या प्रक्रियेस सुरुवात होईल आणि बेरोजगारीचा दर १५% पर्यंत वाढेल. प्रत्यक्षात काय घडले? २००९ पासून ग्रीसच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात सुमारे ३३% ने घट झाली आहे, वृद्धीची कोणतीही शक्यता नजीकच्या भविष्यात नाही, बेरोजगारीचा दर २५.६% आहे, युवक बेरोजगारीचा दर ५०% आहे, २०१२ पासून किमान वेतन दरामध्ये सुमारे २५% ने घट झाली आहे, सार्वजनिक कर्जाचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी असलेले प्रमाण क्रमाक्रमाने वाढत जाऊन आता १७७% वर पोचलेले आहे. काटकसरीच्या नावाखाली ग्रीसवर लादल्या गेलेल्या आर्थिक सुधारणांच्या नवउदारमतवादी (Neoliberal) धोरणांमुळे ग्रीसमधील सार्वजनिक कर्जाची परिस्थिती सुधारली नाहीच परंतु ग्रीक अर्थव्यवस्था मंदीच्या विळख्यात सापडली.

आर्थिक काटकसरीच्या नवउदारमतवादी धोरणांमुळे फक्त ग्रीक अर्थव्यवस्था मंदीत ढकलली गेलेली नसून एकंदरीतच युरोपच्या अर्थव्यवस्थेची स्थिती चिंताजनक बनलेली आहे. युरोझोनचे पैसारूपी उत्पन्न गेल्या सात वर्षांमध्ये फक्त ५% ने वाढले असून महागाईचा दर (इंधन आणि अन्नधान्य किंमती वगळून) फक्त १% राहिलेला आहे. पैसारूपी उत्पन्नातील अशा अत्यल्प वाढीमुळे सार्वजनिक कर्जाचा भार तर वाढत जातोच मात्र कुंठीततेची भीती निर्माण होऊन खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होतो आणि अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडण्याची शक्यता कमी होत जाते. ह्यावर उपाय म्हणून त्रिकुटाने ग्रीसला अंतर्गत अवमूल्यन करायला लावून (किमान वेतन दर २५% कमी करून) स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर दिला आहे. मात्र परिव्यय कमी करून स्पर्धात्मकता वाढवण्याचे अंतर्गत अवमूल्यनाचे धोरण युरोझोनसाठी समग्रदृष्ट्या निष्फळ ठरते कारण अशा धोरणामुळे समग्र मागणी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात स्थलांतरित होते मात्र संपूर्ण युरोझोनमधील समग्र मागणीची पातळी त्यामुळे वाढत नाही. समग्र मागणीच्या पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी सार्वजनिक खर्चात वाढ घडवून आणण्याला पर्याय असू शकत नाही.

हा मुद्दा समजण्यासाठी केन्स (१९३६) यांच्या मूलभूत विश्लेषणाकडे आपल्याला जावे लागेल. केन्स यांच्या मते, मागणी हा आर्थिक व्यवहाराची पातळी ठरवणारा महत्वाचा निर्धारक आहे. निष्क्रिय उत्पादन क्षमता आणि अनैच्छिक बेरोजगारी असणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये सार्वजनिक खर्चात वाढ करूनच रोजगार पातळी आणि समग्र मागणीत वाढ घडवून आणता येऊ शकते. आर्थिक काटकसरीची धोरणे अशा स्थितीत निरुपयोगी ठरतात कारण आर्थिक काटकसर (सार्वजनिक खर्चात घट) खाजगी उत्पन्न आणि बाजार मागणीच्या अपुरेपणाला साथ देऊन अधिक लोकांना बेरोजगार बनवते आणि समग्र मागणीत वाढ घडवून आणू शकत नाही.

राजकोषीय तूट वाढू देण्याच्या धोरणामुळे अमेरिका आणि इंग्लंड कर्जाच्या सापळ्यातून बाहेर पडत आहेत मात्र युरोप कर्जाच्या सापळ्यात आणि आर्थिक संकटात गटांगळ्या खाताना दिसत आहे. एक नोंद घ्यावी असा मुद्दा म्हणजे युरोपमधील बेरोजगारीचा दर (११.५%) इंग्लंडच्या

बेरोजगारीच्या दराच्या दुप्पट असून युरोपची राजकोषीय तूट/राष्ट्रीय उत्पन्न इंग्लंडच्या तुलनेत निम्मी आहे.

ग्रीक अर्थव्यवस्थेवरील आर्थिक सुधारणांच्या परिणामांबाबतीतील त्रिकुटाचे आर्थिक अंदाज हे अत्यंत बेजबाबदार राहिले आहेत. आर्थिक अंदाजातील चुका ह्या फक्त मापनात्मक आणि तांत्रिक बाबी असल्या तरी त्याचे दूरगामी परिणाम मानवी जीवनावर होत असतात हे अर्थतज्ज्ञांना आणि अर्थतंत्रज्ञांना विसरून चालणार नाही. अशा चुकलेल्या आर्थिक अंदाजांचे खापर अर्थतज्ज्ञ प्रतिमान बांधणीतील चुका आणि त्यातील अवास्तव गृहीतकांवर फोडतात आणि ते योग्य आहे. मात्र प्रचलित प्रतिमाने कोणते वर्गीय हितसंबंध राखण्याकडे कललेली आहेत ह्या विश्लेषणाशिवाय काही प्रतिमाने अंदाज वर्तविण्यामध्ये इतकी कशी चुकतात ह्याचे उत्तर सापडणे कठीण आहे. त्रिकुटाचे आर्थिक अंदाज आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाचे (Iinternational Finance Capital) हितसंबंध राखण्याकडे कललेली असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

युरोपियन कमिशनच्या (२०१५) अंदाजानुसार युरोझोनमध्ये २०१५ मध्ये १.३% आणि २०१६ मध्ये १.९% वृद्धी होणे अपेक्षित आहे तर ग्रीसचा वृद्धी दर युरोझोनच्या वृद्धी दरापेक्षा अधिक असणे अपेक्षित आहे. जरी ग्रीसचा वार्षिक वृद्धी दर ३% राहू शकला तरी ग्रीक अर्थव्यवस्थेला २००८ च्या अरिष्ट्यपूर्व पातळीला पोचण्यासाठी २०२६ वर्ष उजाडावे लागेल. राजकोषीय संकोचाचे धोरण ग्रीसवर लादले गेलेले असताना ही वृद्धी प्रक्रिया अंदाजानुसार अपेक्षित पातळी कशी गाठू शकणार आहे हा मोठा प्रश्नच आहे.

**चुकलेले निदान, अर्थात *शस्त्रक्रिया यशस्वी पण रोगी दगावला* :**

त्रिकुटाच्या धोरणकर्त्यांच्या मते युरोझोनमधील आणि ग्रीसमधील आर्थिक संकट हा राजकोषीय बेशिस्त धोरणांचा परिणाम आहे तसेच हे सार्वभौम कर्ज संकट आहे. मात्र युरोझोनमधील राष्ट्रांचे संकटपूर्व काळातील आर्थिक निर्देशक बघितले असता संकटाचे निदान चुकले असल्याचे दिसून येते. संकटपूर्व आठ वर्षे कालावधीमध्ये (२०००-२००७) युरोझोनमधील सार्वजनिक कर्ज (राष्ट्रीय उत्पन्नाच्या %) सरासरी ६% ने घटलेले आहे, इटलीचे ७% तर स्पेनचे २४% ने घटले आहे. असे असून सुद्धा संपूर्ण युरोझोन संकटात सापडलेला असल्याचे दिसून येते. ग्रीसमध्ये संकटपूर्व काळामध्ये जरी ते ४% ने वाढले असले तरी त्यास राजकोषीय 'बेशिस्त' म्हणता येणार नाही. त्याचबरोबर संकटपूर्व काळात युरोझोनमधील सर्व राष्ट्रांना वित्तीय बाजार एकाच व्याजदराने कर्ज पुरवत होता. त्यामुळे संकटापूर्वीच राजकोषीय बेशिस्त धोरणांमुळे कर्जाचा डोंगर वाढायला सुरुवात झाली होती ह्या विधानात काही तथ्य नाही. जेव्हा बँका दिवाळखोर होण्यास सुरुवात झाली आणि राष्ट्रीय उत्पन्नात घट व्हायला सुरुवात झाली तेव्हाच सार्वजनिक कर्जामध्ये प्रचंड वाढ घडून आली. २००८-२०१२ ह्या काळात संपूर्ण युरोझोनचे सार्वजनिक कर्ज (राष्ट्रीय उत्पन्नाच्या %) ३३% ने वाढले, ग्रीसचे ४४% तर स्पेनचे ४५% ने वाढले. त्यामुळे बँकांची कर्जे वाढत गेल्यामुळे खाजगी कर्जाचे सार्वजनिकीकरण होणे सुरु झाल्यावरच हे संकट घटनोत्तररित्या सार्वभौम कर्ज संकट बनले. ग्रीसचे सार्वजनिक कर्ज (राष्ट्रीय उत्पन्नाच्या %) संकटपूर्व काळात

(२०००-०७) ४% वाढत असताना खाजगी क्षेत्राचे कर्ज (राष्ट्रीय उत्पन्नाच्या %) सुमारे ८६% ने वाढले. त्यामुळे ग्रीसमधील आर्थिक संकट हे सार्वजनिक कर्ज मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे निर्माण झाले असे म्हणताना खाजगी कर्जबाजारीपणाकडे कसे दुर्लक्ष करता येईल?

थोडक्यात, जर राजकोषीय विस्तार खर्च बेजबाबदारपणे झाला असता (आणि जर तो संकटपूर्व काळात सार्वजनिक कर्जातील नाट्यमय वाढीच्या स्वरूपात दिसला असता) तर आर्थिक काटकसरीची धोरणे उपयुक्त आहेत असे म्हणता आले असते. प्रत्यक्षात मात्र त्रिकुटाचे हे निदान पूर्णपणे चुकल्यामुळे आर्थिक काटकसरीचे औषध ग्रीससाठी जहरी विष ठरले. त्रिकुटाने चुकीचे निदान करून समोर ठेवलेली दंडात्मक लक्ष्ये ग्रीसने मोठ्या कष्टाने पाळायचा प्रयत्न केला आहे. पॉल क्रुगमन ह्यांनी युरोपियन धोरणकर्त्यांची तुलना मध्ययुगीन डॉक्टरांशी केली आहे. ग्रीसमधील आर्थिक काटकसरीची तुलना अमर्त्य सेन ह्यांनी प्रतिजैविके (अपवादात्मक संस्थात्मक सुधारणा) आणि उंदीर मारण्याचे औषध (सार्वजनिक खर्च कमी करण्याचे धोरण) ह्यांचे मिश्रण असलेल्या औषधाशी केलेली आहे. स्टोर्म आणि नास्तेपाड ह्यांनी महत्वपूर्ण अभ्यासात युरोपमधील आणि ग्रीसमधील कडक काटकसरीची धोरणे ही 'राजकोषीय बेशिस्त' आणि 'ताठर श्रमबाजार' ह्या आर्थिक संकटाच्या चुकीच्या निदानांमुळे राबवली गेल्याचे मांडले आहे. त्यांच्या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार, वित्तीय उदारीकरण आणि केंद्रीय राष्ट्रांकडून परिघीय राष्ट्रांकडे मोठ्या प्रमाणात वाढलेले भांडवली प्रवाह ही युरोपमधील संकटाची अंतिम कारणे आहेत.

**ग्रीसमधील ऋण शाश्वततेची स्थिती आणि त्रिकुटाची विसंगत धोरणे:**

सार्वजनिक कर्ज-राष्ट्रीय उत्पन्न गुणोत्तर हा सरकारच्या कर्जाची परतफेड करण्याच्या क्षमतेची स्थिती दर्शविणारा महत्वाचा निर्देशक मानला तर तो कमी करण्यासाठीची एक अट म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर हा सार्वजनिक कर्जाच्या वृद्धी दरापेक्षा अधिक असावा. थोडक्यात नवीन कर्ज हे अशा बाबींवर खर्च व्हावे ज्यातून अर्थव्यवस्थेत गुणक परिणाम घडून येईल, सार्वजनिक कर्ज-राष्ट्रीय उत्पन्न गुणोत्तर घटण्याची शक्यता निर्माण होईल आणि ऋण शाश्वतता वाढीस लागेल. म्हणजेच ह्या कर्जाचा वापर जर पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती, सामाजिक क्षेत्र ह्या बाबींवर खर्च करण्यासाठी झाला आणि घेतलेल्या कर्जपातळीला राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर महत्तम शक्य पातळी गाठू शकला तरच नवीन कर्जाचा इष्टतम पातळीला वापर झाला. जर तसे घडत नसेल तर कर्जदार देशाच्या दृष्टीकोनातून असे नवीन कर्ज अनुत्पादक ठरते. ग्रीसच्या बाबतीत बहुतांश नवीन कर्जाचा वापर हा अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी झालाच नसून जुन्या कर्जावरील व्याजाची परतफेड करण्यासाठी झालेला असल्याने ग्रीक सरकारवरचा कर्जाचा डोंगर वाढत गेला आहे. ह्या अर्थाने नवीन कर्जाचा वापर ऋण शाश्वतता वाढवण्यासाठी न होता तो कमी करण्यासाठी झालेला असल्याने ग्रीक सरकारचे नवीन कर्ज पूर्णपणे अनुत्पादक ठरले आहे. ऋण शाश्वततेचे सूत्र पुढीलप्रमाणे मांडता येईल.

$\triangle$ (कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न) = (पैसारूपी व्याजदर - पैसारूपी उत्पन्न वृद्धी दर) x कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न - प्राथमिक अधिक्य

ग्रीसची सद्यस्थिती काय आहे? सार्वजनिक कर्जावरील परिणामकारक व्याजदर २.४% आहे उत्पन्न वृद्धी दर ०.२% आहे, कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न १.७७ आहे आणि प्राथमिक अधिक्य राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.७% आहे. सर्व मूल्ये सूत्रात टाकूयात.

△ (कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न) = (२.४% - ०.२%) x १.७७ - २.७%

△ (कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न) = १.१९४%

म्हणजेच ग्रीसच्या कर्जात होणारी वाढ ही चालू वर्षात १.१९४% असेल आणि त्यापुढील काळात ती दरवर्षी वाढत जाईल. जेव्हा △ (कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न) < ० होईल, तेव्हाच ग्रीसची ऋण शाश्वततेकडे वाटचाल सुरु झाली आहे असे म्हणता येईल.

जर कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न यात घट घडवून आणून ऋण शाश्वततेत वाढ घडवून आणायची असेल तर, १. पैसारूपी उत्पन्न वृद्धी दर > पैसारूपी व्याजदर २. प्राथमिक अधिक्य > ०

ह्या दोहोंपैकी किमान एक अट पूर्ण व्हायला हवी. ह्यापैकी प्राथमिक अधिक्य जर शून्यापेक्षा अधिक राहत असेल तर ह्याचा अर्थ असा होतो की सार्वजनिक उत्पन्न सार्वजनिक खर्चापेक्षा (व्याजावरील खर्च वगळून) अधिक आहे. सर्व प्राथमिक अधिक्य कर्ज परतफेडीसाठी वापरले जाईल आणि कर्ज/राष्ट्रीय उत्पन्न तेवढ्याच प्रमाणात कमी होईल. मात्र तेवढ्याच पातळीने सार्वजनिक खर्चात वाढ केली तर पैसारुपी उत्पन्न वृद्धी दरात कितीने वाढ होईल हे राजकोषीय गुणक मूल्यावर ठरेल. जर राजकोषीय गुणक मूल्य > १, तर प्राथमिक अधिक्य राखण्यापेक्षा तेवढ्याच पातळीने सार्व. खर्चवाढ करणे जास्त हिताचे ठरेल. यावरून असे म्हणता येईल की,

राजकोषीय गुणक मूल्य > १ (अट अ)

राजकोषीय गुणक = १/१ - सीमांत उपभोग प्रवृत्ती (१ - कर दर) + सीमांत आयात प्रवृत्ती

जर सीमांत उपभोग प्रवृत्ती (१ - कर दर) > सीमांत आयात प्रवृत्ती, तर राजकोषीय गुणक मूल्य > १. (अट ब)

अट ब पूर्ण होत असेल तर अट अ पूर्ण होते आणि अट अ पूर्ण होत असेल तर प्राथमिक अधिक्य शून्य ठेवून अट क्र. १ पूर्ण करणे अधिक परिणामकारक ठरते.

विविध अभ्यासांनी नोंदवल्याप्रमाणे आर्थिक मंदीच्या काळात राजकोषीय गुणक मूल्य हे ०.९ ते १.८ च्या दरम्यान असल्यामुळे ग्रीसला ऋण शाश्वततेच्या मार्गावर नेण्यासाठी अट क्र. १ पूर्ण करण्याला पर्याय नाही.

ग्रीसला ऋण शाश्वततेकडे नेण्यासाठी त्रिकुटाने अवलंबलेल्या धोरणांमध्ये अट क्र. २ वर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे दिसते. परंतु त्याचा प्रतिकूल परिणाम उत्पन्नाच्या वृद्धी दरावर घडून आल्यामुळे ऋण शाश्वततेवर त्याचा विपरीत परिणाम झाला. जर प्राथमिक अधिक्यात वाढ करत राहण्याचे धोरण सुरूच राहिले तर त्याचा वृद्धी दरावर आणि ऋण शाश्वततेवर प्रतिकूल परिणाम होणे सुरूच राहील. खरंतर अर्थव्यवस्थेत निष्क्रिय उत्पादनक्षमता मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असताना प्राथमिक अधिक्य राखण्याचे धोरण पूर्णतः विसंगत आहे.

वरील अटींबद्दल आणखी महत्वाचा मुद्दा असा की अट क्र. १ ही सर्वसामान्य जनता आणि धनको दोहोंचेही हितसंबंध जपणारी आहे. तर अट क्र.२ सर्वसामान्य जनतेला दुर्दशेत ढकलून धनकोंचे

आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाचे हितसंबंध जपणारी आहे ह्याचे कारण असे की ही अट पूर्ण झाली की एकीकडे त्याचा वृद्धीवर प्रतिकूल परिणाम होऊन जरी ऋण शाश्वतता कमी झाली तरी धनकोंना कर्जाचा काही हिस्सा परत मिळतो आणि दुसरीकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेतील कर्जात आधीपेक्षा वाढ होते.

थोडक्यात, जर राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर कर्जावरील व्याजदरापेक्षा अधिक असेल तर तो देश दिवाळखोर बनण्याची भीती असण्याचं काहीच कारण नाही कारण भविष्यात परत करावयाचे कर्ज राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत आजच्यापेक्षा कमी असेल. वरील अट जर पूर्ण होत असेल तर ऋण पुनर्योजना करून परतफेडीसाठी मुदतवाढ देणे दोन्ही पक्षांच्या हिताचे ठरते. ही अट पूर्ण होत नसेल (ग्रीसच्या बाबतीत वरील अट पूर्ण होत नाही) तर ऋण पुनर्योजना करून दिवाळखोरी टाळण्यासाठी सरकारला योग्य ती राजकोषीय विस्ताराची धोरणे राबवण्याची मुभा दिली पाहिजे जेणेकरून राष्ट्रीय उत्पन्नाचा वृद्धी दर व्याजदरापेक्षा अधिक राहू शकेल. ह्याउलट परतफेडीसाठी कोणतीही मुदतवाढ न देता नवीन कर्ज (आणि त्यासोबत आर्थिक काटकसरीच्या विविध अटी!) लादल्याने ऋण शाश्वततेवर विपरीत परिणाम झाला, अर्थव्यवस्था आणखी मंदीत ढकलली गेली आणि दिवाळखोरीची शक्यता बळावली.

राष्ट्रीय उत्पन्नात वृद्धी घडून आली तरच त्वरक परिणाम घडून खाजगी क्षेत्र नफ्याच्या दराबद्दल आशावादी बनेल, खाजगी गुंतवणुकीत वाढ होईल, खाजगी क्षेत्राच्या उत्पन्नात तसेच खाजगी क्षेत्रातील रोजगारात वाढ होईल, राष्ट्राच्या कररूपी उत्पन्नात वाढ होईल आणि सरकारचा राजकोषीय समतोल पुनर्प्रस्थापित होऊ शकेल. त्याचप्रमाणे राष्ट्रीय उत्पन्नात वृद्धी घडून आली तरच ऋण शाश्वतता वाढीस लागेल. म्हणजेच कर्ज परतफेडीसाठी राष्ट्रीय उत्पन्नाची वृद्धी वाढवण्याला पर्याय असू शकत नाही. थोडक्यात, जेव्हा त्रिकुट ग्रीक अर्थव्यवस्थेला चालना देण्याऐवजी त्यांचे जुने कर्ज परत मिळावे म्हणून ग्रीक सरकारला नवीन कर्ज देतात (ज्या पद्धतीने ग्रामीण भागातील सावकार काम करतात!) तेव्हाच ते त्यांच्या नकळत कर्जाची परतफेड करण्याच्या क्षमतेवर प्रतिकूल परिणाम करतात.

ग्रीक सरकारवरील कर्जाचा डोंगर आणि ग्रीसमधील आर्थिक संकट त्यांच्याच उधळपट्टीच्या राजकोषीय बेशिस्त धोरणांमुळे निर्माण झालेले असून त्याची पूर्ण जबाबदारी ही ग्रीक सरकारची आहे आणि त्यांना त्याची (दंडात्मक लक्ष्यांच्या स्वरुपात) शिक्षा झालीच पाहिजे असं म्हणताना तीन मुद्दे विसरून चालणार नाहीत. एक, ग्रीक सरकारने कर्जे स्वेच्छेने स्वीकारली असली तरी कर्ज देणाऱ्या त्रिकुटाने आणि धनकोंनी देखील स्वेच्छेने कर्जे दिलेली आहेत. त्यामुळे कर्जाचा डोंगर हा जसा बेजबाबदारपणे कर्ज स्वीकारण्यातून तयार झाला आहे तसाच तो बेजबाबदारपणे कर्ज देण्यामुळे देखील तयार झाला आहे. त्यामुळे त्याच्या परिणामांची जबाबदारी ही दोन्ही पक्षांनी घ्यायला हवी. दोन, सर्व आर्थिक व्यवहारांच्या मुळाशी स्वेच्छा विनिमयाचे तत्व हे फक्त तत्वतः असते आणि सत्ता असममितीचे व्यवस्थात्मक विश्लेषण केल्याशिवाय आर्थिक व्यवहार हे कसे एका पक्षाच्या दृष्टीकोनातून अनिच्छेचे आणि लादलेले असतात आणि दुसऱ्या पक्षाच्या

दृष्टीकोनातून हितसंबंध जपणारे असतात हे आपणास समजू शकत नाही. तीन, ग्रीसने दोन्ही पक्षांच्या बेजबाबदारपणाची खूप मोठी किंमत अर्थव्यवस्थेवर झालेल्या प्रतिकूल परिणामांच्या स्वरुपात आधीच मोजलेली आहे.

अशाप्रकारे एका बाजूला आर्थिक काटकसर करण्यासाठी त्रिकुटाने ग्रीसवर लादलेली नवउदारमतवादी धोरणे आणि दुसऱ्या बाजूला नवीन कर्जाचा अनुत्पादक वापर ह्यामुळे ग्रीक अर्थव्यवस्थेचे मंदीतून आणि कर्जाच्या सापळ्यामधून बाहेर पडणे दुरापास्त होऊन बसले आहे. ग्रीसच्या कर्जाची पुनर्योजना आणि पुनर्रचना करणे किंवा ग्रीसने दिवाळखोरी जाहीर करून युरोझोनमधून बाहेर पडण्याला आता पर्याय नाही असे अनेक अर्थतज्ज्ञांचे मत होते (ह्यात जोसेफ स्टिग्लीट्झ, पॉल क्रुगमन, प्रभात पटनाईक, नोरीएल रुबिनी, जयती घोष आदिंचा समावेश होतो). आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (२०१५) देखील ग्रीसच्या सार्वजनिक कर्जाच्या स्थितीचा आढावा घेऊन कर्ज शाश्वत नसल्याचे मान्य केलेले आहे. मात्र युरोपियन सेन्ट्रल बँक आणि युरोपियन कमिशनने ह्याचे भान न दाखवता ग्रीक अर्थव्यवस्थेवर कर्ज लादून जर्मन व फ्रेंच बँकव्यवस्थांना वाचवण्याचा प्रयत्न चालवला आहे. ऋण पुनर्योजना व मुदतवाढीची शक्यता त्रिकुटाने तात्पुरती टाळली असली तरी भविष्यात कर्जाचा किमान काही हिस्सा परत मिळवण्यासाठी धनकोंना ऋण पुनर्रचना करावी लागणे किंवा ग्रीस युरोझोनमधून बाहेर पडणे अटळ आहे. नवीन आर्थिक मदतीच्या करारामुळे हा धोका तूर्त टळला असला तरी त्यातील नवउदारमतवादी अटींचा परिणाम अर्थव्यवस्थेला मंदीकडे नेणारा आहे.

## युरोपियन संघाचे फसलेले अर्थशास्त्र?

ह्या आर्थिक संकटामुळे युरोपच्या आर्थिक संघ बनवण्याच्या धोरणाबद्दल आणि त्याच्या अर्थशास्त्राबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जरी युरोपियन संघ राजकीयदृष्ट्या राष्ट्र-राज्य तसेच राष्ट्रवादाच्या संकुचित संकल्पनांपलिकडे जाणारा असला तरी काही अर्थशास्त्रीय मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

एक, हा आर्थिक संघ (चलन संघ) वास्तवामध्ये भांडवलदारांच्या व्यावसायिक हितसंबंधांमधून तयार झालेला आहे. पॉल क्रुगमन म्हणतात त्यानुसार ज्याला अर्थशास्त्रामधील फारसं कळत नाही किंवा जो अडचणीचे प्रश्न टाळायचे ठरवतो त्याला चलन संघ बनवणे ही साहजिकच एक सुंदर कल्पना वाटू शकते कारण अशा आर्थिक संघामुळे सर्व अडथळे संपुष्टात येऊन राष्ट्रांच्या सीमेपलीकडील व्यापार आणि व्यवसाय सुलभ बनतो. अर्थशास्त्राची समज आणि समान चलनामुळे व्यापार सुलभ बनणे ह्यांत फरक करून क्रुगमन ह्यांनी एका खूप महत्वाच्या मुद्द्याला हात घातलेला आहे. एका चलनामुळे भांडवलदारांच्या दृष्टीकोनातून व्यापार सुलभ बनून त्यास चालना मिळते मात्र त्यातून निर्माण होणाऱ्या समष्टीय समस्यांचा विचार भांडवलदारांच्या दृष्टीकोनात अंतर्भूत होऊ शकतोच असे नाही. म्हणजेच भांडवलदारांची समग्र अर्थव्यवस्थेची समज आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे वास्तव यांत मूलभूत फरक असतो. थोडक्यात, भांडवलदारांचा अर्थव्यवस्थेबाबतचा दृष्टीकोन (आणि भांडवलदारांचे हितसंबंध) आणि समष्टीय अर्थतज्ज्ञांची आणि धोरणकर्त्यांची समज (आणि सार्वजनिक हितसंबंध) ह्यांत मूलभूत फरक

असलाच पाहिजे कारण भांडवलदार नफा महत्तमीकरणाची आणि भांडवल संचयीकरणाची धोरणे राबवत असल्याने त्यांचा दृष्टीकोन हा मूलतः व्यष्टीय असतो मात्र समष्टीय अर्थतज्ज्ञांचा आणि धोरणकर्त्यांचा दृष्टीकोन मूलतः समग्र असायला हवा.

दोन, राष्ट्र-राज्यांचे स्वतंत्र अस्तित्व जपून मौद्रिक संघ तयार करण्याच्या अर्थशास्त्रातील त्रुटी आता समोर आल्या आहेत. अशा मौद्रिक संघात एकच चलन असल्याने व्यापारास चालना मिळत असली तरी राष्ट्रांना राजकोषीय धोरणाशी सुसंगत असे स्वतंत्र मौद्रिक धोरण राबवता येत नाही. फक्त महागाई-लक्ष्य (Inflation-Targeting) केंद्रित धोरणे राबवणारी आणि पतपुरवठा करणारी युरोपियन सेन्ट्रल बँक एका बाजूला प्रत्येक देशाच्या विभिन्न स्थितीनुसार मौद्रिक धोरण राबवण्यात अपयशी ठरते आणि दुसऱ्या बाजूला सर्व लक्ष हे महागाई पातळी नियंत्रित करण्याकडे केंद्रित केल्यामुळे अर्थव्यवस्थेतील अनैच्छिक बेरोजगारी आणि अतिरिक्त उत्पादन वाढण्याच्या प्रवृत्तीस चालना मिळते.

तीन, अंशतः एकत्रीकरणामुळे (राष्ट्र-राज्यांचे राजकीय अस्तित्व जपून तयार झालेला मौद्रिक संघ) सामूहिक राजकोषीय धोरणाचा तसेच विविध समष्टीय समस्यांवरील सामुहिक उपायांचा अभाव आपणास दिसून येतो. उदाहरणार्थ, जर्मनी हे राष्ट्र आर्थिक वर्ष २००२ पासून आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंदाच्या चालू खात्यावर अधिक्य अनुभवत असून ते आर्थिक वर्ष २०१५ मध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या ७.६% वर पोहोचले आहे. तसेच, जर्मनी आर्थिक वर्ष २०१२ पासून राष्ट्रीय उत्पन्नाच्या ०.१% ते ०.७% दरम्यान अर्थसंकल्पीय अधिक्य अनुभवत आहे. अशी स्थिती असतानाही जर्मनीने राजकोषीय संकोचाचे धोरण चालूच ठेवलेले असून किमान वेतन दरांमध्ये कोणतीही महत्वपूर्ण वाढ केलेली नाही. अशा धोरणामुळे युरोझोनमधील इतर राष्ट्रे आर्थिक मंदी अनुभवत असताना एकीकडे जर्मनी जेवढी खरेदी करत आहे त्यापेक्षा खूप जास्त विक्री करत असल्याने इतर प्रदेशांची मागणी जर्मनीकडे स्थलांतरित होताना दिसत आहे तर दुसरीकडे राजकोषीय संकोचाचे धोरण सुरुच ठेवल्यामुळे जर्मनीच्या अर्थसंकल्पीय अधिक्याचा वापर युरोझोनमधील इतर राष्ट्रांना मंदीतून बाहेर काढण्यासाठी होत नाहीये. अशा स्थितीत जर जर्मनीने राजकोषीय विस्तार केला तर युरोझोनमधील समग्र मागणीत वाढ होऊ शकेल आणि ग्रीससारख्या मंदीत गटांगळ्या खाणाऱ्या राष्ट्राची स्पर्धात्मकता वाढून निर्यात वाढीस लागेल. त्यामुळे ही स्थिती शून्य बेरीज खेळ (Zero Sum Game) अशी अजिबात नसून धन बेरीज खेळ (Positive Sum Game) अशी आहे.

आर्थिक सहकार्याचे धोरण जरी आर्थिक संघ निर्मितीच्या मुळाशी असले तरी आर्थिक संघांतर्गत हे सहकार्याचे तत्व एक चलन धोरणापलिकडे न नेता जर्मनीसारखी राष्ट्रे स्पर्धात्मकतेवर लक्ष केंद्रित करून परधन हरण धोरण राबवत असल्याने मंदीवर कोणताही सामूहिक उपाय युरोपियन संघाला राबवता आलेला नाही. समान चलन स्वीकारून मुक्त व्यापार धोरण राबवल्याने युरोपियन संघाच्या सदस्य राष्ट्रांमधील अर्थव्यवस्थात्मक विषमता नाहीशी होऊन सर्वच राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासास हातभार लागणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र

अंशतः एकत्रीकरणामुळे तसे न होता युरोपांतर्गत अरिष्ट्यात न सापडलेली केंद्रीय राष्ट्रे आणि अरिष्ट्यात सापडलेली परिघीय राष्ट्रे आपणास दिसून येत आहेत.

**समष्टीय अर्थशास्त्राचा व्यष्टीय पाया आणि बांधणीचा तर्कदोष** (Microfoundations of Macroeconomics & Fallacy of Composition):

नवीन सनातनवादी आणि विवेकी अपेक्षा परिकल्पना ह्या अर्थशास्त्राच्या मुख्य धारेतील सैद्धांतिक चौकटींनी समष्टीय अर्थशास्त्राचा व्यष्टीय पाया अशी नवीन पद्धतीने मांडणी करून १९७० च्या दशकामध्ये समष्टीय अर्थशास्त्राला व्यष्टीय अर्थाशास्त्राचेच एक विस्तारित रूप म्हणून मांडायला सुरुवात केली. ह्या दृष्टिकोनानुसार फक्त समष्टीय चलांमधील कार्यकारण संबंध स्पष्ट करणे सैद्धांतिकदृष्ट्या पुरेसे नसून त्यांची व्यष्टीय तत्वांशी सुसंगत सांगड घालणे गरजेचे बनते. ह्याचा आर्थिक धोरणांवरील परिणाम म्हणजे समग्र उत्पन्न, समग्र उत्पादन, बेरोजगारीची पातळी ह्या समष्टीय चलांचे व्यष्टीय निर्धारक लक्षात घेऊन ह्या निर्धारकांमध्ये बदल करण्यासाठी योग्य व्यष्टीय धोरणे राबवणे गरजेचे बनते.

अशाप्रकारे समष्टीय चलांचे व्यष्टीय पातळीला कपातीकरण केल्यामुळे (Reductionism) समष्टीय समस्यांवर व्यष्टीय उपाय अधिक परिणामकारक असतात असा आभास निर्माण होतो. जागतिक महामंदीच्या काळात वास्तव वेतन दरात कपात केल्यामुळे उद्योगसंस्थांची नफाक्षमता पुनर्प्रस्थापित होऊन मंदीचा प्रश्न सुटू शकेल हा आर्थर पिगू यांचा दृष्टीकोन अशा पद्धतीचा होता. सार्वजनिक खर्चात घट केल्यामुळे रोजगारपातळी कमी होणे हा थेट परिणाम असला तरी त्यामुळे खाजगी क्षेत्राच्या नफ्याबद्दलच्या अपेक्षा पुनर्प्रस्थापित होणे हा अप्रत्यक्ष परिणाम अधिक सबळ असेल ह्या त्रिकुटाच्या आशावादाची मुळे अशा प्रकारच्या सैद्धांतिक चौकटींमध्ये आहेत.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेची संरचना ही अत्यंत गुंतागुंतीची असून त्यातील विविध समष्टीय चलांचे व्यष्टीय पातळीला कपातीकरण करणे अतिसुलभीकरण करणारे आणि वास्तवाचा विपर्यास करणारे असते. केन्स (१९३६) ह्यांची अशा पद्धतीवरील बांधणीचा तर्कदोष ही टीका ह्याबाबतीत वैध आणि सबळ ठरते. त्यामुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे समग्र, व्यवस्थात्मक आणि संरचनात्मक विश्लेषण करण्याला पर्याय असू शकत नाही.

**आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाचा वर्चस्ववाद (Hegemony) आणि जनविरोधी धोरणे:**

भांडवलशाहीच्या इतिहासात सामूहिक मानवी प्रयत्नांतून जाणीवपूर्वक घडवून आणलेल्या आर्थिक मंदीचे हे एकमेव उदाहरण असावे. मंदीच्या काळात आर्थिक काटकसरीची धोरणे विसंगत (मंदीला चालना देणारी आणि ऋण शाश्वतता कमी करणारी) ठरत असतील तर मग अशी धोरणे राबवण्यामागे नेमके काय कारण असावे? राजकोषीय विस्ताराचे आणि ऋण पुनर्योजना/पुनर्रचना धोरण जर धनको आणि सामान्यजन दोहोंच्याही हिताचे (आणि लोकशाहीचे बळकटीकरण करणारे!) ठरणार असेल तरीही सामान्यजनांना दुर्दशेच्या स्थितीत ढकलणारी जनविरोधी धोरणे का लादली जातात? एकंदरीतच संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्था ही मंदीच्या स्थितीतून

जात असताना सार्वजनिक खर्चात घट केल्याने समग्र मागणीत घट होऊन आर्थिक व्यवहार पातळीची (आणि सामान्यांच्या जगण्याची!) अवस्था अधिक बिकट होणार असेल तर राजकोषीय जबाबदारी चा अट्टाहास का धरला जातो?

केन्स तसेच सेन, स्टिग्लीट्झ आणि क्रुगमन ह्यांसारख्या नवीन केन्सवादी आणि उत्तर केन्सवादी अर्थतज्ञांच्या मते अशा धोरणांच्या मुळाशी चुकीची सिद्धांतने असतात. मात्र प्रभात पटनाईक मांडणी करतात त्यानुसार ठराविक विचारसरणीचा (नवउदारमतवाद) / चुकीच्या सिद्धांतनांचा एखाद्या काळातील वर्चस्ववाद हा त्या काळातील अर्थराजकीय स्थितीचे विश्लेषण करून स्पष्ट करावा लागेल.

पटनाईकांसारखे मार्क्सवादी अर्थतज्ज्ञ सैद्धांतिक मांडणी करतात त्यानुसार समकालीन भांडवलशाहीमध्ये वित्तीय भांडवलाचे जागतिकीकरण झालेले असल्याने वित्तीय भांडवल हे राष्ट्र-राज्यांपेक्षा अधिक शक्तिशाली बनले असून राष्ट्र-राज्यांच्या विविध आर्थिक धोरणे स्वतंत्रपणे राबवण्याच्या क्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे. एका बाजूला जगातील कामगार वर्ग आणि सामान्य जनता विविध राष्ट्रीयतेनुसार विभागलेली असताना दुसऱ्या बाजूला वित्तीय भांडवल मूलतः आंतरराष्ट्रीय असल्याने ते वर्चस्ववाद प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेले आहे. अशा स्थितीमध्ये भांडवलावर कोणतेही निर्बंध उरत नसल्याने सार्वजनिक हिताचा विचार न करता जनतेला दुर्दशेत ढकलून स्वतःचा अल्पकालीन स्वार्थ साध्य करण्याची भांडवलाची उस्फूर्त हिंसक प्रवृत्ती (spontaneous bloody-mindedness) अशी विसंगत धोरणे लादू लागते. भांडवलशाहीच्या इतिहासामध्ये जेव्हा जेव्हा भांडवलाच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जनसमुदाय आणि कामगारवर्ग संघटीत झाला आहे तेव्हाच भांडवलाच्या ह्या उस्फुर्त हिंसक प्रवृत्तीवर काही निर्बंध येऊ शकले आहेत, उदाहरणार्थ महायुद्धोत्तर काळातील केन्सवादी मागणी व्यवस्थापनाची आणि पूर्ण रोजगार पातळी राखण्याची धोरणे त्या काळात राष्ट्रीय भांडवलाविरोधात संघटीत कामगारवर्गाने निर्माण केलेल्या समाजवादाच्या धोक्यामुळे राजकीयदृष्ट्या शक्य होऊ शकली.

त्रिकुटाने सक्त ताकीद देऊनही ग्रीक नागरिकांनी सिरीझा ह्या डाव्या विचारसरणीच्या काटकसर-विरोधी पक्षाला बहुमताने निवडून दिले. तसेच जनमतदर्शनात (संपूर्ण जनतेवर परिणाम करणारे आर्थिक धोरण स्वीकारण्याबद्दल/ नाकारण्याबद्दल त्याच जनतेचा कौल घेण्याच्या लोकशाही प्रक्रियेची नवउदारमतवादी अर्थतज्ञ आणि धोरणकर्ते जनानुनयवादी [populist] संबोधत हेटाळणी करतात!) नागरिकांनी बहुमताने मान्य नाही च्या बाजूने मतदान केले. आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाच्या वर्चस्ववादाला आव्हान देणारे जनराजकारण एवढ्या मोठ्या पातळीला निर्माण होण्याचे हे एकमेव उदाहरण असावे. तरीदेखील नुकत्याच झालेल्या करारानुसार नवीन आर्थिक मदतीच्या बदल्यात त्रिकुटाने काटकसरीच्या आणखी कडक अटी ग्रीसवर लादण्यात यश मिळवले आहे. जनमत विरोधात असतानादेखील आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाचे हितसंबंध जपणारी जनविरोधी धोरणे जेव्हा जनतेवर लादली जातात तेव्हा भांडवलाची व्यवस्थात्मक असलेली उस्फुर्त हिंसक प्रवृत्ती उघडी पडल्याशिवाय राहत नाही.

संदर्भ सूची:


1) Bernake B, 2015, *Germany's trade surplus is a problem*, Ben Bernake's Blog on www. brookings. edu, 3 April.
2) Daley S, 2015, *Gr-EEK! It's a loud 'No'! – Shock rebuff to Europe*, The Telegraph, 6 Jul.
3) Elliott L, 2015, *Bank of England Governor attacks eurozone's austerity*, The Guardian, 28 Jan.
4) European Commission, 2015, *European Economic Forecast*, Winter 2015.
5) European Union, 2015, *Preliminary Debt Sustainability Analysis for Greece,* 25 Jun.
6) Euro Summit, 2015, *Statement,* 12 Jul.
7) Galbraith J, 2015, *Greece Has Made Tough Choices. Now It's the IMF's turn*, Institute for New Economic Thinking Blog, 18 Jun.
8) Ghosh J, 2015, *Greek Tragedy that could have been Avoided*, The Frontline, 24 July.
9) International Monetary Fund, 2015, *Greece: An Update of IMF Staff's Preliminary Public Debt Sustainability Analysis*. 14 Jul.
10) Keynes J, 1936, *General Theory of Employment*, Interest and Money, Macmillan Publishers, Cambridge University Press.
11) King J, 2012, *The Microfoundations Delusions: Metaphor and Dogma in the History of Macroeconomics*, Edward Elgar Publishing Limited.
12) Koo R, 2015, *EU refuses to acknowledge mistakes made in Greek bailout*, Institute for New Economic Thinking Blog, 21 Jul.
13) Krugman P, 2015a, *Ending Greece's Nightmare*, The New York Times, 26 Jan.
14) Krugman P, 2015b, *Europe's Greek Test*, The New York Times, 30 Jan.
15) Krugman P, 2015c, *Ending Greece's Bleeding*, The New York Times, 5 Jul.
16) Krugman P, 2015d, *Disaster in Europe*, The New York Times, 12 Jul.
17) Krugman P, 2015e, *Europe's Impossible Dream*, The New York Times, 20 Jul.
18) Patnaik P, 2015a, *The Significance of Syriza's Victory*, People's Democracy, 1 Feb.
19) Patnaik P, 2015b, Das Kapital – *Greece and the bloody-mindedness of German Capitalism*, The Telegraph, 24 Feb.

20) Patnaik P, 2015c, *Misconceptions about Neo-Liberalism*, The Monthly Review, 17 May.

21) Patnaik P, 2015d, *Europe's Moment of Truth*, People's Democracy, 19 July.

22) Pyke A, 2013, *IMF Admits Major Errors in Greek Austerity Push*, www.thinkprogress.org, 6 Jun.

23) Roubini N, 2010, *Greece's best option is an orderly default*, The Financial Times, 28 Jun.

24) Sen A, 2015, *The economic consequences of austerity*, The New Statesman, 4 Jun.

25) Snowden B, Vane H, 1997, *A Macroeconomics Reader.* Routledge.

26) Stiglitz J, 2015, *How I would vote in the Greek referendum*, The Guardian, 29 Jun.

27) Storm S, Naastepad C, 2015, Myths, *Mix-ups and Mishandlings: What Caused the Eurozone Crisis? Paper written for the panel on "The Eurozone Crisis: Fiscal Profligacy or Capital Flows as Final Causes"*, in an Annual Conference of Institute of New Economic Thinking.

28) The Guardian, 2015, *Alexis Tsipras begins rolling back* Greek austerity policies. 28 Jan.

29) The New York Times, 2015, *Greece's Debt Crisis Explained.* 20 Jul.

30) Watt A, 2015, *Is Greek Debt Really Unsustainable?*, Occasional Paper, Macroeconomic Policy Institute and Social Europe.

31) *www.tradingeconomics.com*, 2015, Economic Indicators of Germany.

32) *www.tradingeconomics.com*, 2015, Economic Indicators of Greece.

# आर्थिक सुधारणा आणि कृषी क्षेत्राची कामगिरी

**सुभाष पाटील, पुणे**
प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,
भ्रमणध्वनी - ९८५०४३४५८९.

जुलै १९९१ पासून जो आर्थिक सुधारणा कार्यक्रम अमलात आणला त्यास सुधारणांचे नवे पर्व असे म्हणता येईल. या आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचे उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण हे महत्त्वपूर्ण पैलू असून यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल व त्याचे लाभ सर्व भारतीयांना मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात येत होती. म्हणून हा कार्यक्रम अर्थव्यवस्थेतील उद्योग, व्यापार व सेवा क्षेत्राबरोबरच वित्त क्षेत्रालाही लागू करण्यात आला होता. आज आर्थिक सुधारणा कार्यक्रमाला पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. आर्थिक सुधारणोत्तर काळात एकीकडे भारतातील आर्थिक वृद्धीदर, विदेशी विनिमय, माहिती तंत्रज्ञान क्रांती, निर्यात वृद्धी यांत उल्लेखनीय सुधारणा होत आहे. यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था जगात जलद गतीने वृद्धींगत होणारी अर्थव्यवस्था म्हणूनही ओळखली जात आहे. तर दुसरीकडे विकासाचे लाभ सर्व भारतीयांना समानतेने होताना दिसत नाहीत. आर्थिक व सामाजिक विषमतेसोबतच दारिद्र्य, बेकारी, शिक्षण व आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा आणि शेती क्षेत्राची मंदावणारी कामगिरी इत्यादी समस्या भेडसावत आहेत (देव २००८). या काळात औद्योगिक व सेवा क्षेत्राची प्रगती होत असताना कृषीक्षेत्र मात्र विकासापासून वंचित असल्याचे दिसते. प्रस्तुत लेखातून आर्थिक सुधारणा काळातील कृषी क्षेत्राची कामगिरी, सद्यस्थिती आणि आव्हाने या विषयीचा आढावा घेतला आहे.

## आर्थिक विकास प्रक्रियेत कृषीचे स्थान:

सर्वसाधारणपणे आर्थिक विकास म्हणजे औद्योगिक क्षेत्राची वाढ व त्या अनुषंगाने औद्योगिक क्षेत्रातील रोजगारनिर्मिती असे गणित मांडले जाते. तसेच कृषीक्षेत्रामधील अतिरिक्त मन्युष्यबळ औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये

सामावले जाऊन दारिद्र्य निर्मुलनाचे काम पार पाडले जाईल असा विचार प्रस्तृत केला जातो (पाध्ये २०१५). आज जागतिक अर्थव्यवस्थेनुसार देशांचे गरीब, विकसनशील व विकसित असे तीन गट पाडले जातात. निरीक्षणानुसार गरीब देशांच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा हिस्सा २६ टक्के, उद्योगांचा ३९ टक्के, तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ३५ टक्के इतका आहे. विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेत हेच प्रमाण अनुक्रमे १३ टक्के, ३५ टक्के आणि ५२ टक्के इतके आहे. विकसित देशात मात्र शेतीचा हिस्सा कमी होत जाऊन (जवळपास दोन टक्के), उद्योग (३२ टक्के) व सेवा क्षेत्र (६६ टक्के) विकसित होत जाते (घैसास २०१५).

भारताच्या बाबतीत मात्र थोडासा वेगळा प्रकार घडला. भारतात अनेक व्यवसायांपैकी कृषी व्यवसाय हा सर्वात जुना व परंपरागत व्यवसाय असून आर्थिक नियोजनाच्या सुरूवातीस म्हणजे १९५०-५१ मध्ये कृषीचा हिस्सा ५६ टक्के तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ३० टक्के होता. सद्यस्थितीत कृषीचा हिस्सा १५ टक्के कमी होऊन सेवा क्षेत्राचा हिस्सा ६० टक्केपेक्षा अधिक आहे. आर्थिक सुधारणा काळात औद्योगिक क्षेत्राचा वाटा जवळपास २५ टक्के इतका आहे. १९५०-५१ मध्ये तो १५ टक्के इतका होता. नियोजनकाळात झालेल्या औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या विकासाचा परिणाम म्हणून कृषी क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार व निर्यातीतील हिस्सा कमी झाला आहे. आर्थिक विकास प्रक्रियेत असे होणे अपेक्षित असते. आर्थिक सुधारणा काळात औद्योगिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा भरमसाठ वापर वाढल्यामुळे रोजगारनिर्मिती अत्यंत कमी वेगाने होत असते, ही वास्तव स्थिती विचारात घेऊन शेती क्षेत्रातील अतिरिक्त मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रामध्ये सामावून घेतले जाण्यावर प्रचंड मर्यादा पडतात. त्यामुळे कृषीक्षेत्रातील बेरोजगारी अधिक वाढत जाऊन कृषी विकासालाही मर्यादा येत आहे.

आर्थिक सुधारणा काळात शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा समान विकास अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र उद्योग व सेवा क्षेत्राचा झपाट्याने विकास होत जाऊन कृषी विकासाचा वेग मंदावत असल्याचे दिसून येते. पर्यायाने ग्रामीण व नागरी भारतातील विषमता वाढत असल्याचे दिसते. कृषीक्षेत्रावर अवलंबून असलेले आदिवासी, ग्रामीण शेतमजूर, असंघटित कष्टकरी, कोरडवाहू अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यासारखा घटक विकासापासून वंचितच असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर नियोजन कालावधीतील विकास प्रणालीपासूनही नेमका हाच घटक वंचित राहिलेला दिसतो. वस्तुत: आर्थिक सुधारणा काळात या घटकांमध्ये विकास होणे अपेक्षित आहे.

**कृषीक्षेत्राची कामगिरी व सद्यस्थिती:**

स्वातंत्र्योत्तर काळातही बऱ्याच कालावधीपर्यंत भारतीय कृषीचे स्वरूप मागास होते. हरितक्रांतीपूर्व काळात (१९५०-५१ ते १९६४-६५) अन्नधान्याच्या टंचाईची समस्या होती. मात्र हरितक्रांतीच्या यशानंतर कृषी विकासात बरीच सुधारणा झाली अर्थात यामुळे एकूण कृषी उत्पादनात व उत्पादकतेत वाढ झाली. १९५१ ते २०११ या काळात अन्नधान्याचे उत्पादन जवळपास पाच पटीने तर कडधान्याचे उत्पादन दोन पटीने वाढले. नियोजनकालीन विकास कार्यक्रमामुळे लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र वाढून उत्पादन व उत्पादकता वाढण्यास मदत

झाली. हरितक्रांतीमुळे गहू व तांदूळ या पिकांच्या दर हेक्टरी उत्पादकतेत प्रचंड सुधारणा झाली. अन्नधान्याच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण झाला. पारंपरिक शेती उत्पादनाबरोबरच व्यापारी पिकांचेही उत्पादन वाढले. अन्नधान्य पिके, फळे, फुले, भाजीपाला यात वैविध्यता आली. नियोजनकाळात झालेली पायाभूत संरचनेतील भरीव सार्वजनिक गुंतवणूक, भूमी सुधारणा व ग्रामीण विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणीमुळे कृषीविकास होऊ लागला (नायर २०१५). मात्र हरितक्रांतीचे यश निवडक पिके व राज्यांपुरते मर्यादित राहिले.

केवळ अर्थव्यवस्थेच्या सार्वत्रिक वृद्धीदरात वाढ होण्यासाठी नव्हे, तर शेतीवर आधारित बहुतांश लोकसंख्येकरीता व शेतीआधारित उद्योगातील रोजगार वृद्धीसाठी आणि देशातील अन्नसुरक्षिततेसाठी कृषी क्षेत्राच्या कामगिरीत उत्तरोत्तर सुधारणा होत जाणे आवश्यक आहे. अकराव्या पंचवार्षिक योजनेत नमूद केलेल्या सर्वसमावेशक वृध्दी दृष्टीकोनात सुध्दा कृषी विकासाला महत्त्वपूर्ण घटक म्हणून संबोधण्यात आले आहे. १९९१ मध्ये भारतात संरचनात्मक सुधारणा व स्थिरीकरण धोरण अमलात आले. यात उद्योग, करसुधारणा, विदेशी व्यापार व गुंतवणूक बँकिंग व भांडवल बाजाराला केंद्रित करण्यात आले. या आर्थिक सुधारणा कार्यक्रमात शेती विकासासाठी विशिष्ट पॅकेजचा समावेश नव्हता. मात्र या कार्यक्रमामुळे कृषी वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ खुली करणे, जैव तंत्रज्ञानाचा वापर करणे, जलसिंचनातील व बाजारातील खाजगी गुंतवणूक वाढविणे, साठवणूक व वाहतूक यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास होऊन कृषी क्षेत्राचा लाभ मिळणे अपेक्षित होते. यामुळे कृषी आणि बिगर कृषी क्षेत्रातील व्यापारशर्तींचा कृषीला लाभ मिळणे अपेक्षित होते. १९९१ ते १९९७ या कालावधीत कृषी वृध्दीदर प्रतिवर्षी ३.७ टक्के इतका होता. याच कालावधीत व्यापारशर्ती कृषी क्षेत्राला लाभदायक ठरल्या. याची प्रमुख कारणे म्हणजे उद्योगांवरील संरक्षण दूर केले, रूपयाचे अवमूल्यन आणि किमान आधारभूत किंमतीतील वाढ इत्यादी होय. याच कालावधीत कृषी क्षेत्राच्या निर्यातीत ३.२ अब्ज डॉलर वरून ६.८६ अब्ज डॉलर पर्यंत वाढ झाली. मात्र त्यानंतर कृषी विकासाचा दर घटण्यास सुरूवात झाली. १९९१ ते ९७ या कालावधीतील कृषी वृध्दीदर प्रतिवर्षी ३.७ टक्के इतका असतांना १९९७ ते २००५ या कालावधीत तो जवळपास २ टक्के म्हणजे निम्म्याने कमी झाला. ११ व्या योजनेच्या सुकाणू समितीच्या अहवालानुसार सार्वजनिक गुंतवणूकीतील घट, खासगी गुंतवणूकीतील अल्पशी वाढ, जलसिंचन क्षेत्रातील अल्पशी वाढ, तंत्रज्ञानाचा अल्प वापर, कृषीचे विविधीकरण आणि रासायनिक खतांचा अतिवापर यामुळे कृषी विकासाचा दर मंदावला आहे (देव २००८). २००५ नंतरच्या काळात कृषी उत्पादनात घट झाल्याने कृषी मालाच्या किंमतीत वाढ होऊ लागली. जानेवारी २००८ ते जुलै २०१० या काळात कृषी वस्तूंची सरासरी किंमतवाढ दर १०.२० टक्के तर एप्रिल २०११ ते मार्च २०१३ या काळात ७.६४ टक्के इतका होता (नायर २०१५). किमान आधारभूत किमतीतील वाढ खुल्या बाजारात कृषी वस्तूंसाठीची वाढलेली मागणी, शेती उत्पादन खर्चात वाढ, कृषी

आदानांच्या किंमतीतील वाढ यामुळे कृषी मालाच्या किमतीत वाढ होऊ लागली आणि पर्यायाने व्यापारशर्ती कृषीक्षेत्राला अनुकूल ठरु लागल्या. कृषी उत्पादन व उत्पादकता दर कमी झाल्याने व लोकसंख्या वाढीने अन्धान्याची व कडधान्याची प्रतिमाणशी उपलब्धतेत घट होत आहे. एकीकडे शेती विकासाचा दर मंदावत आहे तर दुसरीकडे शेती उत्पादनाचा वाढता खर्च, कर्जासाठी सावकारावरील अवलंबित्व, शेतमालाची किंमत कमी, खर्च व किंमतीतील अंतर या व अन्य कारणांमुळे शेती करण्याची समस्या निर्माण होते.

**कृषीक्षेत्रासमोरील आव्हाने:**

भारतात आजही ५५ टक्के पेक्षा अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेतीवर अवलंबून आहे. भारतात औद्योगिकीकरण वेगाने वाढत आहे. पण या वाढत्या औद्योगिकीकरणात शेतीवरील भार कमी होण्याऐवजी वाढतो आहे. कारण औद्योगिक विकासाचे जसे धोरण आहे तसे शेतीविकासाचे नाही. आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे लागवडयुक्त जमिनीचे क्षेत्रफळ कमी होत जाणार आहे. तर दुसरीकडे वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीवरील ओझे कमी होण्याची लक्षणे नाहीत. राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा कमी झाला असला तरी उत्पन्नातील वाटेकरी मात्र कमी झालेले नाहीत.

भारतात प्रादेशिक स्तरावर कृषी विकास रचनेत प्रचंड तफावत आहे. भारतातील एकूण भौगोलिक क्षेत्रफळापैकी ४४ टक्के जमीन प्रत्यक्ष पिकांच्या लागवडीखाली आहे. यापैकी ६७ टक्के जमीन जिरायती असून त्यापासून मिळणारे उत्पन्न पूर्णत: निसर्गावर अवलंबून आहे. कृषीव्यवसायाचे अनिश्चित स्वरूप, जमिनीच्या सुपीकतेतील व हवामानातील भिन्नता, पिकांची विविधता, मशागतीच्या पद्धतीतील विविधता यामुळे प्रादेशिक विषमता दिसून येते. पर्यायाने कृषी विकास रचनेत व उत्पादकतेत तफावत आढळते. भारतात जलसिंचनाखालील जमिनीचे क्षेत्रफळ केवळ ३३ टक्के इतके आहे. त्यातही जमिनीवरील आणि जमिनीखालील जलपातळीत सातत्याने घट होत आहे. सरासरी जमीन धारणा आकार कमी होत जाऊन अत्यल्प व अल्प भूधारकांच्या संख्येत वाढ होत जाऊन त्याचा शेती उत्पादन आणि उत्पन्न याच्यावर विपरित परिणाम होताना दिसतो आहे.

आर्थिक सुधारणा काळात कृषीक्षेत्रातील गुंतवणुकीचे प्रमाण कमी झाले. एकुण GDP च्या केवळ दोन टक्के गुंतवणूक कृषीक्षेत्रात होताना दिसते. खासगी गुंतवणुकीचे प्रमाण कमी असल्याने कृषी विकासाच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत संरचनाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले आहे. कृषीउत्पादनाचा वाढता खर्च, त्या मानाने शेतमालाची किंमत कमी यामुळे शेतकऱ्यांचे अर्थशास्त्र बिघडत आहे. दुष्काळामुळे तर शेतकऱ्यांनी जगण्यालाच आव्हान दिले आहे. पर्यायाने शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा आकडा सातत्याने वाढतो आहे.

सद्यस्थितीतील एक महत्वपूर्ण समस्या म्हणजे हवामान बदल. कृषी, वनीकरण आणि मासेमारी यासारख्या व्यवसायांवर हवामान बदलाचा विपरित परिणाम होताना दिसतो. ओला दुष्काळ वा कोरडा दुष्काळ, पूर परिस्थिती यामुळे अर्थव्यवस्थेत अन्नसुरक्षिततेचा आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनतो. सातत्याने पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. अनुकूल हवामान, पुरेसा पाऊस,

रोगमुक्त पिके, भरपूर उत्पादन व किफायतशीर भाव या घटकांचा मेळ कधीच जमून येत नाही.

**कृषीविकासाचे धोरण:**

अधिक मूल्य असलेल्या वस्तूंचे विविधीकरण करुन आणि भूमी व श्रमिकांची उत्पादकता वाढवून कृषी क्षेत्राच्या वाढीचा दर किमान चार टक्के करणे, लहान व सीमांत शेतकरी, कृषी महिला व विकासाच्या बाबतीत मागास प्रदेश यावर लक्ष केंद्रित करून त्यांना कृषी विकासाचे लाभ मिळवून देणे आणि पर्यावरणीय सबंधित घटक विचारात घेऊन कृषी शाश्वतता राखणे ही कृषी विकासाची मुख्य उद्दिष्टे आहेत (देव २००९). या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी उत्पादक व उपभोक्ते यांच्या संरक्षणासाठी योग्य किंमत धोरण निर्धारित करणे जलसिंचन प्रकल्पांची कार्यक्षम उभारणी करून कोरडवाहू शेतकरी, अल्पभूधारक व सीमांत शेतकरी यांना पाण्याचे कार्यक्षम वाटप करणे, उत्पादन खर्चानुसार शेतमालाला योग्य भाव देणे, कृषी तंत्रज्ञानाच्या व यांत्रिकीकरणाच्या वापरासाठी प्रेरणा, रास्त किंमतीत कृषी आदानांचा पुरवठा, कृषी वित्तपुरवठ्यात सार्वजनिक संस्थाचा सक्रिय सहभाग, दुष्काळ निवारणासाठी दीर्घकालीन उपाययोजना, ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान व जीवनशैली सुधारण्यासाठी शेतीचे औद्योगिकरण करणे इत्यादी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी स्थायी व्यूहरचना आखली पाहिजे. कारण स्वयंपूर्ण व स्वयंचलित आर्थिक विकासासाठी कृषीविकास होणे नितांत आवश्यक आहे.

**सारांश:**

आज भारतीय अर्थव्यवस्था जगात जलद गतीने वृध्दिंगत होणारी अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात आहे. आर्थिक सुधारणा काळात औद्योगिक व सेवाक्षेत्राची प्रगती होत असताना कृषीक्षेत्र मात्र विकासापासून वंचित असल्याचे दिसते. केवळ अर्थव्यवस्थेच्या सार्वत्रिक वृद्धीदरात वाढ होण्यासाठी नव्हे, तर शेतीवर आधारित बहुतांश लोकसंख्येकरीता व शेतीआधारित उद्योगातील रोजगार वृद्धीसाठी आणि देशातील अन्नसुरक्षिततेसाठी कृषीक्षेत्राच्या कामगिरीत उत्तरोत्तर सुधारणा होत जाणे आवश्यक आहे. कृषीविकासाच्या मुख्य उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्थायी व्यूहरचनेची आखणी व प्रभावी अंमलबजावणी होणे नितांत आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


1. Dev S. Mahendra, *Structural Reform and Agriculture-Issues and Policies*, Keynote paper for the 92th Annual Conference of the Indian Econmic Association, 27-29 December 2009.
2. Dev S. Mahendra, *Challenges for revival of Indian Agriculture* National Centre for Agricultural Economics and Policy Research , New Delhi, 2008.
3. Nair and Eapen, *Agrarian Performance and Food Price Inflation in India: Pre and Post Economic Liberalisation* Economics and Political Weekly, August 2015, Vol.1 No.31, Pp.49-60.

४. अर्थपूर्ण, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा.लि., पुणे, जून २०१३, वर्ष ३, अंक ६.

५. घैसास दीपक, *अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र*, दैनिक लोकसत्ता, २९ मे २०१५, पृ. ७

६. जोशी, रातजनकर रघुनाथ, *शेतीचे हवे - औद्योगिकरण*, महाराष्ट्र टाईम्स, २३ ऑगस्ट २०१५, पृ. ११

७. पाध्ये रमेश, *कृषी क्षेत्रासाठी मेक इन इंडिया*, दैनिक लोकसत्ता, २८ मे २०१५, पृ. ७

## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा

**ऑक्टोबर - डिसेंबर २०१५ अंकासाठी त्वरित लेख पाठवा**

*आर्थिक, सैध्दान्तिक, नवीन संकल्पना, नवं संशोधन.... असं काही ना काही अनेकांपर्यंत पोचावं असं वाटतं ना? तर मग उचला लेखणी अन् व्यक्त करा आपले विचार.... 'अर्थसंवाद' च्या माध्यमातून.... तुमच्या लेखनाचं इथं स्वागत आहे....*

फक्त एवढंच् करा....

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 अथवा PageMaker 7 सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 व लिडींग 17 असावी. गरज असल्यास एखादा तक्ता घ्यावा. लेखातील तक्त्याचा आकार सामान्यपणे अर्धा कागद इतका असावा. तक्त्याची रुंदी १३ सें.मी.पेक्षा जास्त नसावी.
- PageMaker 6.5 किंवा 7 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा. MS-Word किंवा PDF मध्ये लेख पाठवू नयेत. आवश्यक असेल तरच इंग्रजी प्रति-शब्द द्यावा.
- दोन हार्डकॉपीज् व एक सॉफ्टकॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे पाठवणे आवश्यक आहे.
- एक सॉफ्ट कॉपी ई-मेल द्वारे प्रमुख संपादकाकडे awinashnikam@gmail.com या ई-मेल अॅड्रेसवर पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक लिहिणे आवश्यक आहे.
- लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.
- लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुध्दलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी.
- संदर्भ सूची देताना पुढील पध्दतीने देणे आवश्यक आहे: कुरुलकर र. पु., *महाराष्ट्राची अर्थव्यवस्था*, प्रथमावृत्ती, २००६, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.१०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# महाराष्ट्रातील महिला विकास : एक दृष्टिक्षेप

**तेजस्विनी बी. मुडेकर,** कोल्हापूर,
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
कमला कॉलेज.
भ्रमणध्वनी: ९६०४३४३४००
ई-मेल: tbmudekar@gmail.com

भारतात असणारी पितृप्रधान समाज व्यवस्था, स्त्रियांना समाजात असणारे निकृष्ट स्थान यामुळे लोकसंख्येतील स्त्री हा एक मोठा घटक उपेक्षित राहिला आहे. विकास प्रक्रियेपासून हा घटक दूर रहाणे हे कोणत्याही समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीच्या दृष्टीने हितकारक नाही. म्हणूनच केंद्र व राज्य सरकारांनी महिलांना मुख्य प्रवाहात सामिल करून घेण्यासाठी खास धोरणे आखली आहेत. तसेच महिला विकास योजना राबविल्या आहेत.

महाराष्ट्राच्या जडण-घडणीत स्त्रियांचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राला स्त्री चळवळीची मोठी परंपरा आहे पण आज या पुरोगामी महाराष्ट्रासाठी घटते स्त्री-पुरूष प्रमाण, स्त्रियांवरील अत्याचाराची वाढती आकडेवारी निश्चितच भूषणावह नाही.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी :

अनेक स्त्रियांच्या त्यागाने, समर्पणाने व हुशारीने महाराष्ट्राला घडविले आहे. त्यात शिवरायांना हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठी घडविणाऱ्या जिजाबाई, निर्भिडपणे राज्यकारभार करणाऱ्या अहिल्याबाई होळकर, राजारामांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाशी निकराने झुंज देणाऱ्या महाराणी ताराराणी, सत्यशोधक चळवळीतील ताराबाई, स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, पहिली भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांचा वाटा मोलाचा आहे.

एकोणिसाव्या शतकात समाज सुधारकांनी व अनेक कर्तबगार स्त्रियांनी, स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी विशेष प्रयत्न केला. विसाव्या व एकविसाव्या शतकात स्त्री चळवळीने जोर धरला असून समाजसुधारक, स्वयंसेवी संस्था व शासन हे तीनही घटक स्त्री सक्षमीकरणासाठी झटत आहेत. ज्या महान व्यक्तींनी महिला विकासाचा पाया घातला त्यांचा

थोडक्यात आढावा घेऊ. समाजसुधारकांबरोबरच सुरवातीस काही मिशनऱ्यांनीही महिला विकासासाठी प्रयत्न केला आहे.

सती प्रथा, बाल विवाह, विधवा विवाहास प्रतिबंध, भिन्न जातीमधील रोटी-बेटी व्यवहारावर निर्बंध, अस्पृश्यता या सारख्या मानवतेला काळीमा फासणाऱ्या प्रथांविरूद्ध समाज सुधारकांनी आवाज उठवला व जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला. सन १८१५ मध्ये मिशनऱ्यांनी मुंबई शहरात अनाथ मुलामुलींसाठी एक प्राथमिक शाळा काढली. १८१९ मध्ये कोलकाता येथे जी मिशनरी शाळा सुरू केली त्या शाळेत काही मुली दाखल झाल्या होत्या. १८२४ मध्ये ख्रिस्ती मिशनऱ्यांनी मुलींची शाळा सुरू केली. लॉर्ड बेटिंग याने सन १८२९ मध्ये सतीची चाल बंद करणारा कायदा केला. त्यामुळे समाजात असंतोष माजला अशावेळी जगन्नाथ शंकरशेठ यांनी महाराष्ट्रात या कायद्याच्या बाजूने लोकमत तयार केले.

महाराष्ट्रात महात्मा फुले यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींची शाळा सुरू करून खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाचा पाया घातला. स्वतःच्या पत्नी सावित्रीबाईंना लिहिणे-वाचणे शिकवून मुलींना शाळेत शिकविण्याची जबाबदारी सोपविली. १८६३ मध्ये फुल्यांनी बालहत्या प्रतिबंध गृहांची स्थापना करून विधवा स्त्रियांना दिलासा दिला. विष्णू शास्त्री पंडितांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या विधवा विवाह या ग्रंथाचा मराठीत अनुवाद केला. सरकारने १८५६ मध्ये विधवा विवाहाला मान्यता देणारा कायदा संमत केला. १८५६ मध्ये विष्णू शास्त्री यांनी पुनर्विवाहोत्तेजक मंडळाची स्थापना केली. १८६९ मध्ये या मंडळाच्या वतीने पहिला विधवा विवाह झाला व १८७४ मध्ये स्वतः विधूर झाल्यानंतर विधवेशी विवाह केला. १ मे १८८२ मध्ये पंडिता रमाबाईंनी आर्य महिला समाज नावाची संस्था स्थापन केली. त्यांनी बालविवाह प्रथेवर १८८७ मध्ये दि हाय कास्ट हिंदू वूमन नावाचे पुस्तक लिहिले. १८८९ मध्ये मुंबईत निराश्रित विधवा व अनाथ स्त्रियांसाठी शारदा सदन नावाची संस्था सुरू केली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १८९३ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळी या संस्थेची स्थापना केली. १८९६ मध्ये पुण्यात विधवा स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी अनाथ बालिकाश्रम मंडळी या संस्थेची स्थापना केली. पंडिता रमाबाईंनी १८९८ मध्ये पुण्याजवळील कडेगांव येथे अनाथ मुली व स्त्रियांच्या कल्याणार्थ मुक्तिसदन स्थापन केले. कर्वे यांनी स्त्रियांना नित्योपयोगी शिक्षण देण्याच्या उद्देशाने १९०७ रोजी महिला विद्यालय स्थापन केले. ३ जून १९१६ रोजी हिंगणे येथे स्वतंत्र महिला विद्यापीठ स्थापन केले. पुढे त्याच विद्यापीठाचे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठात रूपांतर झाले. १९१८ मध्ये पुण्यात कन्याशाळेची स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात विधवा पुनर्विवाह कायदा व आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. अस्पृश्यता निवारणासाठी प्रयत्न केले. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी १९२१ मध्ये संतती नियमनाचे केंद्र चालविले. त्यांच्या पत्नीही त्यांना सहाय्य करीत असत. डॉ. भांडारकरांनी हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाहाचे वय व विवाह संबंध या वरील टिपण अशा आशयाची पुस्तिका इंग्रजीतून प्रसिद्ध केली.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी वैयक्तिक व संस्थेच्या माध्यमातून, समाजाचा विरोध पत्करून समाज सुधारक स्त्री-पुरुषांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर राज्य घटनेनेच स्त्री-पुरुषांना समान हक्क दिले. केंद्र व राज्य स्तरावर समाज कल्याण खाते निर्माण केले. शैक्षणिक क्षेत्रात व नोकरीत स्त्रियांना ३०% आरक्षण मिळाले. महिला आर्थिक विकास महामंडळ, राज्य महिला आयोग यांची स्थापना व महिला विकास धोरणाच्या अंमलबजावणी या द्वारे महिला विकासासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे.

**महाराष्ट्राची महिला विषयक आकडेवारी:**

महाराष्ट्रातील महिला विषयक सांख्यिकी पुढील प्रमाणे-

१. लोकसंख्येतील स्त्रियांचे प्रमाण - १९६१ मध्ये महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण ४८.३५ टक्के होते. २००१ मध्ये ४७.९८ टक्के झाले. २०११ च्या जनगणनेनुसार हे प्रमाण ४८.४२ टक्के झाले. स्त्रियांचे हे घटणारे प्रमाण ही बाब निश्चितच महाराष्ट्राच्या दृष्टीने स्वागतार्ह नाही.

२. स्त्री-पुरुष प्रमाण - महाराष्ट्रात १९६१ मध्ये प्रति हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३६ होते. २००१ च्या जनगणनेत ते ९२२ झाले. २०११ मध्ये ते ९२५ झाले. स्त्री-पुरुष प्रमाणात महाराष्ट्राचा देशात २२ वा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे मणिपूर, मेघालय, ओरिसा, मिझोराम, त्रिपुरा यासारखी महाराष्ट्रापेक्षा तुलनेने मागास राज्ये स्त्री-पुरुष प्रमाणात महाराष्ट्रापेक्षा पुढे आहेत.

३. ० ते ६ वयोगटातील स्त्री-पुरुष प्रमाण - राज्यात ० ते ६ वयोगटातील स्त्री-पुरुष प्रमाण १९९१ मध्ये ९४६ होते. २००१ मध्ये ९१३ झाले व २०११ च्या जनगणनेनुसार ते ८८३ पर्यंत घसरले. राष्ट्रीय सरासरीपेक्षा ते कमी आहे. बालिकांचे हे घटणारे प्रमाण ही एक महाराष्ट्राच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे.

४. साक्षरता - १९६१ मध्ये महाराष्ट्रात स्त्री साक्षरता १९.८० टक्के होती. २००१ च्या जनगणनेत ती ६७.५१ टक्के झाली तर २०११ च्या जनगणनेत ती ७५.४८ टक्के आहे. स्त्री साक्षरता दर वाढत आहे ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु अजुनही २५ टक्के स्त्रिया निरक्षर आहेत ही बाब दुर्लक्षुन चालणार नाही. महाराष्ट्रात मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाते. २०१३-१४ मध्ये ९६,१७८ प्राथमिक शाळा (वर्ग १ ली ते ८ वी) असून १.६२ कोटी विद्यार्थी शिक्षण घेतात, त्यापैकी ४६.८ टक्के मुली आहेत.

५. मानव विकास निर्देशांक - भारत मानव विकास अहवाल २०११ नुसार भारताचा मानव विकास निर्देशांक ०.४६७ व महाराष्ट्राचा ०.५७२ आहे. राज्यांतर्गत तुलना करता भारतात महाराष्ट्राचे स्थान ५ वे आहे. महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक २०१२ नुसार महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक ०.७५२ आहे.

६. आर्युमर्यादा - २००२ ते २००६ या कालावधीतील सरासरी विचारात घेता स्त्रियांची आयुर्मर्यादा ६८.४ वर्षे आहे.

७. सुविधा - कौटुंबिक सुविधेच्या बाबतीत स्त्रियांच्या दृष्टीने गरजेची बाब म्हणजे स्नानगृहे व शौचालये ही आहे. २०१२-१३ च्या आर्थिक पहाणीनुसार नागरी भागात ४.६ टक्के व ग्रामीण भागात २२.९ टक्के कुटुंबांकडे स्नानगृहाची सोय नाही. ३४ टक्के कुटुंबांना उघड्यावर शौचास जावे लागते.

**महिला आर्थिक विकास महामंडळ:**

महिला आर्थिक विकास महामंडळ ही महिला विकासाच्या सर्व योजना राबविण्यासाठी शिखर संस्था म्हणून घोषित करण्यात आली आहे. या महामंडळाची स्थापना २४ फेब्रुवारी १९७५ रोजी झाली असून महिलांच्या सुप्त गुणांना वाव देऊन त्यांच्यामध्ये असणाऱ्या क्षमता वाढविणे, त्यांच्यामधील उद्योजकीय जाणीवा विकसित करणे, त्यांना अद्ययावत प्रशिक्षण देणे, रोजगार संधी व बाजारपेठ यांची सांगड घालणे आणि महिलांना आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करण्यास प्रवृत्त करणे या उद्देशाने हे महामंडळ कार्यरत आहे. या महामंडळामार्फत महिला विकासासाठी पुढील योजनांची आखणी केली जाते.

महिलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम, स्टेप योजना, स्वयंसिद्धा प्रकल्प, स्वर्ण जयंती ग्राम रोजगार योजना, स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना, स्वयं सहाय्यता बचत गटाचे महासंघ, रमाई महिला सक्षमीकरण योजना, कृषी सप्तक योजना, तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम या उपक्रमांबरोबरच शासनास महिला विकास योजनांसंदर्भात सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचे कार्य महामंडळाकडून केले जाते. महामंडळास योजना राबविण्यासाठी २०१४-१५ साठी १९.०८ कोटी रु. चा निधी प्राप्त झाला असून डिसेंबर २०१४ पर्यंत ८.९३ कोटी रु. खर्च झाले आहेत.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग:**

२५ जानेवारी १९९३ रोजी राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. महिलांसाठी राजकीय, आर्थिक, मानसिक आणि सांस्कृतिक समानता प्रस्थापित करणे, महिला विषयक कायद्यात आवश्यक त्या सुधारणा सुचविणे, महिला विषयक धोरण आखण्यासाठी राज्य शासनास सूचना देणे, गरीब व पीडित महिलांना मोफत कायदेशीर सल्ला देणे, स्त्रियांवर होणारे अत्याचार, हुंडाबळी, लैंगिक छळ इ. प्रकरणी तपास करणे, महिला जागृती मेळावे, लोक न्यायालय, समुपदेशन याद्वारे महिलांना मार्गदर्शन करणे. महिला सुधारगृहे, तुरुंग यांची तपासणी व त्यात सुधारणा सुचविणे ही कार्यकक्षा महिला आयोगाची आहे.

**महाराष्ट्र शासनाचे पहिले महिला विषयक धोरण (१९९४):**

महाराष्ट्राने १९९४ मध्ये महिला विकास धोरण जाहीर केले आणि असे धोरण जाहिर करणारे ते भारतातील पहिले राज्य ठरले. आजपर्यंत स्त्रियांबाबतचा दृष्टीकोन प्रामुख्याने कल्याणकारी होता. ती जागा हळूहळू विकसनशील दृष्टिकोनाने घेतली. विकासाच्या संकल्पने बरोबरच सहभागाची संकल्पना आली. महाराष्ट्र राज्य हे पंचायत राज्य सुधारणा अमलात आणणारे पहिले राज्य ठरले.

**महिला धोरणाची उद्दिष्ट्ये:**

१. राज्यातील स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारून त्यांना सर्व क्षेत्रामध्ये समानता प्रस्थापित करून देणे.

२. स्त्रियांच्या बौद्धिक व व्यक्तिगत क्षमतांचा विकास करण्याच्या मार्गातील जे सामाजिक, आर्थिक व राजकीय अडथळे आहेत ते दूर करण्यासाठी शासनाने आपली सर्व शक्ती पणाला लावणे.

३. आजच्या सामाजिक गरजा व वास्तव

डोळ्यासमोर ठेवून समाजातील स्त्री-पुरुषांच्या भूमिका संबंधी प्रचलित परंपरा बदलण्यासाठी झटणाऱ्या संघटना व व्यक्तींना मदत करणे.

४. समाजातील एक उत्पादक घटक या नात्याने पुरुषांच्या बरोबरीने अधिकार व जबाबदाऱ्या पेलणाऱ्या एका पुरोगामी राष्ट्राची नागरिक म्हणून महिलांची ओळख निर्माण करणे.

महिलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने सरकारने या काळात खालील बाबींवर लक्ष केंद्रीत केले जाईल असे जाहीर केले, महिलांवरील अत्याचाराचे निर्मुलन करण्यासाठी पावले उचलणे, कायदेशीर समान हक्कांची, मुख्यतः प्रकट व अभिप्रेत अशा दोन्ही स्तरावर स्थापना करणे, महिलांच्या आर्थिक दर्जामध्ये सुधारणा घडवून आणणे, प्रसार माध्यमांचा योग्य पद्धतीने वापर, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये व सहकारी संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, शासनाच्या कामकाजात अशासकीय संस्थांचा सहभाग वाढविणे इ.

**महिला विषयक दुसरे धोरण (२००१):**

महिलांचा सहभाग, त्यांना संरक्षण, आर्थिक उन्नती, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन आणि या सर्वांसाठी अनुकूल वातावरण निर्मिती करण्याच्या उद्देशाने सन २००१ मध्ये नवे महिला धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणाची प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे-

१. कृषी व ग्रामीण विकासासंबंधी कार्यक्रम महिलांना केंद्रस्थानी ठेवून तयार करणे.

२. शासकीय, निमशासकीय व शासनाचे अनुदान मिळणाऱ्या सर्व संस्थांमध्ये महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी कृती कार्यक्रम तयार करणे.

३. महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे.

४. स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून आर्थिक विकास साध्य करणे.

५. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे.

**महिला विषयक तिसरे धोरण (२०१३):**

दुसरे महिला धोरण जाहीर होऊन एक तप लोटले. या काळात सामाजिक आर्थिक व समाजाच्या मानसिकतेत बदल घडून आले त्याला अनुसरून ८ मार्च २०१३ रोजी हे तिसरे धोरण जाहीर करण्यात आले.

तिसऱ्या महिला धोरणाची उद्दिष्टे-

१. महाराष्ट्रातील महिलांच्या सर्वांगिण विकास व सक्षमीकरणासाठी प्रागतिक दृष्टीकोन रूजविणे व पुरुष प्रधान मानसिकता बदलणे.

२. सर्वच क्षेत्रात महिलांना समान संधी उपलब्ध करून देणे व त्यासाठी पोषक वातावरण व साधने यांची उपलब्धी करून देणे.

३. धर्म, वंश, जात, सत्ता, प्रदेश या कारणांमुळे हिंसा होणार नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

४. स्त्री-पुरुष जन्मदर समान ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे.

५. महिलांची आधुनिक व स्वबळावर उभी असणारी नवी प्रतिमा निर्माण करणे. गृहिणींच्या घरकामाला प्रतिष्ठा मिळवून देणे.

६. शासनाच्या सर्व स्तरावरील निर्णय प्रक्रियेत सर्व महिलांच्या हिताचे व हक्कांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करणे.

७. समाजाच्या मुख्य प्रवाहातून बाहेर फेकलेल्या (देवदासी, एकल, तृतीय पंथी इ.) स्त्रियांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न करणे.

८. समाजाच्या विषमता मूलक रचनेमुळे महिलांवर

होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करणे.

९. असंघटीत क्षेत्रातील महिलांच्या हक्कांसाठी प्रयत्न करणे.

१०. स्त्रियांना त्यांच्या समतांचा पुरेपूर उपयोग करता यावा यासाठी घरात व कामाच्या ठिकाणी हिंसाचार विरहित, सुरक्षित वातावरण निर्माण करणे.

या धोरणात खालील बाबींवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे-

शासनाचे जे विभाग, महिलांसाठी योजना राबवितात त्या सर्व विभागांनी प्रतिवर्षी सनद तयार करावयाची आहे. त्यामध्ये योजनेमध्ये महिलांसाठी कीती जागा आरक्षित आहेत. तसेच जाती निहाय आरक्षण जाहिर करावयाचे असून त्याची काटेकोर अंमलबजावणी करायची आहे. तसेच अर्थसंकल्पात महिला केंद्री धोरणे, योजनात तरतुदी असणे आवश्यक आहे त्यासाठी जेंडर बजेट जाहीर करावे. महिला शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण व उत्पन्नाचे स्त्रोत, श्रमबाजारात स्त्रियांचा सहभाग या निकषांच्या आधारे स्त्री विषयक असमानता निर्देशांक तयार करण्यात येईल. विविध मोहिमा व अभियानाच्या माध्यमातून जाणीव जागृती करण्यात येईल. महिलांपर्यंत माहिती पोहचविण्याच्या दृष्टिने प्रसार माध्यमांची भूमिका महत्त्वाची राहील, प्रशिक्षणावर अधिक भर दिला जाईल. महिलांचे हक्क, धोरण व कायदे विषयक माहिती महिलांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाईल. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था यांची जबाबदारी अधिक राहिल. शिक्षण व संशोधनात महिलांना अग्रक्रम दिला जाईल. शिक्षण घेणाऱ्या मुली व नोकरदार महिलांसाठी सुरक्षित वसतिगृहाची सोय करण्यात येईल. नोकरदार महिलांच्या बालकांसाठी पाळणाघरांची सोय केली जाईल. महिलांचे शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व अध्यात्मिक आरोग्य जपण्याचा प्रयत्न केला जाईल. महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी पुरेशी स्वच्छता गृहे उपलब्ध करून दिली जातील. प्रत्येक गावात व्यसनमुक्ती केंद्र उभारण्यात येईल. पर्यावरण रक्षणासाठी महिलांच्या सक्रिय सहभागाची अपेक्षा आहे. सांस्कृतिक जपणूकीसाठी शासन विशेष प्रयत्न करेल. महिलांमध्ये उद्योजकता वाढीसाठी शासन प्रयत्नशील राहिल. स्त्री संरक्षण व सुरक्षिततेवर विशेष लक्ष देण्यात येईल. महिलांना राज्य कारभार चालविण्यासाठी सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. महिलांना प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन गौरविले जाईल.

**महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजना:**

महाराष्ट्र शासन महिला विकासाच्या ज्या विविध योजना राबवित आहे त्या योजनांचा थोडक्यात आढावा घेऊ.

**मुलींच्या शिक्षण विषयक योजना:** महाराष्ट्र शासनाने मुलींच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिल्याचे दिसते. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविण्यासाठी खालील उपक्रमांचा अवलंब केला आहे.

१. उपस्थिती भत्ता योजना : प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी १९९२ पासून ही योजना सुरू करण्यात आली असून शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त २२० रु. उपस्थिती भत्ता दिला जातो. सन २०१३-१४ मध्ये लाभार्थींची संख्या ४.९१ लाख होती, खर्च रक्कम १०.८१ कोटी होती. सन २०१४-

१५ मध्ये लाभार्थींची अपेक्षित संख्या ४.७० लाख आहे.

२. अहिल्याबाई होळकर योजना: विद्यार्थिनींना शाळेत जाण्यासाठी मोफत सवलत देणारी ही योजना सन १९९६-९७ पासून सुरू करण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये ४,२०२ मुलींनी याचा लाभ घेतला असून ८.३३ कोटी रु. रक्कम खर्च करण्यात आले. सन २०१४ डिसेंबर पर्यंत ४.३८ कोटी रु. खर्च करण्यात आले असून ४,०५१ मुली लाभार्थी ठरल्या आहेत.

महिला आरोग्य विषयक योजना: महिलांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात काही विशेष योजना राबविण्यात येतात.

१. नवसंजीवनी योजना : आदिवासी भागातील माता मृत्यू प्रमाण आणि अर्भक मृत्यूदर कमी व्हावेत या उद्देशाने १५ जिल्ह्यातील आदिवासी भागात ही योजना राबविली जाते. यात फिरती वैद्यकीय पदके तयार करण्यात आली असून या योजनेअंतर्गत मातृत्व अनुदान, दाई बैठका, मान्सून पूर्व उपाय योजना अशा विविध योजना राबविण्यात येतात.

२. जननी सुरक्षा योजना : सर्व प्रसुती दाई मार्फत होऊन माता मृत्यूदर कमी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रसुतीनंतर सात दिवसांच्या आत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांस ७०० रु. व शहरी भागात ६०० रु. व सिझेरियन शस्त्रक्रिया झाल्यास १५०० रु. खर्च भरपाई दिली जाते. डिसेंबर २०१४ पर्यंत २५.८० कोटी रु. खर्च करण्यात आले.

## महिला सक्षमीकरणासाठीच्या योजना:

प्रत्येक अर्थसंकल्पात महिला विकासासाठीच्या योजनांसाठी विशेष तरतूद करण्यात येते. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात ७,०६६,३४ लाख रु. निधीची तरतूद आहे. पैकी ४,४७८,७९ लाख रु. निधी खर्च झाला आहे.

महिलांना आधार देण्यासाठी तसेच त्यांचे संरक्षण, शिक्षण, रोजगार यासाठी राज्य शासनाच्या वतीने पुढील योजना राबविण्यात येतात.

(१) शासकीय महिला वसतिगृहे (२) संरक्षण गृहे (३) स्वयंसेवी आधार गृहे (४) समुपदेशन केंद्र (५) शुभमंगल सामुदायिक विवाह योजना (६) मनोधैर्य योजना.

राजीव गांधी सबला योजना : किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी ही योजना असून केंद्र व राज्यांचा ५०-५० टक्के वाटा आहे. २०१३-१४ करीता ११० कोटी ७८ लाख रु. तरतूद करण्यात आली होती.

सुकन्या योजना : या योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखाली कुटुंबात जन्मलेल्या मुलींच्या नावावर भारतीय आयुर्विमा मंडळात २१,२०० रु. जमा केले जातात व मुलींचे वय १८ पूर्ण झाल्यानंतर तिला १ लाख रु. मिळतात. शिवाय इयत्ता ९ वी ते १२ वी शिक्षणासाठी दरमहा १०० रु. दिले जातात.

मनोधैर्य योजना : या अंतर्गत बलात्कार व लैंगिक अत्याचार पिडीतांना कमाल ३ लाख रु. अर्थ सहाय्य देण्यात येते.

इंदिरा गांधी विधवा निवृत्ती वेतन : या योजने अंतर्गत २०१३-१४ मध्ये ०.३२ लाख महिला लाभार्थी असून त्यांच्यावर ७.४९ कोटी रु. खर्च करण्यात आले तर डिसेंबर २०१४ पर्यंत ०.४४ लाख महिला लाभार्थी असून त्यांच्यावर ७.०८ कोटी रु. खर्च करण्यात आले.

**तक्ता क्र. १ : निवडक महिला विकास योजनांची प्रगती** (रु.कोटीत)

| योजना | २०१३-१४ | | २०१४-१५ | |
|---|---|---|---|---|
| | खर्च | लाभार्थी | खर्च* | लाभार्थी* |
| १. शासकीय महिला वसतिगृहे/ संरक्षण गृहे / स्वयंसेवी आधार गृहे | ८.७८ | १,३६८ | ६.३० | १,३५२ |
| २. समुपदेशन केंद्र | २.३० | ८५ | १.८३ | १३६ |
| ३.शुभमंगल सामुदायिकविवाह योजना | ०.०० | ०० | १.१८ | ९८४ |
| ४.मनोधैर्य योजना | ५.०४ | ८३० | १५.१० | १,३१७ |

*स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पहाणी २०१४-१५* **डिसेंबर पर्यंत*

महाराष्ट्रातील अन्न व नागरी पुरवठा विभाग, उद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, ग्रामविकास व जलसंवर्धन विभाग, पशु संवर्धन विभाग, विधी व न्याय विभाग हे विभाग ही महिलांसाठी विशेष योजना राबवित असतात.

**केंद्र पुरस्कृत योजना :** राज्यात महिलांसाठी काही केंद्र पुरस्कृत योजनाही राबविण्यात येतात. त्या पुढील प्रमाणे- (१) नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे (२) प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमासाठी आधार (स्टेप), (३) स्वाधार (४) उज्वला

**निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग :**

महाराष्ट्र राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचे आरक्षण ५० टक्कांपर्यंत वाढविले आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र या ठिकाणी महिलांनी स्वतः सक्षम होऊन प्रभावीपणे निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हावे ही अपेक्षा आहे.

**स्वयंसहाय्यता बचत गट:**

महिलांमध्ये आर्थिक स्वायत्तता निर्माण करण्याच्या हेतूने बचत गट प्रभाव शाली ठरतात. महिला सक्षमीकरणात बचत गटाचे योगदान महत्त्वाचे आहे. डिसेंबर २०१४ अखेर ६८,९३६ स्वयंसहाय्यता बचत गटात ९.९८ लाख महिला सहभागी होत्या त्यांची एकूण बचत २७१.१९ कोटी रु. होती व अंतर्गत वितरित कर्ज ७६०.०५ कोटी रु. होते.

**महिला विरोधात घडलेले गुन्हे :**

आज महिला रोजगारासाठी, व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागल्या आहेत. मात्र त्यांच्या संरक्षणाचा प्रश्न आ वासून उभा आहे. महिला अत्याचाराचे गुन्हे दिवसेंदिवस वाढत आहेत ही सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीने गंभीर बाब आहे.

महिला विरोधात अत्याचाराचे नोंदविलेले विशिष्ट गुन्हे पुढील पृष्ठावरील तक्त्यात दर्शविले आहेत.

मागील आकडेवारी पहाता सर्वच प्रकारच्या अत्याचारात वाढ होताना दिसत आहे.

तक्ता क्र. २ : महिला विरोधात अत्याचार (संख्या)

| अत्याचाराचा प्रकार | वर्ष | | | |
|---|---|---|---|---|
| | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ |
| १. बलात्कार | १,७०१ | १,८३९ | ३,०६३ | २,९५८ |
| २. हुंडाबळी | ३३९ | ३२९ | ३२० | २४८ |
| ३. विनयभंग | ३,७९४ | ३,९३५ | ८,१३२ | ९,१०२ |
| ४. लैंगिक अत्याचार | १,०७१ | १,२९४ | २,६३२ | १,४९४ |

*स्रोत: गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन*

** नोव्हेंबर पर्यंत*

निष्कर्ष :

१. १९९४, २००१ व २०१३ या तीन महिला धोरणांचा अभ्यास करता या तीनही धोरणांमध्ये महिला विकास विषयक दृष्टीकोनात काळानुरूप बदल केला असून महिलांच्या सर्वांगिण विकासाचा प्रयत्न केल्याचे दिसते.

२. महाराष्ट्रातील स्त्री-पुरुष प्रमाण भारतातील स्त्री-पुरुष प्रमाणाच्या तुलनेत कमी आहे.

३. ० ते ६ वयोगटात मुलींचे प्रमाण कमी होणे ही गंभीर बाब आहे.

४. महिला साक्षरतेचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे.

५. महिला कल्याणकारी योजनांवरील खर्चात वाढ होत आहे.

६. महिलांवरील अत्याचाराच्या गुन्हात वाढ होत आहे.

धोरणात्मक उपाय :

१. स्त्री भ्रूण हत्या रोखण्यासाठी पी.एन.डी.टी. कायद्याची कडक अंमलबजावणी करावी.

२. महिला कल्याणकारी योजनांची माहिती लक्ष्य गटापर्यंत पोहोचविण्यासाठी ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था यांची मदत घ्यावी.

३. स्नानगृहे व शौचालयांसाठी उपलब्ध करून दिलेला निधी त्याच कामासाठी वापरला जातो का ही पाहणारी यंत्रणा सक्षम करावी व अयोग्य वापर झाल्यास दंडात्मक कारवाई करावी.

४. महिला सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम करावी. पोलिस स्टेशनमध्ये अधिक महिला पोलिसांची नियुक्ती करावी व अत्याचाराच्या केसेस हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण त्यांना द्यावे.

संदर्भ :

१. *महिला व बालविकास धोरण आणि निर्णय १९७५ ते जानेवारी २००२ एक दृष्टिक्षेप* - महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

२. गायकवाड बी. आर. (संपादक), (२०१२), *महाराष्ट्राचा आर्थिक विकास एक चिंतन*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ५८४ ते ५८६.

३. कॉम्रेड पानसरे गोविंद (संपादक) (२०१२) *महाराष्ट्राची आर्थिक पहाणी पर्यायी दृष्टिकोन*, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर. पृ. ३६ ते ३८.

४. कॉम्रेड पानसरे गोविंद (संपादक) (२०१५) *महाराष्ट्राची आर्थिक पहाणी पर्यायी दृष्टिकोन*, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर. पृ.३९ ते ४२, ५०.

५. पाटील जे. एफ., विभूते भालबा (संपादक), (२०१३), *बदलता महाराष्ट्र*, प्रकाशक - महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषद, सांगली. पृ. १८१ ते १८४.
६. *महाराष्ट्राची आर्थिक पहाणी अहवाल* - २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५.
७. www.census.2011.co.in
८. http://womenchild.maharashtra.gov.in
९. www.maharashtra.gov.in


## मराठी अर्थशास्त्र परिषदः महत्त्वाची सूचना

## मतदारांसाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनात संपन्न होणाऱ्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळातील रिक्त होणाऱ्या पदाकरिता (कार्यकारी मंडळ सदस्य, अध्यक्ष, कार्याध्यक्ष व कार्यवाह खजिनदार) मतदान घेतले जाते. या संदर्भात जळगाव येथील मुळजी जेठा महाविद्यालयात १९ एप्रिल २०१५ रोजी परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुढील महत्त्वपूर्ण निर्णय झाला आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाच्या विविध जागांसाठी यापुढे घेतल्या जाणाऱ्या मतदानाकरिता परिषदेच्या आजीव सदस्यांनी (मतदानासाठी पात्र असलेले सभासद क्रमांक) आपले छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड(शासनाचे), पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे याची कृपया सन्माननीय आजीव सदस्यांनी नोंद घ्यावी.

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे होणाऱ्या ३९व्या (दि.१६, १७ व १८ नोव्हेंबर २०१५) अधिवेशनापासूनच ओळखपत्र सक्तीचे करण्यात येत आहे. ओळखपत्र नसल्यास मतदान करता येणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी. याकरिता आपणाकडून सहकार्य अपेक्षित आहे.

-कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद.

# कृषी पर्यटन : ग्रामीण विकासाचा नवा मार्ग

**संतोष कदम, मंद्रुप,**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख,
संतोष भीमराव पाटील महाविद्यालय,
ता. दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर.
भ्रमणध्वनी: ९४२३५८७६२८

आज जागतिकीकरणाच्या काळातही शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. जवळजवळ ६५ टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. तर देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा २३ टक्केच्या दरम्यान आहे. भारतातील ९० दशलक्ष शेतकरी ६.२५ लाख खेड्यात राहून २२० मे.टन पेक्षा जास्त अन्नधान्य निर्मिती करत आहेत. शेती हा व्यवसाय किंवा धंद्यापेक्षा ती एक भारताची संस्कृती मानली जाते. म्हणूनच सध्याच्या शेतीमध्ये उत्पन्न वाढीचे जास्तीचे कार्यक्रम राबविले तर त्यामुळे देशाच्या उत्पन्नामध्ये शेतीचा वाटा वाढू शकतो. या दृष्टीने प्रामाणिक प्रयत्न करणे गरजेचे असून त्यासाठी कृषी पर्यटन हा एक कार्यक्रम उपयुक्त ठरेल.

पर्यटन हे रोजगार निर्मिती, दारिद्र्य निर्मूलन व चिरस्थायी विकासाचे एक महत्त्वाचे साधन मानले जाते. सन २००८-०९ मध्ये पर्यटनाद्वारे १८.५ दशलक्ष इतकी प्रत्यक्ष रोजगार निर्मिती झाली होती. याशिवाय पर्यटनामुळे राष्ट्रीय एकात्मता, आंतरराष्ट्रीय जाणीव, स्थानिक हस्तव्यवसाय व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादींना बळकटी मिळते. सन २००८ मध्ये ३५.४१ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेटी दिल्या. भारताचा जागतिक पर्यटन व्यवसायातील वाटा केवळ ०.४० टक्केच्या आसपास असून, या कमी वाट्याद्वारे २४.४८ कोटी रुपये इतके परकीय चलन भारताला मिळाले आहे. देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास, उत्पादन वाढ व विविधीकरण, सांस्कृतिक सादरीकरण, कमी खर्चातील राहणीमान सुविधा, मानव संसाधन विकास, लोकांमध्ये जागृती व त्यांचा सहभाग वाढविणे, तसेच खाजगी क्षेत्रांची मदत घेणे इत्यादी सारख्या महत्त्वाच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केले आहे.

कृषी पर्यटनाला चालना देण्यामध्ये कृषी मंत्रालय, केंद्र व राज्य सरकारमधील संबंधित विभाग आणि शेतकरी यासारखे काही महत्त्वाचे घटक

समाविष्ट आहेत. तसेच कृषी पर्यटनाच्या विकासासाठी ग्रामीण पर्यटन, जैविक पर्यटन, आरोग्य पर्यटन, साहस पर्यटन इत्यादींमध्ये एककेंद्राभिमुख कल्पना राबविणे गरजेचे आहे, जेणेकरुन खेडे, शेती व शेतकरी यांना उत्पन्न प्राप्तीचा एक पूरक मार्ग उपलब्ध होऊ शकतो. याच अनुषंगाने प्रस्तुत लेखात कृषी पर्यटनाचे नेमके तत्त्व काय आहे, त्याची व्याप्ती किती आहे तसेच त्यातील महत्त्वाचे घटक कोणते आहेत याची चर्चा केली आहे. शेवटी कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी काही उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**कृषी पर्यटनाचे तत्त्व:**

१)कृषी पर्यटन हे पर्यटकांना प्राणी, पक्षी, शेती व निसर्ग यासारख्या काही गोष्टी पाहण्यासाठी संधी देते. याशिवाय संस्कृती, तेथील लोकांचे पेहराव, सण-उत्सव व ग्रामीण खेळ यामुळे कृषी पर्यटकांचा आनंद द्विगुणीत होऊ शकतो.

२)शेतीविषयक कार्यातही पर्यटकांना सहभागी होता येते. तसेच पोहणे/जलतरण, बैलगाडी चालविणे, उंटावर व म्हशीवर बसून प्रवास करणे यासारख्या गोष्टींमध्ये पर्यटक सहभागी होऊन पर्यटनांचा आनंद वाढवू शकतात.

३)ग्रामीण हस्तव्यवसायातील वस्तू, ड्रेस मटेरियल, शेतीतील ताजी उत्पादने इत्यादींची पर्यटक एक आठवण म्हणून खरेदी करु शकतात. थोडक्यात सहभागयुक्त पर्यटन ही संकल्पना कृषी पर्यटनाद्वारे पर्यटकांना आनंद देऊ शकते.

**कृषी पर्यटनाची व्याप्ती:**

सद्यस्थितीत कृषी पर्यटनाला फार मोठी संधी आहे. अन्न खर्च, राहणी खर्च, मनोरंजन व प्रवास हे कृषी पर्यटनातील महत्त्वाचे घटक आहेत की, ज्यामुळे कृषी पर्यटनाचा पाया वृद्धिंगत होतो. सध्या पर्यटन ही संकल्पना एकूण लोकसंख्येत अल्प वाटा असणाऱ्या शहरी व उच्च वर्गापुरतीच मर्यादित आहे. तथापि कृषी पर्यटनाची व्याप्ती त्यातील खर्च परिणामकारक घटकांमुळे वाढून भविष्यात ते जास्तीत जास्त लोकसंख्येला समाविष्ट करून घेऊ शकते. शहरी लोकसंख्येचे मूळ खेड्यात असल्याने व त्यांना अन्नधान्य निर्मिती, झाडे, प्राणी, कच्चा माल, हस्तकला, भाषा, संस्कृती, परंपरा, पेहराव, ग्रामीण जीवनशैली, इत्यादींबाबतीत आकर्षण असते. कृषी पर्यटन हे शेतकरी, शेती व खेडे इत्यादी भोवतीच फिरत असल्याने यामध्ये शहरी लोकसंख्येला वरील बाबतीत असलेले आकर्षण पूर्ण करण्याची क्षमता आहे. खेड्यांमध्ये शहरातील सर्व वयोमटातील लोकांना मनोरंजनाच्या संधी उपलब्ध असतात. यामध्ये लहान मुले, तरुण, मध्यम वयोगट व वयस्क गटातील लोक तसेच पुरुष व महिला इत्यादींना एकूणच संपूर्ण कुटुंबाला कमी खर्चात ही संधी मिळते. ग्रामीण खेळ, सण-उत्सव, अन्नधान्य निर्मिती, पेहराव व निसर्ग इत्यादीमुळे संपूर्ण कुटुंबाला करमणुकीमध्ये विविधता उपभोगता येते.

आधुनिक जीवनशैलीमुळे मानवी जीवन तणावपूर्ण झाले असून, त्यातून लोकांचे सरासरी आयुर्मान घटले आहे. त्यामुळे लोक निसर्गाच्या सान्निध्यात राहून जीवन शांतपणे जगणे पसंत करत आहेत. आयुर्वेदातील निसर्गसान्निध्याचे मूळ खेड्यातच आहे. खेड्यातील लोकांचे देशी वैद्यकीय ज्ञान सन्माननीय मानले जाते. परदेशांमध्ये तसेच देशातील शहरी भागांमध्ये जैविक अन्नधान्याला फार मोठी मागणी आहे. निसर्गाच्या सान्निध्यातील

खेडी हे एक शहरी भागातील आरोग्यविषयक जागृत असणाऱ्या लोकांसमोरील प्रश्नाचे उत्तरच आहे. आधुनिक जीवनशैली ही विविध विचार व गतिमान कार्यप्रणालीचेच फळ आहे. आधुनिक सुविधांचा उपभोग घेण्यासाठी माणूस जास्त काम करून किंवा वेगळ्या मार्गाने महत्तम पैसा मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे शांतपणा हा अशा लोकांपासून दूर गेलेला असतो. पर्यटन हे एक शांत ठिकाण शोधण्याचे साधन आहे. शांतता व निशब्दता यांचा कृषी पर्यटनामध्ये अंतर्भाव असून, इथे निसर्गाच्या जवळ व शहरापासून दूर अंतरावर जाता येते. शहरी लोकांचा कल हा निसर्गाकडे असतो. कारण नैसर्गिक वातावरण हे धकाधकीच्या जीवनापासून दूर असते. पक्षी, प्राणी, पिके, टेकड्या, खेडी यामुळे एक वेगळे वातावरण शहरी लोकांना उपलब्ध होऊ शकते व त्यातून शहरी लोकांना काही काळ का असेना आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनाचा विसर पडून आनंद उपभोगता येतो. पर्यटन निवास व शहरे यामध्ये खऱ्या अर्थाने शांतता उपभोगणारे एकमेकांची शांतता भंगच करत असतात. त्यामुळे खरी शांतता ही शहरे व पर्यटन निवास यांच्या पलिकडे असते. याशिवाय निमशहरी भागांमध्ये पर्यटन निवास, फार्म हाऊस याद्वारे खेड्यातील वातावरण निर्माण करण्याचा असा प्रयत्न केला जातो की ज्यात हुबेहुब प्रतिकृती निर्माण करूनही परकेपणाच वाटतो.

अलिकडे खेड्यांचे खेडेपण घालवून तेथे शहरांची निर्मिती होऊ लागली आहे. खेड्यातील लोकही शहरी आधुनिक जीवनशैली आणि नोकरीचा शोध घेत शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. याचाच अर्थ आजचे खेडूत हे उद्याचे शहरी होत आहेत. परंतु शहरी लोकांच्या अंतर्मनात खेड्यांविषयी व पूर्वजांविषयी आत्मीयता व प्रेम असतेच. त्यामुळे खेडेगावांना भेट देणे म्हणजे त्यांच्या इच्छांची पूर्तता मानली जाते. याशिवाय खेडेगावाला भेट देऊन तिथे आपला वेळ मजेत व आनंदात घालवावा, असे प्रत्येक शहरी माणसाला मनापासून वाटत असते. परंतु खेड्यांमध्ये किमान सुविधांचा अभाव ही एक समस्या असते. कृषी पर्यटनाद्वारे ही समस्या सोडविता येते. खेड्यांमधील सण-उत्सव व हस्तव्यवसायाद्वारे शहरी लोकांचे विभिन्न प्रकारचे मनोरंजन होते. खेड्यातील लोकांचे राहणीमान, त्यांचे कपडे, भाषा, संस्कृती व परंपरा यातून मनोरंजनात वाढ होते. शेतीतील वातावरण व तेथील उत्पादन प्रक्रिया याचेही शहरी लोकांना आकर्षण असते. जास्त उत्पादन देणारी जमीन, प्रक्रिया केंद्र, नवनिर्मिती इत्यादी शेतीतील आकर्षण असणारी ठिकाणे पर्यटकांना आकर्षित करतात. याशिवाय शेतीतील ताजी उत्पादने, प्रक्रियायुक्त अन्न, जैविक अन्न, इत्यादी गोष्टीही शहरी पर्यटकांना आकर्षित करतात. या खेड्यातील सर्वप्रकारच्या कृषीविषयक वातावरणामुळे कृषी पर्यटन विकसित करण्यास वाव आहे. यामध्ये कृषीविषयक खरेदी, बोटिंग, मासेमारी, ग्रामीण खेळ व आयुर्वेदीय आरोग्य पर्यटन इत्यादींचा समावेश आहे.

कृषी पर्यटनामुळे शाळांतील मुलांमध्ये ग्रामीण जीवनाचे ज्ञान व जागृती निर्माण होण्यास मदत होते. विशेषत: ज्या शाळा शहरांमध्ये आहेत त्यांच्यासाठी कृषी पर्यटन हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. याशिवाय शहरी कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी यामुळे प्रत्यक्षातील शेती व ग्रामीण भागाविषयीच्या अनुभवाची संधी मिळते व

त्याद्वारेच भविष्यातील चांगले शेतकरी निर्माण होण्याससुद्धा मदत होते. विशेषत: हसतखेळत परिणामकारक व सहज शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने कृषी पर्यटन ही एक फार मोठी संधी आहे. थोडक्यात कृषी पर्यटन ही एक अनुभवाधिष्ठित व विश्वासपूर्ण शिक्षणाची संकल्पना ठरू शकते.

**कृषी पर्यटनातील महत्त्वाचे घटक:**

बहुतांशी वेळा शेतकरी हा कमी शिकलेला व भोळाभाबडा असतो. शेतकऱ्यांना बाहेरून येणारा प्रत्येक माणूस हा आपला पाहुणा वाटतो. तसेच त्यांचे स्वागत मनापासून कोणत्याही व्यावसायिक हेतूशिवाय तो करत असतो. पाहुण्यांचा पाहुणचार करणे हे खेडेगावातील लोकांना दु:खापेक्षा आनंद देणारी घटना वाटते. शेतकरी हा काही एखाद्या पिळवणूक करणाऱ्या व्यावसायिकाप्रमाणे वागत नाही तर त्याच्याकडून निर्मळ व स्वच्छ पर्यटनाचे वातावरण उपलब्ध करून दिले जाते.

खेडी शहरांपासून व शहरी सुविधांपासून दूर असली तरी नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपूर्ण असतात. निसर्गाने एकप्रकारे शेती, जंगल, टेकड्या, वाळवंट इत्यादींच्या माध्यमातून फार मोठी गुंतवणूक खेड्यांमध्ये केली आहे. खेडेगावातील समाज हा मोठ्या प्रमाणात एकवाक्यता असणारा व पाहुण्यांचा पाहुणचार ही आपली संस्कृती मानणारा आहे. यातूनच खऱ्या अर्थाने पर्यटनासाठी जे नैसर्गिक वातावरण आवश्यक असते ते उपलब्ध होते.

शेतीमध्ये उपलब्ध असलेली महत्त्वाची संसाधने जसे जमीन, पाणी व पिके यामध्ये ठिकाणानुसार विविधता व विशिष्टता पहायला मिळते व त्यातूनच पर्यटनाचे आकर्षण वाढते. यातील प्रत्येक घटकातील विशिष्टता ही पर्यटकाला आकर्षित करते. शहरी लोकांना शेतीतील लागवडीची पद्धती व उत्पादन याविषयी फार मोठे आकर्षण असते. ग्रामीण भागातील लोकांना असलेले देशी ज्ञान ही त्यांची अशी संपत्ती आहे की, ज्याचे शहरी लोकांना नावीन्य व आकर्षण वाटते.

थोडक्यात शेतकरी, शेती व खेडेगाव यांचा एकत्रितपणा यामुळे एक पर्यटनविषयक अशी चांगली स्थिती निर्माण होऊन त्यातून अमर्याद समाधान उपभोगण्याची संधी पर्यटकांना विशेषत: शहरी भागातील पर्यटकांना मिळू शकते.

**कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी:**

कृषी पर्यटनाच्या वाढीसाठी पुढील काही गोष्टींवरती लक्ष केंद्रित करणे गरजेचे ठरेल.

१)प्रसिद्धी:

खरंतर दूर अंतरावरील खेड्यातील कृषी पर्यटन केंद्रांना प्रसिद्धी देण्याची जबाबदारी पर्यटन विकास केंद्र, राज्य पर्यटन विकास महामंडळ, विविध बिगर शासकीय संस्था, वर्तमानपत्रे इत्यादी घटकांनी स्वीकारायला हवी. माहिती तंत्रज्ञान हे कृषी पर्यटनाला गती देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावू शकते. याशिवाय जिच्यामध्ये सर्व अद्ययावत माहिती असेल अशा आकर्षक इंटरनेट वेबसाइटद्वारेही प्रसिद्धी देता येईल.

२) वाहतूक:

दूर अंतरावरील खेडेगावात पोहोचणे/ जाणे हे रस्त्यांच्या अपुऱ्या जाळ्यांमुळे व अत्यंत साधारण वाहतूक व्यवस्थेमुळे एक प्रकारचे आव्हानच उभे राहते. शासनाने ग्रामीण भागात रस्ते, वाहतूक व दळणवळणाच्या सुविधा कृषी पर्यटन केंद्राच्या विकासासाठी प्राधान्याने

पुरवाव्यात. यासाठी शासनाने शक्य तेथे खाजगी सहभागाचाही अशा सेवा पुरविण्यासाठी विचार करावा.

३) राहण्याची व्यवस्था:

कृषी पर्यटनामध्ये स्वच्छ व सुरक्षित राहण्याची व्यवस्था अपेक्षित आहे. कारण शहरी पर्यटकांना या सारख्या किमान सुविधा पाहिजे असतात. एकाचवेळी कृषी पर्यटन व्यवस्था हाताळणाऱ्यांना प्रशिक्षण, माहिती देणे व अशा व्यवस्थेला प्रेरणा व प्रोत्साहन देणे हे या दृष्टीने आवश्यक ठरेल. याशिवाय दररोज नियमीत स्वच्छ पाणीपुरवठा व चांगली टॉयलेट व्यवस्था पुरविणे महत्त्वाचे आहे. पण त्याचवेळी आधुनिक सुविधांचा अतिरेक होणार नाही, याचीही दक्षता घ्यावी. कारण शहरी पर्यटकांना त्यात फारसा रस असेलच असे नाही.

४) पर्यटकांना सुरक्षा:

कृषी पर्यटन केंद्रे ही फार दूर अंतरावर असल्याने व तेथे चांगले रस्ते, आरोग्यविषयक सुविधा, दळणवळण यांचा अभाव असल्याने त्याठिकाणी पर्यटकांना सुरक्षितता पुरविणे गरजेचे ठरेल. याशिवाय बऱ्याचवेळा चोऱ्या व जंगली जनावरांची भीती असल्याने त्याबाबतही सुरक्षितता पर्यटकांना दिली पाहिजे. त्यासाठी स्थानिक लोकांचे पाठबळ महत्त्वाचे ठरेल.

५) खाजगी-सार्वजनिक सहभाग:

धाडसी शेतकरी, शेतकरी संघटना, सहकारी संस्था, बिगर शासकीय संस्था यांनी शेतकऱ्यांना व शासन यांना बरोबर घेऊन कृषी पर्यटन केंद्रे सुरू करण्याचे साहस करावे म्हणजे त्यात त्यांना नक्कीच यश मिळेल.

**सारांश:** महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये कृषी पर्यटन विकास अजूनही फारच प्राथमिक अवस्थेत आहे. परंतु महाराष्ट्राला नक्कीच कृषी पर्यटनामध्ये विकसित होण्याची नक्कीच संधी आहे. याशिवाय कृषी पर्यटनामध्ये महाराष्ट्राला देशातील निवडक राज्यांमध्ये नेतृत्त्व करण्याची संधी आहे. कारण महाराष्ट्र राज्य नैसर्गिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. तरीही महाराष्ट्र शासनाने कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी म्हणावे तसे प्रयत्न केलेले नाहीत. परंतु पुढील काळात शासनाने यासाठी प्रयत्न करावेत कारण कृषी पर्यटनामध्ये पर्यटकांना नक्कीच काहीतरी पाहण्यासारखे, काहीतरी करण्यासारखे आणि काही तरी खरेदी करण्यासारखे असल्याने भविष्यकाळात पर्यटक कृषी पर्यटनाला आणखी जास्त प्रमाणात पसंती देतील व यातूनच ग्रामीण विकासाचा एक नवा मार्ग मिळेल.

**संदर्भ सूची:**


1) Getz, D. Carlsen, J., (2000), Characteristics and Goals of family and owner operated businesses in the rural tourism and hospitality sectors, Tourism management, 21, pp. 547-560.
2) Indian Economic Growth : Can it Translate into Rural Prosperity? The Analyst, Special Issue on Agri-Business, August 2007.
3) Journal of ATDC, Various volumes.
4) http://www.ruraltourism.org.uk
5) http://www.agritourism.in

# भारतीय महिला बँकेची भविष्यातील वाटचाल

**हरिभाऊ नरसिंग गिलबिले, भूम,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव पाटील महाविद्यालय, जि.उस्मानाबाद.
भ्रमणध्वनी: ७३५०५३११७२.

**प्रस्तावना:**

भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणात फेब्रुवारी २०१३ मध्ये भारतीय महिला बँकेची स्थापना करण्याची घोषणा केली. महिला बँकेच्या पहिल्या अध्यक्ष म्हणून उषा अनंत सुब्रमण्णम यांची नेमणूक करण्यात आली. या बँकेसाठी सरकार थेट आर्थिक मदत करणार आहे. या बँकेच्या आठही संचालक महिला आहेत. त्यात छावी राजावत (सरपंच राजस्थान), नपूर मित्रा (भाजी अध्यक्ष देना बँक), रेणुका रामनाथ दुभाष (अध्यक्ष, विपणन, गोदरेज समूह), कल्पना सरोज (सीईओ), प्रिया कुमार (सरकारी नामनिर्देशित) अशा प्रकारे सर्व स्तरातील नेतृत्व या संचालक मंडळात आहे. नोव्हेंबर २०१३ मध्ये भारतीय महिला बँकेची स्थापना करण्यात आली. सध्या देशात २८ राष्ट्रीयकृत बँका आहेत त्यात या एका राष्ट्रीयकृत बँकेची भर पडलेली आहे. सध्या देशातील २६% महिलाच बँकींग सेवेचा लाभ घेतात. तर केवळ ८% महिलाच कर्ज घेतात. महिला बँकेच्या स्थापनेमुळे यात नक्कीच वाढ होईल. सध्या मुंबई (महाराष्ट्र), आगरताळा (त्रिपुरा), शिलाँग(मेघालय), गंगटोक(सिक्किम) आणि इटानगर (अरूणाचल प्रदेश) येथे शाखा सुरू झालेल्या आहेत. तसेच हैद्राबाद, चंदीगड, शिमला, भुवनेश्वर, जयपूर, डेहराडून, पाटणा, नवीन जयपूर, पणजी, श्रीनगर, थिरूवनंतपुरम व रांची येथेही महिला बँकेच्या शाखा सुरू केल्या जातील. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात देखील या बँकेच्या शाखा सुरू करण्यात येतील.

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी प्रामुख्याने दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे. तसेच स्थूल संशोधन पद्धतीने अभ्यास केलेला आहे. दुय्यम

समकामध्ये वर्तमानपत्रातील संशोधनात्मक लेख यांचा आधार घेतला आहे. उदा. लोकमत, पुण्यनगरी इत्यादी तसेच दुरदर्शनवरील बातम्या, संकेतस्थळ इत्यादीद्वारे माहिती गोळा करून त्यांचे विश्लेषण केलेले आहे व निष्कर्ष काढलेले आहेत. महिला बँकेची व्याखया पुढील प्रमाणे करता येईल.

**व्याखया:**

महिला बँक म्हणजे महिलांनी महिलांसाठी चालवलेली बँक होय. या बँकेमध्ये सर्व कर्मचारी महिला असतील तसेच बँकेतील सर्व ठेवीदार व कर्जदार हे ही महिलाच असतील किंवा त्यांनाच जास्त प्राधान्य दिले जाईल; असे असले तरी इतरांना देखील या बँकेत खाते उघडता येईल पण कर्ज मात्र महिलांनाच दिले जाईल. कारण महिला कर्जाचा वापर योग्य प्रकारे करतात. थोडक्यात महिलांना आर्थिकदृष्टचा सक्षम करण्यासाठी महिला बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. देशाच्या एकूण लोकसंखयेत महिलांची संखया सामान्यपणे निम्मी असल्यामुळे त्याच्यासाठी स्वतंत्र अशा या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे.

**महिला बँकेचे महत्त्व (कामकाजाचे स्वरूप):**

महिलांनी महिलांसाठी चालवलेल्या देशातील पहिल्याच भारतीय महिला बँकेचे कामकाज सुरू झाले आहे. मुंबईतील नरीमन पॉईंट येथे ही बँक सुरू झालेली आहे. तिच्या उद्घाटनाच्या वेळी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग व काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी उपस्थित होत्या. त्यांनी या बँकेसाठी एक हजार कोटी रु. निधी मंजूर केला. या शाखेच्या प्रमुख म्हणून अनिता खांडेकर या पहिल्या मराठी महिलेला मान मिळालेला आहे. त्यांच्या मते देशातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी किंवा त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी या बँकेची भूमिका महत्वाची ठरणार आहे. असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.या बँकेमुळे महिला बचत गटांना कर्ज मिळण्याची सोय निर्माण झालेली आहे. तसेच महिला बचत गटाच्या ठेवीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास मदत होईल. महिलांना रोजगार मिळेल व त्यांचे दारिद्र्य दूर होईल. इतर बँकामध्ये महिला जाऊन आपले आर्थिक व्यवहार करण्यास तयार होत नाही किंवा त्यांची तेथे कुचंबना होते. म्हणून जर बँकेतील सर्व कर्मचारी व अधिकारी महिला असतील तर महिला ज्याप्रमाणे आपल्या माहेरी बिनधास्त जातात. त्याच प्रमाणे न बिचकता आपल्या माहेरी आल्याप्रमाणे बँकेत येऊन आपले आर्थिक व्यवहार करतील असे मत उषा अनंत सुब्रमण्यम यांनी मांडलेले आहे. सध्या या बँकेच्या बंगळुर, अहमदाबाद, लखनऊ, गुवाहाटी, कोलकाता, चेन्नई येथेही शाखा सुरू करण्यात आलेल्या आहेत. देशातील प्रमुख शहरासह खेड्यापाड्यात व ग्रामीण भागात शाखा सुरू केल्यास तळागाळातील महिलापर्यंत पोहचणे शक्य होणार आहे. सध्या असलेल्या बँका मधून महिलांचे कर्ज घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे; महिला बँकेमुळे महिला कर्ज घेण्यास पुढे येतील. महिलांना १ कोटी पर्यंतच कर्ज कोणतेही तारण नसताना दिले जाईल. भविष्यात भोपाळ, इंदोर, उज्जैन, सुरत, विजयवाडा, जमशेदपूर, नागपूर, येथेही शाखा उघडल्या जातील. या बँकेत एक मोबाईल ॲप सुरू करण्याची देखील योजना आहे.

महिला कोणत्याही व्यवसाय सचोटीने व चिकाटीने करतात. त्यामुळे महिलांना वेगवेगळ्या उद्योगासाठी उदा. गृहउद्योग, दवाखाना, ब्युटी पार्लर, डे-केअर सेंटर, केटरिंग उद्योग, घर दुरूस्ती, मुलामुलींचे शिक्षण, दुग्धव्यवसाय, ऑईल मिल इ. व्यवसायासाठी कर्ज दिले जाईल, महिला घेतलेले कर्ज, मुद्दल व व्याजासह नियमितपणे परतफेड करतील अशी अपेक्षा आहे. तसेच त्यांना ठेवीवर पण इतर बँका पेक्षा अर्धा टक्का व्याजदर जास्त देण्यात येईल. बचतखात्यातील ठेवीवर ५% व्याजदर देण्यात येईल असे निश्चित करण्यात आले. त्यामुळे ठेवीचे प्रमाण वाढण्यास मदत होईल. मुंबईत शाखा सुरू झाल्याबरोबर पहिल्या आठवड्यात १,१०० महिलांनी खाते उघडण्यासाठी अर्ज केलेले होते. म्हणजेच याचा अर्थ असा की, महिलांना या बँकेविषयी आपलेपणा आहे. मार्च २०१४ अखेर देशात २५ शाखा सुरू करण्याचा निर्धार सरकारने व्यक्त केलेला आहे. त्यापैकी महाराष्ट्रात पुणे, अहमदनगर व मुंबईतील बांद्रे कुर्ला संकुल येथे शाखा सुरू करण्यात येतील. या बँकेकडून स्वयंसहाय्यता बचत गट, छोटे उद्योजक आणि नोकरदार महिलांना कर्ज दिले जाईल. तसेच अनेक सेवाभावी/ स्वयंसेवी संस्था मार्फत खेडेगावातील महिला पर्यंत बँकींग सेवा पोहचविण्यात येईल; त्यासाठी मोबाईल व्हॅन कार्यान्वित करण्यात येईल. महिलांना आर्थिक व्यवहार आत्मविश्वासाने करता यावेत व निःसंकोचपणे बँकेत येता यावे यासाठी या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे. बँकेमधील कर्मचारी व अधिकारी वर्ग हे संबंधित भागात जी भाषा बोलली जाते त्याच भाषेत आर्थिक व्यवहार करणारे नेमले जातील. तसेच इ-बँकींग, कोअर बँकींगद्वारे बँकींग सेवा ऑनलाईन देखील करण्यात येईल.

## महिला बँकेची भविष्यातील वाटचाल:

भारतीय महिला बँकेच्या अध्यक्षा व व्यवस्थापकीय संचालक उषा अनंत सुब्रमण्णम् आणि लॅक्मे लीव्हरचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुष्कराज शेनाई यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात एका करारावर सह्या केलेल्या आहेत. त्यामुळे महिला बँकेने महिला मार्फत चालवल्या जाणाऱ्या लॅक्मे सलूनला अर्थसाहाय्य केले जाणार आहे. हिंदुस्थान युनीलिव्हरच्या समुहातील लॅक्मे लीव्हरमार्फत देशभरातील ५० शहरामध्ये २३० लॅक्मे सलून चालवली जातात. महिला बँकेने मार्च २०१५ पर्यंत ८० शाखा उघडण्याचा मानस आहे. त्यापैकी २० शाखा ग्रामीण भागात असतील. तसेच ८०० कोटी रुपयापर्यंत कर्ज तर १००० कोटी रुपयापर्यंतच्या ठेवीचे लक्ष ठेवलेले आहे. या शाखामार्फत बँकेच्या विविध योजना व उत्पादने याबाबत ग्राहक खातेदारांना माहिती देऊन अशा उत्पादनांची विक्री करू शकणाऱ्या प्रतिनिधींची लवकरच नियुक्ती करण्यात येणार आहे. समाजातील दुर्बल गटातल्या महिलांना अल्प व्याजदराने कर्ज देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे हा या बँकेचा प्रमुख उद्देश आहे. अशिक्षित व खेड्यातील महिलांना खाते उघडण्यासाठी व कर्ज मिळविण्यासाठी सहाय्य करण्यात येईल. बँकेत पैसे जमा करण्यासाठीपण मदत करण्यात येईल. सारे काम विना विलंब केले जाईल. आर्थिक विषयाबाबत महिलांना सल्ला देण्यात येईल. आर्थिक व्यवहाराविषयी महिलांना प्रशिक्षण देणारा अभ्यासक्रम ही ही बँक राबवणार

आहे. २०२० पर्यंत या बँकेच्या ७७० शाखा स्थापन केल्या जातील. तसेच पुढील सात वर्षात साठ हजार कोटींची उलाढाल (ठेवी व कर्ज) करण्यात येईल असे महत्त्वाकांक्षी लक्ष्य या बँकेने ठेवलेले आहे.

थोडक्यात महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी ही बँक सर्व प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन करेल हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या बँकेची स्थापना करण्यात आलेली आहे.

**मूल्यमापन:**

महिला बँक स्थापन होऊन आणखी एक वर्ष देखील पूर्ण झालेले नाही. तोपर्यंत या बँकेचे मूल्यमापन करणे योग्य होणार नाही; तरी पण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ही बँक निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. तसेच यामुळे महिलांचा बँकींग क्षेत्रातील हिस्सा वाढण्यास मदत होणार आहे. महिलांना कर्ज सहज व सुलभ मिळेल. महिला कर्ज घेवून विविध उद्योग सुरू करू शकतील. त्यामुळे दारिद्र्य, बेकारी कमी होण्यास मदत होईल. महिलांना बँकेमध्ये नोकरीपण सहजा सहजी मिळू शकेल, ग्रामीण भागातील महिलांना बँकींग सेवाचा लाभ घेता येईल इ. गुण/फायदे या बँकेचे आपणास सांगता येतील. असे असले तरी महिला बँकेच्या यशस्वितेसाठी अनेक समस्या पण निर्माण होतील. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. बँकेची सुरक्षितता सांभाळणे अवघड होईल. कारण अलिकडे दिवसाढवळ्या बँका, ए.टी.एम. लुटण्याचे प्रकार सुरू आहेत. महिलासाठी स्वतंत्र बँक काढण्याची आवश्यकताच नाही. कारण आजही भारतीय महिला आपले आर्थिक निर्णय स्वत: घेत नाहीत तर; ते कुटुंबातील पुरूष मंडळीच्या सहकार्याने घेतात. आपले वडील, पती किंवा मुलगा यांच्या नावानेच ठेवी ठेवतात. किंवा कर्ज घेतात. स्वत: कर्ज काढून उद्योगधंदा करणाऱ्या महिलांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. ग्रामीण भागात महिला बँकेच्या शाखा काढल्या तरी त्यात ठेवी जमा होणे कठीण आहे. कारण ग्रामीण भागातील लोकांकडे आपल्या उदरनिर्वाहा एवढाच पैसा असतो. बँकेमध्ये ठेवण्यासाठी त्यांच्याकडे जादा शिल्लक पैसा नसतो. तसेच बँकेला त्या भागातील भाषा अवगत असणारा तज्ज्ञ व प्रशिक्षित कर्मचारी मिळणे अवघड होणार आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात जाऊन काम करण्याची प्रवृत्तीपण कर्मचाऱ्यांमध्ये नसते. आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या जगात महिला बँकेला आपले स्थान निर्माण करण्यासाठी फार मेहनत घ्यावी लागणार आहे. एकंदरीत अशा जरी शंका उपस्थित केल्या तरी भारतातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी या बँकेचे कार्य महत्त्वाचे आहे.

**संदर्भ सूची:**


१) दै. *लोकमत*, ७ जून, २३ नोव्हेंबर, ५,२५,२६ डिसेंबर २०१३.

२) *पुण्यनगरी* ११, १३ , १७ जानेवारी २०१५.

३) संकेतस्थळ, *गुगल*, महिला बँक

४) *दूरदर्शन बातम्या*.

# महाराष्ट्रातील साखर उद्योगः सद्यस्थिती व भवितव्य

**शंकर सुदामराव पवार**, शहादा,
अर्थशास्त्र विभाग,
पूज्य सानेगुरूजी वि. प्र. मंडळाचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
जिल्हा नंदुरबार.
भ्रमणध्वनी: ९४०५१९९७६३
ई-मेल: pawarss@gmail.com

भारतामध्ये ऊसाचे उत्पादन प्राचीन काळापासून घेतले जाते. चिनी ग्रंथात भारत हा ऊसाचे उगमस्थान असलेला देश असा उल्लेख आढळतो. ऊस उत्पादना बाबत भारताचा जगात द्वितीय क्रमांक आहे. जगात ब्राझील, आस्ट्रेलिया, क्युबा, भारत, मेक्सिको या देशांमध्ये प्रामुख्याने ऊस उत्पादन जास्त प्रमाणात घेतले जाते. भारतात प्रामुख्याने ग्रामीण भागात ऊस कारखानदारीने महत्त्वपुर्ण कामगिरी केली आहे. साखर कारखानदारीमुळे अल्कोहोल, वीजनिर्मिती, कागद, अॅसिड, पशुखाद्य, मिठाई, इथेनॉल इत्यादीमुळे ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते. या बरोबरच ग्रामीण रोजगारीची समस्या सोडविण्यासाठी ऊस कारखानदारीचा फार मोठा वाटा आहे. उत्तर भारतामध्ये मुख्यत्वे उत्तरप्रदेश, बिहार, पंजाब, हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, पं.बंगाल आणि आसाम या राज्यांमध्ये ऊसाचे उत्पादन घेतले जाते. देशातील सुमारे ७० टक्के उत्पादन उत्तर भारतामध्ये तयार होते. उत्तर भारतामध्ये उत्पादन जरी जास्त असले तरी ऊस वाढीस हवामान प्रतिकूल असल्याने ऊसाचे व साखरेचे उत्पादन दक्षिण भारतातील राज्यापेक्षा कमी आहे. दक्षिण भारतामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र, आंध्र, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरात, ओरिसा व केरळ ही राज्ये ऊस उत्पादनात अग्रेसर आहेत. या राज्यांपैकी महाराष्ट्रात सर्वात जास्त उत्पादन होते. परंतु अलिकडील दशकात महाराष्ट्रातील ऊस आणि साखर कारखानदारीला विविध समस्यांनी ग्रासले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा उगम, विकास, समस्या आणि भवितव्य यांचा सविस्तर परामर्श घेतला आहे.

शोधनिबंधाची उद्दिष्टये :

१)महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा इतिहास मांडणे.

२)महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा विकास व सद्यस्थिती अभ्यासणे.

३)महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या समस्या अभ्यासणे.

४)महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या भवितव्याचा अभ्यास करणे.

५)महाराष्ट्रातील साखर उद्योगाच्या समस्येवर धोरणात्मक शिफारशी सुचविणे.

## महाराष्ट्रातील साखर उद्योगाचा इतिहास:

महाराष्ट्रातील साखर कारखान्याच्या स्थापनेचा इतिहास ब्रिटीश कालावधीत आढळून येतो. महाराष्ट्रात सर्वप्रथम १९१९ मध्ये ब्रिटीशांनी पहिला साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यात हरेगांव येथे सुरू केला. सन १९३३-३४ मध्ये सहा नवीन साखर कारखाने सुरू झाले. सन १९४१ पर्यंत महाराष्ट्रात एकूण १२ साखर कारखाने कार्यरत होते. सन १९५० मध्ये आशिया खंडातील सहकारी तत्त्वावरील पहिला साखर कारखाना सहकार महर्षी डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांनी अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर (लोणी) येथे सुरू केला.

महाराष्ट्रात सन १९५०-५५ या कालावधीत एकूण १५ साखर कारखाने साखर उत्पादन करीत होते. त्यापैकी सहकारी क्षेत्रामध्ये दोन साखर कारखाने कार्यरत होते. यानंतरच्या काळात सहकारी साखर उद्योगाची वेगाने वाढ झाली. आर्थिक सुधारणांच्या कालावधीत (१९९४-९५) महाराष्ट्रात एकूण १०७ साखर कारखाने होते. त्यापैकी १०४ साखर कारखाने सहकारी तत्त्वावर कार्यरत होते. सन २००६-०७ मध्ये महाराष्ट्रात एकूण २०२ साखर कारखाने नोंदणीकृत होते. यापैकी १४१ साखर कारखाने सहकारी होते. सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्रात एकूण २०९ साखर कारखाने होते. तर २०११-१२ मध्ये ही संख्या २१४ पर्यंत वाढली. परंतु २०११-१२ मध्ये २१४ साखर कारखान्यांपैकी केवळ १७६ कारखाने कार्यरत होते.

## ऊस लागवड:

ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस लागवडीचा कल कमी झाला आहे. कृषी मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार १५ जुलै २०१५ पर्यंत देशातील ४४.८ लाख हेक्टरवर लागवड झाली आहे. जी २०१४-१५ वर्षीच्या तुलनेत २.८ टक्के कमी आहे. सन २०१४-१५ वर्षात ४६.१ लाख हेक्टरवर ऊसाची लागवड करण्यात आली होती. देशात सर्वात जास्त ऊसाचे उत्पादन हे उत्तर प्रदेशात घेतले जाते. उत्तरप्रदेशाची ऊसाची लागवड ०.९० टक्क्यांनी वाढून १९.६ लाख हेक्टर झाली आहे. तर महाराष्ट्रात जुलै २०१५ पर्यंत ८.२१ लाख हेक्टरमध्ये ऊसाची लागवड झाली आहे. सन २०१४-१५ मध्ये महाराष्ट्रातील ऊस लागवड क्षेत्र १०.६२ लाख हेक्टर होते. म्हणजेच महाराष्ट्रात यावर्षी २२.७ टक्के ऊसाचे लागवड क्षेत्र कमी झाले आहे. असे असले तरी कर्नाटकमध्ये २३.८, तामिळनाडूमध्ये १७.१ टक्के लागवड क्षेत्र वाढले आहे. परंतु महाराष्ट्रात ऊस लागवडक्षेत्र कमी होण्यामागे दुष्काळी परिस्थिती, साखरेचे कमी होत असलेले भाव तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांची २१,००० कोटी रुपयांची थकबाकी अशी कारणे आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी ऊसा व्यतिरिक्त इतर पिके घेण्याकडे वळले आहेत.

## सहा वर्षात सर्वात कमी साखरेचे भाव:

साखरेच्या किंमती कमी होण्याचे संकट या वर्षी वाढले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात देखील गेल्या सहा वर्षात वर्षातील सर्वात खालच्या पातळीवर साखरेची किंमत आहे. देशातही साखर २२०० रुपये प्रति क्विंटलच्या खाली विक्री होत आहे. या उलट या वर्षी देखील साखरेचे भारतात विक्रमी उत्पादन होण्याचा अंदाज आहे.

साखर हंगाम संपतांना म्हणजेच सप्टेंबर अखेरीस साखरेचा सरासरी दर लक्षात घेऊन ऊसाची उचित आणि रास्त किंमत (एफआरपी) ठरवली जावी म्हणजे साखरेचे दर वाढले तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना देता येईल, साखर दरात घसरण झाली तर त्याचा फटका कारखान्यांना बसणार नाही. यामुळे एफआरपी च देता येणार नाही ही यावर्षीची समस्या भविष्यात कारखान्यांपुढे उरणार नाही, असा प्रस्ताव डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिला आहे.

साखर उद्योगाचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी हे धोरणात्मक बदल लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रचलित पद्धतीनुसार साधारणतः जानेवारी-फेब्रुवारीमध्ये म्हणजे पुढच्या हंगामाच्या आधी ९-१० महिने ऊसाची एफआरपी निश्चित होते. ही ऊसदर ठरवतांनाची आणि प्रत्यक्ष एफआरपी देतांनाची साखरेची किंमत यात तफावत असते. त्यामुळे ही पद्धत बदलणे गरजेचे आहे. तसेच एफआरपी चौदा दिवसात देण्याऐवजी पूर्वीप्रमाणेच तीन हप्त्यांत देण्याची मुभा कारखान्यांना असावी अशीही सुचना डेक्कन शुगरचे अध्यक्ष राजाभाऊ शिरगांवकर यांनी केली.

संकटात सापडलेली कारखानदारी कशी टिकेल, या चिंतेने सध्या तिच्याशी संबंधित सर्वांनाच ग्रासले आहे. ही चिंता महाराष्ट्र व उत्तर प्रदेशात अधिक आहे. कारण देशातील बहुतांश साखर या दोन राज्यात तयार होते. जोपर्यंत साखरेला चांगला भाव मिळत होता आणि सरकारही साखर कारखान्यांना भरपूर मदत करत होते, तोपर्यंत बरे चालले होते. मात्र गेली चार-पाच वर्षे या उद्योगापुढील समस्या गंभीर झाल्या आहेत. ऊसाच्या उचित व रास्त भावावरून (एफ.आर.पी.) यावर्षी बरेच रणकंदन झाले आणि असे काही झाले की, सरकारकडून कर्ज घेऊन नेहमीप्रमाणे हा प्रश्न सोडवला जाईल, अशी अटकळ काहींनी बांधली होती. परंतु राजकीय आखाड्यात बरेच काही होऊन केंद्र सरकारने सहा हजार कोटी रुपयांचे बिनव्याज कर्ज जाहीर केले. आर्थिक अडचणीत असलेले सरकार मदत तरी कशाकशाला करणार ? त्यामुळेच साखर कारखान्यांना २१ हजार कोटी रुपयांची गरज असून ही तुट कशी भरून काढणार, हा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे, तो कसा सोडवणार, हे अजून स्पष्ट झाले नसतांना डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोशिएशनने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना एक प्रस्ताव पाठवला आहे. हा प्रस्ताव या उद्योगाच्या आगामी काळातील समस्या कमी करण्यासाठी सुचवण्यात आला आहे. साखर हंगाम संपतांना म्हणजेच सप्टेंबर अखेरीस साखरेचा सरासरी दर लक्षात घेऊन ऊसाचा एफआरपी ठरवला जावा. म्हणजे साखरेचे दर वाढले तर त्याचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा आणि साखर दरात घसरण झाली तर त्याचा फटका कारखान्यांनाही बसू नये, यामुळे एफआरपी च देता येत नाही, अशी नामुष्की भविष्यात कारखान्यावर येणार नाही, असा हा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव व्यवहार्य वाटत असला

तरी साखर कारखान्यावर शेतकऱ्यांनी विश्वास टाकावा अशी स्थिती आज नाही. राज्यात सर्वाधिक साखर उतारा आणि सर्वोच्च प्रतिएकरी ऊस उत्पादन असणाऱ्या जिल्ह्यातील साखर कारखानेही या वर्षी तग धरू शकलेले नाहीत, तेथे साखर उतारा आणि उत्पादनात मागे असलेल्या मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्रातील कारखान्यांची स्थिती बिकट आहे. त्यातच भर म्हणजे गेल्या हंगामात देणी थकवलेले कारखाने सुद्धा राज्यात मोठ्या संख्येने आहेत. शेतकऱ्यांचे पैसे १४ दिवसात देणे हे आज कायदेशीर बंधन असतांना ही अवस्था आहे. डेक्कन शुगर च्या प्रस्तावात तीन हप्त्यात पैसे देण्याचा मार्ग सुचवला आहे. ही सुट दिल्यावर कारखाने कोणत्या थराला जातील, याचा अंदाज बांधणे अवघड आहे. अर्थात आयआयटी च्या धर्तीवर केंद्राने इंडियन इन्स्टिटयुट ऑफ शुगर मॅनेजमेंटची (आयआयएस) स्थापना करावी, साखरेची, उपपदार्थांची राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळावी अशा या प्रस्तावात चांगल्या सुचना आहेत.

ऊस नियंत्रण कायद्यानुसार ऊसाचे गाळप झाल्यानंतर कमालाच्या चौदा दिवसांत ऊस उत्पादकांना एफआरपी देण्याचे बंधन साखर कारखान्यांवर टाकण्यात आले आहे. मात्र ही तरतूद व्यावहारिक नाही. कारण साखरे व्यतिरिक्त चिपाड, मळी, प्रेसमड आदि उपपदार्थांना मिळणाऱ्या किंमतीच्या आधारे ऊसाची अंतिम एफआरपी निश्चित होत असते. मात्र या उपपदार्थांची विक्री चौदा दिवसात होत नसल्याचे डेक्कन शुगरने सरकारच्या लक्षात आणून दिले. त्यामुळे ऊसाचे गाळप झाल्यानंतर १४ दिवसांत एफआरपी च्या ७० टक्के रक्कम शेतकऱ्यांना द्यावी, हंगाम बंद होतांना वीस टक्के आणि तिसरा हप्ता नवा हंगाम सुरू होण्यापुर्वी म्हणजे सप्टेंबरमध्ये द्यावा, याप्रमाणे तीन टप्प्यात एफआरपी देण्यात यावी, या दृष्टीने ऊस नियंत्रण कायद्यात दुरूस्ती आवश्यक असल्याचे डेक्कन शुगरचे मत आहे.

**मराठवाड्याची स्थिती :**

मराठवाड्यातील २७ खाजगी आणि २५ सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून दरवर्षी साखर, वीज, इथेनॉलचे उत्पादन, वाहतूक, तोडणी शेतकऱ्यांची बिले यासाठी तब्बल २४,००० कोटी रुपयांची उलाढाल होते. या उद्योगांच्या उभारणीसाठी गुंतवणूक झालेल्या भांडवलाचे बाजारातील मूल्य ५००० कोटी रुपयांचे आहे. गाळप बंद केल्यास साडेपाच लाख शेतकरी, दोन लाख तोडणी मजूर, ४० हजार कर्मचारी आणि १० हजारांवर वाहतूकदारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे भरमसाठ पाणी लागत असल्याचे सांगून ऊस उत्पादन आणि गाळपावरच बंदी आणणे म्हणजे दुष्काळात पिचलेल्या मराठवाड्याला संकटाच्या खाईत लोटल्यासारखे आहे.

मराठवाड्यात ७० च्या दशकापर्यंत कापूस, भुईमूग, कडधान्य अशी पारंपरिक पिके घेतली जात होती. मराठवाड्यात प्रथमतः १९६७ साली उस्मानाबाद जिल्ह्यातील ढोकीमध्ये तेरणा साखर कारखान्याची स्थापना झाली आणि शेतकरी हळूहळू ऊस पिकाकडे वळले. प्रारंभी ऊसाला प्रतिटन २१० रुपये भाव दिला जात होता. २०१५ पर्यंत तो १९०० रुपयापर्यंत पोहोचला. एवढ्या वर्षात सातत्याने भाव वाढत जाण्याची हमी इतर कोणत्याही पिकाने दिली नाही. इतर

पिकांच्या दरांमधील चढउतार पाहता बहुतांश शेतकरी ऊसाकडे वळले. या संक्रमण काळात मराठवाड्यातील कृषी विद्यापीठे, जलतज्ज्ञ, सरकार, बिगर सरकारी संस्था यांच्यामार्फत कधीही शेतकऱ्यांना पाणी बचतीचे आणि पाणी जपून वापरण्याचे धडे देण्यात आले नाही किंवा त्यांचे प्रबोधन करण्यात आले नाही. त्यामुळे शेतकरी आपापल्या सोयीप्रमाणे ऊसाला पाणी वापरत राहिला त्यात त्याला गुन्हेगार ठरवता येणार नाही. ठिबकाचे तीन-तीन वर्षे शेतकऱ्यांचे ५० टक्केचे अनुदान देण्यात आले नाही. पाण्याची चिंता करणाऱ्या सरकारने गुजरातच्या धर्तीवर ९० टक्के अनुदान देऊन १५ दिवसांच्या आत शेतकऱ्यांची रक्कम दिली असती तर आज मराठवाड्यातला ९० टक्केपेक्षा जास्त ऊस ठिबकावर आधारित राहिला असता.

**साखर गाळप बंद करण्याचे परिणाम:**

मराठवाड्यात गेल्या तीस वर्षात साखर कारखानदारी रूजल्यानंतर तेथील परिस्थिती पालटली आहे. पायात चप्पल न घालू शकणारी शेतकऱ्यांची मुले दुचाकीवरून फिरतांना दिसतात. मोठ्या शेतकऱ्यांकडे चारचाकी गाड्या आल्या, कुडाची घरे जाऊन पक्की घरे बांधली. डॉक्टर, इंजिनिअर, आयआयटी असे अशक्यप्राय असणारे महागडे शिक्षण ऊस उत्पादक शेतकऱ्यांची मुले घेऊ लागली. आर्थिक बदलांमुळे झालेला हा सामाजिक बदल थक्क करणारा आहे.

मराठवाड्यातील साखर कारखाने बंदीचा निर्णय सरकारने मागील काही दिवसांमध्ये विचारार्थ घेतला आहे. खरे तर आपल्या शेतात कशाचे पिक घ्यायचे याचा घटनात्मक अधिकार शेतकऱ्यांना आहेच. तो सरकारला कसा हिरावून घेता येईल. जर देशातील इतर कारखानदारांना कशाचे उत्पादन घ्यायचे यावर निर्बंध नाहीत तर साखर कारखानदारांवरच निर्बंध कसा घालता येईल ? तसेच खुल्या अर्थव्यवस्थेत एका विशिष्ट प्रदेशातच अशी बंदी आणता येईल काय ? पर्यायी उपाययोजना करण्याऐवजी त्यावर बंदीचा निर्णय घटनात्मक अधिकारांची पायमल्ली करणारा आहे.

मराठवाड्यातील जिल्हा बँका, पतसंस्था, सहकारी बँका आणि राष्ट्रीयकृत बँकांच्या माध्यमातून साखर, इथेनॉलची खरेदी होते. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होतात. २४ हजार कोटींचे व्यवहार बँकांमधून होतात. त्यामुळे साखर कारखानदारीवर बँकांचेही भवितव्य अवलंबून आहे. कारखानदारी बंद पडल्यास त्यांचेही भवितव्य धोक्यात येऊ शकते.

मराठवाड्यातील उद्योगांची आर्थिक उलाढाल लक्षात घेतल्यास मराठवाड्यात एकूण ५२ साखर कारखाने आहेत. ज्यामध्ये २०० लाख टन उसाचे गाळप होते. तर ५०० कोटी रुपयांचे साखर उत्पादन होते. या बरोबरच ५००० कोटी रुपये शेतकऱ्यांची बिले असतात, याशिवाय १५०० कोटी रुपयांची इथेनॉलची निर्मिती होते. १०००कोटी रुपये वाहतूकदारांचे बिल होते, ४०० कोटी रुपये कर्मचाऱ्यांचा पगार आणि ३०० कोटी रुपये तोडणी कामगारांची मजुरी होते. याशिवाय साखरपुरक उद्योगांचे १५ हजार कोटींचा व्यवसाय होतो. सरकारने साखर गाळप बंदीचा निर्णय घेतल्यास वरील सर्व घटकांचे आर्थिक चक्र थांबेल.

**साखर उद्योगाचे भवितव्य:**

इथेनॉलचे उत्पादन वाढवणे, साखरेचा बफर साठा वाढवणे, अधिक सबसिडी देऊन तिची निर्मिती वाढवणे, साखरेची किंमत आणि ऊसाचे दर यांचा थेट संबंध जोडण्यात यावा, या रंगराजन समितीच्या शिफारशींचा विचार करणे हे या उद्योगाला वाचवण्याचे खरे मार्ग आहेत. अर्थात साखरेचे जगातच उत्पादन वाढले आहे, त्याचीही दखल आता घ्यावी लागणार आहे. कारण साखर निर्यात करायची तर जागतिक बाजार भावाशी स्पर्धा करणे क्रमप्राप्त आहे. स्पर्धा तर दूरच पण देशी साखर महाग आणि आयात साखर स्वस्त, अशी वेळ येऊ घातली आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ साखर कारखाने आणि शेतकरी यांच्यापुरताच मर्यादित राहिलेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. सरकारने इतकी वर्षे या उद्योगाला संरक्षण दिले आणि ते दिलेच पाहिजे होते, मात्र जागतिकीकरणाच्या लाटेत असे मदतीवर उभे असणारे उद्योग टिकू शकत नाहीत, हे समजून घ्यावे लागेल. ऊसाचा भाव वाढवून मिळावा अशी आंदोलने दरवर्षी होतात आणि त्यानुसार दर वाढवून देण्याचे प्रयत्न केले जातात. मात्र हे आता नव्या स्थितीत शक्य होणार नाही हे विसरून चालणार नाही. पण या विषयी गेली काही वर्षे तज्ज्ञांनी किती विचार केला आणि सरकारने त्यानुसार कोणती धोरणे बदलली, हे कळण्यास मार्ग नाही. एकीकडे ज्या सहकारातून हे उद्योग उभे राहिले, त्या सहकारात सभासद हा मालक आणि संचालक हे विश्वस्त हे सूत्र राजकीय संचालकांनी चरकात घातल्याने कारखानदारांच्या शब्दावर विश्वास ठेवण्याची मानसिकता शेतकऱ्यांत उरलेली नाही. तर दुसरीकडे साखरेचा बाजारभाव आता कोणाच्या हातात राहिला नाही. त्यामुळे प्रश्न फक्त आर्थिक तुटीपुरता मर्यादित नाही. ही तुट भरूनही निघेल. पण भावना आणि विश्वासाचा बॅकलॉग भरून काढण्याचे खरे आव्हान सहकारी साखर कारखान्यांना पेलावे लागणार आहे.

**साखर उद्योग जगविण्यासाठी :**

नवा हंगाम आला तरी देशात अजूनही १४ हजार कोटींची जुनी एफआरपी थकीत आहे. राज्यातल्या ऊस उत्पादकांचे २७०० कोटी थकले आहेत. एफआरपी जाहीर करतांना साखरेचा दर ३३ रुपये होता. गेल्या वर्षभरात साखरेचा सरासरी दर मात्र २२ रुपयापर्यंत घसरला आहे. थकीत एफआरपी चा प्रश्न यातूनच निर्माण झाला. यावर नियंत्रण आणले नाही तर साखर उद्योग कोलमडू शकतो.

मराठवाड्यासह नगर, पुणे विभागावर सध्या दुष्काळाची छाया आहे. या भागात पाचशे लाख टन ऊस उभा आहे. पावसाअभावी मुदतीपुर्वीच आताच यातील ऊस तुटू लागला आहे. अपुऱ्या वाढीचा ऊस किरकोळ किंमतीत चाऱ्यासाठी विकला जात आहे. मात्र यानंतर सुद्धा सुमारे अडीचशे लाख टन ऊस शिल्लक राहणार आहे. हा ऊस गाळपाला गेला नसता तर शेतकऱ्यांची अवस्था आगीतून फुफाट्यात अशी झाली असती.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी बचत करण्यासाठी ऊस गाळपास बंदी घालण्याचा विचार सरकारने केला तर राज्य सरकारच्या तिजोरीवर पाच हजार कोटींचा बोजा पडू शकतो. दुष्काळी भागातल्या सुमारे अडीचशे लाख टन ऊसाचे गाळप थांबविले तर ऊस उत्पादकांना अंदाजे पाच हजार कोटी रुपये देण्याचा शासनावर

बोजा पडला असता. म्हणूनच सरकारने तातडीने हा विचार बदलला.

**ऊसाला ठिबक अनिवार्य पाहिजे:**

राज्याच्या एकूण पीक क्षेत्रापैकी जेमतेम ४ टक्के असणारा ऊस राज्यातले तब्बल ७० टक्केपाणी अवशोषीत करतो. एक किलो साखर तयार होण्यासाठी १२० लिटर पाणी लागते. यामुळे ऊसाला जलतज्ज्ञांच्या विरोध आहे. एक हेक्टर ऊस तयार होईपर्यंत सुमारे ३०० लाख लिटर पाणी वापरले जाते. ठिबक सिंचनाने पाणी वापर निम्म्यापेक्षा कमी होतो. उत्पादन ३० टक्क्यांनी वाढते. दरम्यान, वर्ष अखेर राज्यात ऊसासाठी ठिबक सक्तीचे करणार असल्याची घोषणा महाराष्ट्र सरकारने केली आहे.

**संदर्भ सूची:**


१. लाड प्रताप बापूसो (२०१०), *महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगांची सद्यस्थिती व उपाययोजना*, अर्थसंवाद, ऑक्टोंबर ते डिसेंबर, खंड ३४, अंक ३

२. सुर्यवंशी नागेश मोहनराव (२०१३) *महाराष्ट्रातील साखर उद्योग : समस्या व उपाय*, अर्थसंवाद, ऑक्टोंबर डिसेंबर, खंड ३७, अंक ३

३. महाजन एस.एस.(२०१५) *ऊस शेती: समस्या आणि उपाय*, बळीराजा, ऑगस्ट २०१५, पुणे

४. दै. दिव्य मराठी, २२ जुलै २०१५, ४ ऑगस्ट २०१५, ५ ऑगस्ट २०१५, ३ सप्टेंबर २०१५, ४ सप्टेंबर २०१५

५. दै. पुण्यनगरी, १२ ऑक्टोंबर २०१५

६. www.vsisugar.com

७. www.mahasugarfed.org

# महाराष्ट्रातील गिरणी कामगारांचे आंदोलन

**अविनाश कुलकर्णी**, नवी दिल्ली,
पोस्ट-डॉक्टरल रिसर्च फेलो,
इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च.
भ्रमणध्वनी: ९८२२२०३१८७

आधुनिकपूर्व काळात भारतातून प्रामुख्याने शेती व कलाकुसरीच्या वस्तूंचा व्यापार मोठ्या प्रमाणात होत असे. यामध्ये प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ व हाताने विणलेले मुलायम सुती, रेशमी कापड व कपडे यांचा वाटा मोठ्या प्रमाणात होता. भारतातून या वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यातही होत असे. परंतु ब्रिटिश राजवटीत भारतातील हस्त व कलाकुसरीच्या उद्योगांचा ऱ्हास झाला, इंग्लंडमध्ये यंत्रावर तयार झालेले कापड व कपडे यांची आयात मोठ्या प्रमाणात वाढली. सन १८२० मध्ये हिंदुस्थानात कापडाची एकूण आयात फक्त साडेतीन लाख रुपये होती. परंतु हा आयातीचा खर्च १८६० पर्यंत वाढून कापडाची आयात एकूण रुपये १९.३ मिलियन इतकी झाली. परिणामी देशातील कारागीर व कामगार बेकार झाले, दारिद्र्यात वाढ झाली. विदेशी कापडाच्या व्यापाराच्या या पार्श्वभूमीवर कालांतराने विशेषत: २० व्या शतकाच्या पुर्वाधात हिंदुस्थानात औद्यगिकीकरणास सुरुवात होऊ लागली. यातूनच मुंबईमध्ये कापड गिरणी उद्योगांची मुहूर्तमेढ रोवली गेली. या कापड गिरणी उद्योगाच्या वाढीची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**पार्श्वभूमी:**

ब्रिटिश टेक्सटाईल मशिनरी उत्पादकांच्या पाठिंब्याने लँकेशायर गिरणी मालकांचा विरोध मोडून काढला गेला आणि मुंबईत बॉम्बे स्पिनिंग मिल ही पहिली कापड गिरणी सन १८५४ मध्ये कोवसजी नानाभाई दावर यांनी सुरू केली. ही कापड गिरणी सुती कापडाची निर्मिती करून इंग्लंडला निर्यात करीत असे. त्यानंतर सन १८७० पर्यंत मुंबईत १३ कापड गिरण्या उत्पादन करू लागल्या. १८७५ पर्यंत मुंबईत एकूण ७० कापड गिरण्या कार्यरत होत्या. या कापड गिरण्यांची स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच ब्रिटिश राजवटीत भरभराट झाली. सन १९१५

पर्यंत मुंबईतील कापड गिरण्यांची एकूण संख्या ८३ पर्यंत पोहोचली त्यामुळेच मुंबईची ओळख पूर्वेकडचे मँचेस्टर अशी होऊ लागली. या कापड गिरण्या मुख्यत्वे मुंबईतील गिरगावमध्ये सुरू झाल्याने मुंबईचे हे गिरणगाव म्हणून ओळखले जाऊ लागले. मुंबईतील ह्या कापड गिरणी उद्योगाच्या इतिहासातील काही प्रमुख नावे पुढीलप्रमाणे. परळ मधील झेन्ही मिल, फिनले मिल, दादर मधील कोहिनूर मिल १ आणि २ तसेच इंडिया युनायटेड नं.६, वरळीतील फिनिक्स मिल, मधुसुदन मिल, सिताराम मिल, पोदार प्रोसेसिंग आणि भारत मिल, लालबाग येथील कमला मिल, जाम मिल, तसेच डॉन मिल, श्रीराम मिल, टाटा मिल, बॉम्बे स्पिनिंग मिल, दिग्विजय मिल, दि खटाव मिल - भायखळा, ज्युपीटर मिल, युनाटेड नं४ - काळाचौकी इत्यादी. अशाप्रकारे मुंबईतील कापड उद्योगासाठी मुख्यत्वे दक्षिण मुंबईची जागा निवडली गेली होती. यापैकी लोअर परेल, परेल आणि भायखळा ही कापड गिरण्यांची प्रसिद्ध ठिकाणे आहेत. नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशनच्या मालकीच्या एकूण २५ गिरण्या मुंबई शहरात होत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरु झालेल्या ह्या कापड गिरणी उद्योगाची भरभराट स्वातंत्र्योत्तर काळात होत असताना या कापड गिरण्या महाराष्ट्र राज्यात इतरत्रही विकसित झाल्या उदा. भिवंडी जि. ठाणे, सोलापूर, इचलकरंजी जि. कोल्हापूर इ. परंतु या कापड गिरण्यांमधील कामगारांना मिळणारे वेतन आणि त्यांचे राहणीमान, जीवनमान यासारखे आर्थिक व सामाजिक प्रश्न आजही सुटलेले नाहीत, त्यामुळे गिरणी कामगारांचा संघर्ष आजही सुरुच असलेला दिसून येतो. गिरणी कामगारांच्या आंदोनावर आधारित असलेल्या ह्या शोध निबंधाचा उद्देश पुढीलप्रमाणे आहे.

मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी तत्कालीन मराठी प्रांतातील विशेषत: कोकणातील अनेक कामगार मुंबईमध्ये स्थलांतरीत झाले. मुंबईतील गिरण्यांमध्ये काम करण्यासाठी आलेल्या कामगारांना मूलभूत स्वरुपाच्या कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध नव्हत्या. त्यांचे जीवन अतिशय हालाखीचे होते. त्यांचे शोषण केले जात होते. मुंबईतील तत्कालीन गिरणी कामगारांचे शोषण आणि साध्यकालीन मराठी (महाराष्ट्र) राज्यातील इतर ठिकाणच्या गिरणी कामगारांच्यामध्ये बरेचसे साम्य असल्याचे आढळून येते. त्यामुळेच मुंबईतील तत्कालिन गिरणी कामगार व इतरत्र असलेला गिरणी कामगार यांच्या संघर्षाचा तुलनात्मक आढावा घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

शोधनिबंधाचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल. औद्योगिक समाजशास्त्र/अर्थशास्त्र यामधील औद्योगिक कामगार आणि औद्योगिक कलह, आणि मुंबईतील गिरणी कामगार व त्यांची चळवळ याविषयांमध्ये बरेच संशोधन व लिखाण झालेले आहे. परंतु आजच्या स्पर्धात्मक काळात मुंबई व इतरत्र असणारे गिरणी कामगार, त्यांची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती याचा अभ्यास करण्याच्या दृष्टिने हा शोधनिबंध आवश्यक व महत्त्वपूर्ण असल्याचे दिसून येते.

**संकल्पनात्मक व सैद्धांतिक पार्श्वभूमी:**

या शोधनिबंधास मालक आणि मजूर वर्ग यांच्यामधील वर्ग संघर्ष सिद्धांताची पार्श्वभूमी असल्याचे दिसून येते. कार्ल मार्क्सच्या संकल्पनेनुसार भांडवलदारांकडून मजुरांचे शोषण

होते व मजूर आणि मालक यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होतो. अर्थात मार्क्सच्या ऐतिहासिक द्वंद्वात्मक सिद्धांताची पार्श्वभूमी या शोधनिबंधास असल्याचे स्पष्ट होते.

### संशोधन पद्धती व मर्यादा:

हा शोधनिबंध दुय्यम संदर्भ साधनांवर आधारित आहे. या शोधनिबंधासाठी प्रामुख्याने तुलनात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच या शोधनिबंधामध्ये गिरणी कामगारांचे आंदोलन म्हणजे मुंबई, सोलापूर आणि इचलकरंजी येथील गिरणी कामगारांच्या आंदोलनाचा तुलनात्मक आढावा घेण्यात आला आहे ही या शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा आहे. या शोधनिबंधामध्ये प्रथम तत्कालीन मुंबईतील गिरणी कामगारांच्या आंदोलनास कारणीभूत असलेल्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

### मुंबईतील गिरणी कामगारांच्या समस्या:

मुंबईतील कापड गिरण्यांमध्ये स्त्री आणि पुरुष हे दोन्ही काम करत असत, अगदी लहान वयातच साधारणतः १६ व्या वर्षीच ते कामास सुरुवात करत आणि फॅक्टरी अॅक्ट १८४७ संमत होईपर्यंत ते सुर्योदयापासून सुर्यास्तापर्यंत एकूण १२ तास काम करत. तत्कालिन मराठी प्रांतातील बहुतेक करून कुटुंबातील पुरुष मुंबईत कामास होते, तर उर्वरित कुटुंब गावाकडेच राहात होते. सुरुवातीस हे कामगार होस्टेलमध्येच रहात असत. गिरणीतील कामगारांपैकी ९० टक्के लोकसंख्या गिरण्यांपासून १५ मिनिटांच्या पायी चालत जाण्याच्या अंतरावर राहात असे. गिरणी कामगारांच्या निवासी व्यवस्थेत बहुतेक करुन चाळी होत्या. सर्व कुटुंबासह राहण्यासाठी तेथे एक एक खोली असलेल्या ह्या चाळी होत्या. परळ ते पश्चिमेला वरळी पर्यंत लोकसंख्येची घनता खूप जास्त होती.

१९२१ मध्ये परळ येथील पाहणीत २७% लोकसंख्या या खोल्यांमध्ये राहात असल्याचे आढळून आले. एका खोलीत सहा व त्यापेक्षा जास्त जण राहात होते. ह्या चाळी सरकार व गिरणी मालक या दोघांनी बांधलेल्या होत्या. परंतु घरांच्या गुणवत्तेबाबत कोणतीच दक्षता घेण्यात आलेली नव्हती. १९२१ मध्ये दादरमधील एक चाळ काळोखी म्हणून वर्णन केली जात असे. कारण तिथे दिवसासुद्धा सूर्यप्रकाश पोहोचत नव्हता. तसेच या खोल्यामध्ये योग्य प्रमाणात खेळती हवा नव्हती. विशेष म्हणजे संडास व बाथरुमच्या सोयींअभावी स्त्रियांना खूप त्रास सहन करावा लागे. पावसाळ्यात गटाराचे सांडपाणी घरात वाहून येऊ नये म्हणून खिडक्या बंदच ठेवल्या जात. गिरणगावातील (मुंबईतील) रहिवासी त्यांचा बहुसंख्य वेळ रस्त्यांवरच घालवतात. मोहरम, गणेश चतुर्थी, आणि दहीहंडी या सणांमध्ये त्यांचा जास्त सहभाग असतो. स्थानिक दुकानदार आणि गिरणी मालक या सणांसाठी त्यांच्या वाट्याची वर्गणी जमा करतात. गिरणगावातील कामगारांना कला म्हणजे कविता, नाटक आणि तमाशा यांची भारी आवड आहे. अशाप्रकारे मुंबईतील गिरणी कामगारांचे आर्थिक व सामाजिक शोषण होत होते.

मुंबईतील गिरणी कामगारांना जास्त तास काम करावे लागत होते, त्यामुळे ते मानसिक व शारीरिकदृष्ट्या अतिशय थकलेले होते. त्यांच्या घरांची स्थिती चांगली नव्हती. ते अधिकाऱ्यांकडून, गिरणी मालकांकडून दुर्लक्षित तर खासगी बांधकाम

व्यावसायिकांकडून शोषित झाले होते. मुंबईतील हे गिरणी कामगार आरोग्याच्या दृष्टीने रोगट व अस्वच्छ सुर्यप्रकाश आणि घाणीतील जागेत राहात होते. या शोषणाची अथवा सापेक्ष वंचिततेची (जाणीवपूर्वक दूर्लक्षित असलेला सामाजिक घटक) जाणीव झालेल्या मुंबईतील गिरणी कामगारांना नेतृत्व मिळताच त्यांचा गिरणी मालकांच्या शोषणा विरुद्ध संघर्ष सुरु झाला, त्याचा आढावा पुढीलप्रमाणे.

### मुंबईतील गिरणी कामगारांचे आंदोलनः

सन १९८१ साली दत्ता सामंत यांची मुंबईतील गिरणी कामगारांच्या मोठ्या गटाने मुंबई गिरणी मालक संघ (मील ओनर्स असोसिएशन) आणि कामगार यांच्यातील वादात नेता म्हणून निवड केली. दत्ता सामंत यांनी राष्ट्रीय मील मजदूर संघ या संघटनेचे नेतृत्व केले. त्यांनी मुंबईतील संपूर्ण कापड गिरणी उद्योग एक वर्षापेक्षा जास्त काळ बंद राहिल अशी संपाची योजना तयार केली. मुंबईतील जवळपास २,५०,००० गिरणी कामगार संपावर गेले आणि ५० कापड गिरण्या बंद झाल्या. ऑगस्ट १९८२ मध्ये मुंबई शहर पोलीस गिरणी कामगारांना सहानुभूतीपूर्वक संपावर गेले.

दत्ता सामंत यांची महाराष्ट्रातील राजकारणात नाळ जोडलेली होती. तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधींनी हा राजकारणातील धोका असल्याचे जाणले होते. सामंत यांचा गिरणी कामगारांवरचा पगडा इंदिरा गांधी व कॉंग्रेस नेत्यांना भितीदायक वाटत होता की, सामंतांचा हा प्रभाव बंदर आणि गोदी कामगारांवर पडू नये. त्यामुळे सरकारने सामंतांच्या मागण्या नाकारून ठोस पावित्रा घेतला. असंघटितपणा आणि असमाधानकारक संपावरील तोडगा यामुळे अनेक गिरणी मालकांनी त्यांचा उद्योग मुंबई शहरा बाहेर हालविले. शहरातील कापड गिरण्या बंद पडण्यामुळे हजारो कामगार बेकार झाले. बहुसंख्य ८० पेक्षा जास्त मध्य मुंबईतील गिरण्या बंद झाल्या आणि संपानंतर १,५०,००० पेक्षा जास्त कामगार बेकार झाले. मुंबईत कापड गिरणी उद्योग मोठ्या प्रमाणात दिसेनासा झाला व संपानंतर कामगारांचे स्थलांतरही कमी झाले.

आज रोजी मुंबईतील गिरण्यांच्या जागा आणि गिरणी कामगारांच्या चाळींचा प्रश्न संघर्षमय झाला आहे. मुंबईतील गिरण्याच्या जागांना मिळणारा बाजारभाव गगनाला भिडला आहे. त्याचबरोबर या गिरण्यांच्या जागी घरे बांधून ती गिरणी कामगारांना मोफत देण्यात यावी यासाठी गिरणी कामगार रस्त्यावर उतले आहेत, आंदोलने होत आहे, तरीही हा प्रश्न दिवसेंदिवस अधिकच जटील होत आहे व गिरणी कामगारांना घराच्या हक्कांपासूनही वंचित व्हावे लागणार असल्याचे प्राथमिक चित्र स्पष्ट होऊ लागले आहे. तरीही गिरणी कामगारांचा लढा सुरुच आहे.

मुंबईतील गिरणी कामगारांच्या आर्थिक, सामाजिक शोषणाची व आंदोलनाची ही पार्श्वभूमी दृष्टिक्षेपात असताना आता महाराष्ट्र राज्यातील इतरत्र असणाऱ्या गिरणी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक शोषणाची पार्श्वभूमीसुद्धा संघर्षमय झाली आहे. त्यापैकी प्रथम आपण सोलापूर येथील गिरणी कामगारांच्या आंदोलनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

### सोलापूरातील गिरणी कामगारांचे आंदोलनः

किमान वेतनाच्या प्रश्नावर सोलापूरमध्ये यंत्रमाग (गिरणी) कामगारांनी २ मे २०१५ पासून सहा दिवस जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

केले असता सोलापूरचे पालकमंत्री विजय देशमुख व काँग्रेसच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी या आंदोलनाची कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. यंत्रमाग कामगारांना प्रतिशंभर कार्डामागे केवळ ८ ते १३ पैसे मजुरीत वाढ करण्याचा निर्णय यंत्रमाग कारखानदारांनी घेतला. परंतु हा निर्णय कामगारांना मान्य नाही. या प्रश्नावर कामगारांनी यंत्रमाग कारखाने बंद केल्यामुळे तेथील आर्थिक उलाढाल ठप्प झाली आहे. या उद्योगात दररोज सुमारे पाच कोटींची उलाढाल होते. कामगारांच्या संपामुळे सुमारे ५० कोटींची उलाढाल थांबल्याचे सांगितले जाते.

२९ वर्षांपासून (म्हणजेच मुंबईतील गिरणी कामगारांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर) यंत्रमाग कामगारांच्या किमान वेतन व विशेष भत्त्यामध्ये सुधारणा केली आहे. यात कुशल कामगाराला ८५०० ते १०,१०० रुपये, अर्धकुशल कामगाराला ८००० ते ९५०० रुपये आणि अकुशल कामगाराला ७५०० ते ९००० रुपये पर्यंत किमान वेतन निश्चित केले. परंतु सुधारित वेतनाप्रमाणे किमान वेतन मिळवून देण्यासाठी शासन असमर्थ ठरले आहे. त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष वाढला आहे. सोलापूरमध्ये गिरणी कामगारांची संख्या ८० हजारांच्या घरात आहे.

सरकार आणि कारखानदार यांनी कोणत्याच प्रकारचा तोडगा न काढल्यामुळे बंद आणखी चिघळला आहे. एमआयडीसी आणि गांधीनगर भागामधील कामगारांमध्ये अशांतता पसरली आहे. १४ दिवसांपासून कामगारांच्या घरातली चूल पेटली नसल्यामुळे कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान पोलिसांनी कामगारांवर केलेला लाठीमाराचा निषेधही नोंदविण्यात आला. यापुढे कामगारांवर पोलिसांनी लाठी उगारली तर आम्हालासुद्धा हातात बंदुका घ्याव्या लागतील, असा इशारा विष्णू कारमपुरी यांनी दिला आहे.

सोलापूर येथील गिरणी कामगारांच्या आंदोलनाचा वरीलप्रमाणे आढावा घेतल्यानंतर इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर येथील गिरणी कामगारांच्या आंदोलनाचा आढावा पुढीलप्रमाणे घेऊ.

**इचलकरंजी गिरणी कामगारांचे आंदोलन:**

तब्बल ३० वर्षांनंतर यंत्रमाग कामगारांना सुधारित किमान वेतन देण्याचा अध्यादेश राज्य सरकारने जारी केल्यानंतर त्याची उग्र प्रतिक्रिया वस्त्रनगरी इचलकरंजीमध्ये उमटली. या अध्यादेशाची अंमलबजावणी करावी यासाठी सायझिंग-वार्पिंग (गिरणी) कामगारांनी सुरू केलेल्या आंदोलनाचा बुधवार दिनांक ९ सप्टेंबर २०१५ हा ५० वा दिवस होता. प्रदीर्घ काम बंद आंदोलनाने वस्त्रनगरीची रु. ३०० कोटींहून अधिक उलाढाल ठप्प झाली आहे.

वस्त्रनगरीत सुमारे सव्वा लाखाहून अधिक साधे यंत्रमाग, २५ हजार अत्याधुनिक यंत्रमाग आहेत. यामध्ये दररोज ५० ते ७५ कोटी रुपयांची उलाढाल होते. या आंदोलनाचा परिणाम इचलकरंजी शहराच्या इतर आर्थिक घटकांवरही होत आहे. पानाच्या टपरीपासून ते मॉलपर्यंतचे व्यवहार मंदावले आहेत.

इंचलकरंजीमधील गिरणी कामगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी कामगारमंत्री प्रकाश मेहता, वस्त्रोद्योगमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंत्रालयात तर स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी अमित सैनी, पोलीस अधीक्षक डॉ. मनोजकुमार शर्मा यांनी प्रयत्न केले.

महाराष्ट्रातील या तीन वेगवेगळ्या ठिकाणच्या गिरणी कामगारांच्या संघर्षातील समानता पुढीलप्रमाणे.

गिरणी कामगारांच्या संघर्षातील समानता (Similarities) - मुंबई, सोलापूर आणि इचलकरंजी येथील गिरणी कामगारांचे आर्थिक व सामाजिक शोषण आणि त्या शोषणातून सापेक्ष वंचितता याची झालेली जाणीव, त्या जाणिवेतून संघर्ष यामध्ये साम्य असल्याचे स्पष्ट होते. तसेच या संघर्षाला राजकीय पार्श्वभूमी असल्याचे आढळून येते. त्याचप्रमाणे या आंदोलनांचा प्रमुख परिणाम म्हणजे कामगारांच्या रोजीरोटीचा प्रश्न अर्थात बेकारीचा प्रश्न अधिक महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते. तसेच सोलापूर व इचलकरंजी येथील आंदोलनामुळे कोट्यावधींची उलाढाल ठप्प झाल्याचे दिसून येते. तर येथील आंदोलन हे किमान वेतनाच्या अंमलबजावणीसाठी होत असल्याचे स्पष्ट होते.

गिरणी कामगारांच्या संघर्षातील विषमता (Disimilarities) - मुंबई आणि इचलकरंजी येथील गिरणी कामगारांच्या संघर्षात प्रामुख्याने मुंबईतील गिरणी कामगारांना पोलिसांची सहानुभूती होती, परंतु सोलापूर येथील गिरणी कामगारांवर पोलिसांनी लाठीमार केला ही महत्त्वपूर्ण विषमता येथे दिसून येते. इचलकरंजी व सोलापूर येथील कामगारांचे आंदोलन हे किमान वेतनासाठी आहेत तर मुंबईतील गिरणी कामगारांचे आंदोलन वेतनाबरोबरच सध्याच्या काळात त्यांच्या घराच्या प्रश्नासाठी आहे ही विषमताही येथे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय सत्तेचा परिणाम म्हणून हस्त उद्योगांचा (कापड उद्योग) ऱ्हास झाला त्यामुळे कारागीर व कामगार बेकार झाले, तर आज गिरणी कामगारांच्याआंदोलनाचा परिणाम होऊन गिरणी उद्योग इतरत्र हलविण्यात आल्याने कामगार बेकार झाल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष:**

मुंबई असो वा राज्यातील कोणत्याही भागातील गिरणी कामगार असो त्याचे आर्थिक व पर्यायाने सामाजिक शोषण आजही सुरूच असल्याचा प्रमुख निष्कर्ष या शोधनिबंधातून स्पष्ट होतो.

तसेच राज्यातील मुंबई, सोलापूर आणि इचलकरंजी या तीनही गिरणी कामगारांच्या संघर्षाला राजकीय पाठिंबा अथवा पार्श्वभूमी असल्याचा निष्कर्षसुद्धा दृष्टोत्पत्तीस येतो. त्याचबरोबर कामगारांच्या आंदोलनाचा प्रमुख परिणाम म्हणजेच बेकारी वा कामगारांच्या रोजीरोटीची समस्या हा प्रमुख निष्कर्ष स्पष्ट होतो. गिरणी कामगारांच्या आंदोलनाचा परिणाम म्हणून गिरणी उद्योगामध्ये कोट्यावधी रुपयांची उलाढाल ठप्प झाली असल्याचे व त्याचा परिणाम इतर स्थानिक उद्योगांवरही होत असल्याचे दिसून येते.

**उपाययोजना:**

राज्यातील गिरणी कामगारांच्या समस्येचा आणि त्यांच्या रोजगाराचा प्रश्न गंभीर बनलेला असताना सरकारने गिरणी कामगारांसाठी जो किमान वेतन कायदा लागू केला आहे त्याची प्रभावीपणे अंमलबजाणी होते की नाही यावर सतत कटाक्ष टाकला पाहिजे व दोषी कारखानदारांवर वेळीच योग्य ती कारवाई केली गेली पाहिजे.

गिरणी कामगारांच्या शोषणाच्या विरोधात गिरणी कामगारांच्या संघटना व नेते यांनी कारखाना बंद करून समस्या सुटणार नाहीत हे लक्षात घेऊन

कामगारांच्या हक्कांसाठी दबावगटांची भूमिका पार पाडत असताना कामगारांचे हित जपले पाहिजे.

**सारांश:**

मुंबईतील गिरणी कामगार असो वा राज्यातील कोणताही गिरणी कामगार आजही त्याच्या हक्काच्या मजुरीपासून अलिप्त आहे. त्याचे आर्थिक शोषण होत असल्याने त्याचे सामाजिक शोषणही होत आहे. या परिस्थितीचा परिणाम म्हणून कामगार संघटनांमार्फत आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येतो. परंतु त्याचासुद्धा दुष्परिणाम कामगारांनाच भोगावा लागतो व वेळप्रसंगी रोजगाराला आणि रोजीरोटीला मुकावे लागते. त्यामुळे शोषणाविरुद्ध आंदोलन करताना रोजीरोटीचा प्रश्न गंभीर होणार नाही यासाठी मध्यम मार्गाने हक्कांसाठी लढा देणे सयुक्तिक ठरणार आहे याची सर्वच जबाबदार घटकांनी नोंद घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची:**


1) http:/en.wikipedia.org/wiki/Mumbai _mills
2) http:/en.wikipedia.org/wiki/Great Bombay Textile Strike
3) http://www.mumbai77.com/pages/ mumbai-mills/http:www.epw.in/review-article/cotton-mill-workers-bombay-1875-1918-conditions work
४) दै. *लोकसत्ता,* दिनांक १४ मे २०१५, १० सप्टें.२०१५
५) दै. *महाराष्ट्र टाइम्स,* दिनांक १५ मे २०१५.


---


## मराठी अर्थशास्त्र परिषद

### महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

### अर्थसंवादसाठी अनुदान

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विनंतीला प्रतिसाद देऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडून २०१५-१६ या वर्षात अर्थसंवादसाठी रु.४५,०००/- अनुदान प्राप्त झालेले आहे. त्याबद्दल मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचा ऋणी आहे.

- डॉ. अविनाश निकम,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद

# अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या: आर्थिक व सामाजिक अध्ययन

सुरेश रा. जगताप, अमरावती,
श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२०८३२५९२

भारत हा कृषीप्रधान देश आहे. कृषीप्रधान देशातील शेतकऱ्यांची हलाखीची आर्थिक स्थिती आणि देशात शेतकऱ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्या ही बाब अत्यंत चिंतनीय आहे. महाराष्ट्रात विशेषत: पश्चिम विदर्भात यांचे प्रमाण फारच वाढलेले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही एक फार मोठी सामाजिक समस्या निर्माण झालेली आहे. या समस्येने एवढे उग्र रुप धारण केले आहे की, संपूर्ण जगाने पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची दखल घेतलेली आहे.

जगातील अनेक व्यवसायांपैकी अत्यंत पुरातन व्यवसाय म्हणून शेती व्यवसाय ओळखला जातो. जगातील २/३ लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे तर भारतात ६५ टक्के लोक शेती व शेतीशी संबंधित आधारित व्यवसायात गुंतलेले आहेत. आज बरेच उद्योग हे शेतीतील कच्च्या मालावर निर्भर आहेत. शेतीवरच देशाची प्रगती अवंलबून आहे असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही. अनेक उद्योगाची जननी कृषी ही आहे, तर मग शेतीत राबणारा शेतकरी आत्महत्येचा मार्ग का स्वीकारतो?

भारतामध्ये आर्थिक नियोजनाचे यश हे शेती क्षेत्राच्या विकासावर अवलंबून असल्याचे आतापर्यंतच्या योजनांचा अभ्यास केल्यानंतर लक्षात येते. भारतीय पंचवार्षिक योजनांना अपेक्षित यश प्राप्त न होण्याचे खरे कारण नियोजनाव्दारा शेती क्षेत्राकडे झालेले दुर्लक्ष होय. त्यामुळेच शेती क्षेत्रास आलेले अपयश होय, असे म्हणावे लागेल.

## राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा व वाढती विषमता:

भारतीय अर्थव्यवस्था कृषीवर आधारित आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी एकूण लोकसंख्येपैकी ७७ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. या लोकसंख्येला एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा

५० टक्के हिस्सा प्राप्त होत होता. आता एकूण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. गेल्या ६० वर्षात शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ १२ टक्के घट झाली. परंतु या ६५ टक्के लोकसंख्येला एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ५० टक्यावरून १४ टक्क्यांवर आलेला आहे. आता मिळत असलेला फक्त १४ टक्के हिस्सा म्हणजे गणितीय भाषेत असे म्हणावे लागेल की, शेतीवर अवलंबून असणाऱ्या १ टक्के लोकसंख्येला स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा ०.६५ हिस्सा प्राप्त होत होता, तो आज केवळ ०.२२ टक्केच मिळत आहे. शेती क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांची आर्थिक परिस्थिती तुलनात्मक दृष्ट्या वाईट झाली. म्हणजेच विषमता वाढत गेली आणि अन्य क्षेत्रातील लोकसंख्येपेक्षा प्रतिकुल झाली हा त्याचा साधा व सोपा अर्थ आहे. असे होण्या मागील कारणांचा शोध घेणे हे या अध्ययनाचे मुख्य उद्दीष्ट आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे:**

अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा सामाजिक समस्येचा अभ्यास करण्यासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आलेली आहेत.

१) आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेल्या शेतकऱ्यांच्या कौटुंबिक आर्थिक परिस्थितीची माहिती करून घेणे.

२) शेतीसाठी लागणारा एकूण खर्च (कुटुंबाचे उदरनिर्वाह खर्चासह) व शेतीतून प्राप्त होणारे एकूण उत्पन्न यांचा मेळ कसा घातला जातो याबाबतचा अभ्यास करणे.

३) व्यसन अथवा इतर सवयी यांचा मागोवा घेणे.

४) शासकीय धोरणांचा अथवा योजनांचा ग्रामीण भागात कृषी व्यवस्थेवर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे.

५) कृषी उत्पादनाला येणारा खर्च व त्याला मिळणारा बाजार त्यानंतर तोच माल प्रत्यक्ष ग्राहकाला किती किंमतीत मिळतो याचा सरासरी अभ्यास करणे.

६) शेतीसाठी प्रत्यय पुरवठा करणाऱ्या संस्था, खाजगी स्थानिक व्यक्तींकडून होणारा प्रत्यय पुरवठा, त्याचा व्याजाचा दर व परतफेडीची साधणे याची सांगड कशी साधली जाते याचा अभ्यास करणे.

७) अभ्यासाअंती समस्येवर उपाययोजना सूचविणे हा ह्या संशोधना मागचा उद्देश आहे.

उपरोक्त उद्दिष्टांना अनुसरून अमरावती जिल्ह्यातील चौदा तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांची नमुना पध्दतीने निवड करण्यात आली व नमुन्यादाखल प्रतीनिधित्व देऊन प्रश्नावलीव्दारे माहिती गोळा करण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

**आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष:**

१)आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाची शिक्षणाविषयी माहिती - आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यामध्ये वर्ग १ ते वर्ग १२ पर्यंत शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

२)आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचा वयोगट - वय वर्षे २५ ते ६० या वयोगटातील शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे.

३) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची जात निहाय वर्गवारी - आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये

कुणबी समाजाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

४) शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा प्रकार - विषारी औषधी प्राषण करून आत्महत्या करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

५) शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण - सर्वाधिक आत्महत्या कर्जबाजारीपणा व नंतर नापिकी ह्यापासून झालेल्या आर्थिक विपन्नावस्थेने झालेल्या आहेत.

६) कुटुंबात अवलंबून असणाऱ्यांची सदस्य संख्या- शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा आकार ३ ते ५ एवढाच आहे. परंतु या छोट्या कुटुंबाचे पालन पोषण सुध्दा न करु शकल्याने शेतकरी आत्महत्या करीत आहे.

ज्या व्यवसायातून आपल्या मर्यादित कुटुंबाचे पालन पोषण होत नसेल तर मग असा व्यवसाय कुणासाठी करायचा हा प्रश्न निर्माण होतो.

७) कुटुंबातील सदस्यांचे वय - कुटुंबात १० ते ३० वयोगटातील सदस्य सर्वाधिक असल्याने हे वयोगटातील सदस्य उत्पादनकार्यात भाग घेऊ न शकल्याने त्यांचा भार शेतकऱ्यावर येवून पडल्याने त्यांची जबाबदारी पेलण्यास कुटूंबप्रमुख असमर्थ असणे हे आत्महत्येमागचे कारण आहे हे आर्थिक विवंचनेतून निर्माण होते.

८) कुटुंबातील पाल्यांचे शिक्षण - आत्महत्याग्रस्त कुटूंबप्रमुख वर्ग १० पर्यंतच शिक्षण घेतल्याचे दिसून येते. म्हणजे सरकारच्या मोफत शिक्षणव्यवस्थेचा सुध्दा शेतकरी समाज पुरेसा लाभ न घेतल्याचे दिसून येते. तुलनेत आर्थिक सक्षम असलेला शहरी नागरीक वर्ग या सोई सुविधांचा अधिक लाभ घेतो. तर ग्रामीण माणूस कमी लाभ घेत असल्याने अधिकाधिक गरीब व हलाखीचे जीवन जगत आहे.

९) मागील पाच वर्षात मुलामुलींचे शिक्षण,विवाह प्रसंग इ. खर्चासाठी काढलेले कर्ज- शेतकरी हे कौटुंबिक कार्यक्रम अथवा शिक्षणासाठी कर्जबाजारी न होता ते शेती मशागतीसाठी व शेतीतून उत्पादन काढण्यासाठी लागणाऱ्या खर्चामुळे जास्त कर्जबाजारी होतात व अशा शेतकऱ्यांना शेतीत गुंतविलेल्या पैश्याच्या तुलनेत अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने शेतकरी हा दिवसेंदिवस अधिक कर्जबाजारी होऊन आत्महत्येचा मार्ग स्वीकारत असल्याचे अभ्यासाअंती दिसून आले.

१०) जमिनीचा आकार - आत्महत्याग्रस्त कुटूंब संख्येपैकी २ ते ५ एकर पर्यंत शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४६ टक्के आहे ५ ते १० एकर पर्यंत शेती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २१ टक्के म्हणजे कमी आहे.

११) आत्महत्याग्रस्त कुटुंबांकडे पाळीव जनावरांची संख्या - ५०% शेतकऱ्यांकडे कोणतेही पाळीव जनावरे नाहीत. जनावरांना लागणारा चारापाणी व त्यांची देखभाल करणारा मजूर याचा खर्च जास्त लागत असल्याने शेतकऱ्यांनी जनावरे विक्रीस काढली. शेतकऱ्यांनी उपयुक्त जनावरे पाळली तर यापासून जनावरांची संख्या वाढेल. पाळीव जनावरे विकून आर्थिक प्राप्ती होईल. शेतीसाठी शेणखत मिळेल व रासायनिक खतांचा वापर कमी होईल आणि शेतीचा पोत कायम राखण्यास मदत होईल. त्यापासून दुध-दुभत्यापासुन सातत्याने आर्थिक प्राप्ती होत राहील. इत्यादी फायदे असल्याने पाळीव जनावरांचे व्यवसायात वाढ होणे गरजेचे आहे.

१२) आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाना विचारलेले

सामान्य प्रश्न - ७२ टक्के शेतकरी कुटूंबाला प्राप्त उत्पादनातून जीवननिर्वाह खर्च भागत नाही. पर्यायाने कर्ज काढावे लागते. कर्ज थकीत राहत असल्याने शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

१३) उत्पादित शेत माल - अल्पभूधारक शेतकऱ्यांजवळ अन्नधान्य स्वत:चे कुटुंबाला वर्षभर पुरेल एवढेच उत्पन्न होते. त्याला जास्तीचे विक्रीसाठी पीक उत्पादन होत नसल्याने तो जमिनीवर करावे लागणारे इतर खर्च कसे करणार हा गंभीर प्रश्न त्याचे समोर असतो.

१४) आर्थिक अडचणी निर्माण होण्याची कारणे - उत्पादन खर्चावर आधारित कृषीमालाला भाव मिळत नाही. उत्पन्नापेक्षा खर्च जास्त ह्या कारणानेच मुख्यत्वे करून आर्थिक अडचण निर्माण होते. परंतु आजारपण, कौटुंबिक कार्यक्रम, धार्मिक रुढी- परंपरा या कारणांनी सुध्दा आर्थिक अडचणी निर्माण होतात.

१५) मागील ५ वर्षात कर्ज काढणारी कुटुंबे - शेती व्यवसायाचा प्रचार व प्रसार बऱ्याच प्रमाणात झालेला असून सुध्दा शेतकऱ्यांचे सावकारांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण ३६ टक्के एवढे आढळून आले आहे. तर बँकाकडून कर्ज घेण्याचे प्रमाण ५४ टक्के एवढे आहे. खाजगी सावकारांकडून कर्ज घेण्यास पाबंदी घातल्यानंतर सुध्दा ३६ टक्के शेतकरी अजुनही सावकाराकडून कर्ज घेतात ही बाब सार्वजनिक बँकांच्या दृष्टीने फारशी चांगली नाही. ह्या बँका सामान्य शेतकऱ्यांना कर्ज देण्यात कमी पडतात. बँका त्याच त्या जुन्या व सक्षम शेतकऱ्यांना कर्ज देतांना दिसून येतात. नवीन, गरीब व सिमांत शेतकऱ्यांना ह्या बँका कर्ज देण्यास फारसा पुढाकार घेतांना दिसून येत नाही.

**शेतीव्यवसायाबाबत असलेली संदीग्धता व उपाय योजना:**

शासकिय धोरणे शेतीपुरक असावी -

कृषी खात्याशी संबंधीत शासनाकडून अनेक धोरणे व योजना राबविली जातात. यात राजकीय स्तरावर वेळोवेळी राजकीय सोयीनुसार बदल घडवून आणले जातात. जे शेतकऱ्यांना लाभदायक नसतात. उदा. महाराष्ट्र राज्याची कापूस एकाधिकार योजना शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक योजना होती. परंतु कालांतरणाने या योजनेत शासकीय हस्तक्षेप व भ्रष्टाचारामुळे ही योजना बंद पडली. शेतकऱ्यांना दिली जाणारी मदत ही परिस्थितीपेक्षा राजकीय प्रेरीत असते. जर शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधायची आहे तर ती केवळ परिस्थिती सापेक्ष असली पाहिजे. शेतीला होणारा दीर्घकालीन कर्ज पुरवठा हा मागील २० ते २५ वर्षापूर्वी १२ ते १८ टक्के व्याज दराने करण्यात आला होता. त्यामुळे शेतकरी अत्यंत कर्जबाजारी झाले. हा वित्तीय पुरवठा करताना कृषी एक राष्ट्रीय उद्योग समजण्यात यावा व त्यासाठी दिर्घमुदतीचे गुंतवणुकीसाठी अत्यल्प भूधारकाकरीता रुपये २ लाख, अल्प भूधारककाकरीता रुपये ३ लाख व त्यापेक्षा जास्त शेती असल्यास प्रती ५ एकर मागे ३ लाख रुपये अत्यल्प व्याज दराने दीर्घमुदती कर्ज पुरवठा बँकांमार्फत करण्यात यावा.

राज्यात राबविली जाणारी रोजगार हमी योजना केवळ शेती मधील कामासाठी शासकिय खर्चाने राबवावी. जेणे करुन कृषीचा स्तर/ पोत सुधारण्यास मदत होईल व शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होईल. ही योजना शेतीशिवाय इतरत्र राबविल्यामुळे शेतीला शेतमजूर मिळणे कठीण

झाले आहे.

शासनामार्फत अत्यल्प किंमतीत धान्य व आर्थिक मदत अनेक कुटुंबांना दिल्या जात आहे. या मदतीतुन त्यांचे जीवनमान व आरोग्याचा दर्जा सुधारावा  हा यामागचा शासनाचा मुख्य हेतु आहे. परंतु या योजनेचा विपरित परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या या मदतीमुळे शेतमजुरांची आळशी वृत्ती वाढली व काम न करताच जिवन जगणे व फुकटचे घेत राहणे हा स्वभाव गुण मजुरांचा झाल्याचे दिसते. शासनाच्या अशा धोरणामुळे ग्रामीण भागातील शेत मजुरांची अन्न व पैसा ही समस्या घर बसल्या दुर झाल्याने शेतावर काम करणारा मजुरांचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतमजुरांची मजुरी तीन ते चार पटीने वाढली व तुलनेत शेतमालाचे किंमतीत वाढ न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे.

१)सिंचनाच्या सोयीत वाढ करणे:

अमरावती जिल्ह्यातील सिंचन क्षमता जेमतेम बारा ते तेरा टक्के एवढीच असल्याने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सिंचन अनुशेष निर्माण झालेला आहे. जिल्ह्यात उर्ध्व वर्धा, अप्पर वर्धा मधून ६२ ते ७० हजार हेक्टर, चार मध्यम प्रकल्पातून ३०-३५ हजार हेक्टर तर लहान योजनाव्दारे ४२ हजार हेक्टर इतके सिंचन क्षेत्र प्रस्तावित आहे. परंतु जिल्ह्यातील राखीव वनक्षेत्र, खारपानपट्टा, मेळघाटातील प्रचंड चढ-उतारक्षेत्र व सिंचनासाठी पर्याप्त निधीचा अभाव, शासनाचे उदासीन धोरण इत्यादी बाबी बाजुला सारुन भौगोलीक क्षेत्र लक्षात घेऊन सिंचन क्षेत्रात शक्य तीथे योजना आखुन प्रथम प्राधान्याने अमलात आणणे गरजेचे आहे.

२)शेतमालाला योग्य किंमत:

उत्पादित प्रत्येक शेतमालाला त्याच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव देण्याची व्यवस्था शेतमाल विक्रय प्रक्रियेव्दारे राबविणे गरजेचे आहे. तेव्हा शेतकरी शाश्वत उत्पादन क्षमतेचा वापर करुन उत्पादनात वाढ करेल व यातूनच शेतकऱ्याचे प्रत्यक्ष उत्पन्न सुध्दा वाढेल म्हणून शाश्वत किंमत व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे.

३) शासकीय कामात गतीशिलता निर्माण करणे.

तालुका दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हाधिकारी विभागीय आयुक्त इ. कार्यालयात शेतकऱ्यांच्या शेतीविषयक वादांकीत असंख्य प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतात. तारखावर तारखा चालतात. कौटुंबिक वारसांचे वाद हिस्से वाटणीचे वाद वर्षानुवर्षे चालतात. ह्या दाखल तक्रारी एक निश्चित कालमर्यादेत निकाली लागतील, यादृष्टीने शासनस्तरावर ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

४)गोडाऊन व बाजारपेठेतील सुधारणा:

शेतमाल शेतात उत्पादित होऊन शेतकऱ्यांच्या घरी येई पर्यंत शेतमालाचे भाव दरवर्षी पडतात. शेतकऱ्यांना मोठ्याकष्टाने उत्पादित शेतमाल कमी भावाने विकावा लागतो. माल विकल्यानंतर ३-४ महिन्यानंतर त्याच मालाच्या भावात तेजी येते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची साठवणूक करण्यासाठी गोडावून, वेअर हाऊसची गरज पडते. म्हणायला शेतमाल तारण योजना आहे. परंतु तारण योजनेत आणखी सुधारणा करून प्रत्येक तालुकास्तरापर्यंत व तालुक्यातुन गावापर्यंत व गावातून शेतकऱ्याच्या दारापर्यंत ती बाराही महिने

कार्यक्षमतेने व पुरेशा पैशाची तरतुद करून राबविता आली पाहिजे.

५) उत्कृष्ट बि-बियाणे, खते व किटकनाशकांचा पुरवठा:

अनेक बियाणे कंपन्यांचे नमुने बियाणे, खते, किटक नाशके निकृष्ट व बोगस आढळतात. परंतु अशा शेतकऱ्यांना फसविणाऱ्या कंपन्यांवर शासनाकडून कोणतीच कारवाई केल्या जात नाही. ऐन कामाच्या हंगामात नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठविणे व त्याचा अहवाल येण्यास अनेक महिने लागणे, तोपर्यंत कृषी हंगाम संपुन जाते. निकृष्ट अहवाल आल्यानंतर कारवाईस टाळाटाळ करणे, विलंब लावणे याबाबत शासनाने कारवाईसाठी निश्चित काल मर्यादेचे धोरण ठरविणे आवश्यक आहे.

६)शेतीसुधार व पांदण रस्ते निर्माण करणे:

अनेक गावांमध्ये दूरवर शेती पसरलेली आहे. नदी, नाले व बांध यामुळे शेती करणे कठीण जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचे पर्यायाने राष्ट्राचे उत्पादनात घट होते. म्हणून प्रत्येक दोन शेतामिळून एक रस्ता, पांदण रस्ते, गावशिवार रस्ते व बांध बंधिस्त करणे हा धडाक्याचा कार्यक्रम रोजगार हमी योजनेमार्फत राबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे पडीत जमीन कृषीयोग्य होईल,जमिनीतील सुधारणा घडून येईल व शेती करण्याचा उत्साह शेतकऱ्यांमध्ये वाढेल.

७)सामाजिक उपाय योजना-

१)भ्रामक व अनिष्ठ चालरिती जसा हूंडा पद्धती, कर्जकाढून थाटामाटात मुलींचा विवाह पारपाडणे. ह्याला आळा घातला पाहिजे. २)पिक हवामान परिस्थितीनुसार पिकांचे नियोजन करून शेतकरी मेळावे व कार्यशाळा व प्रात्यक्षिकांचा लाभ घेणे. ३)कृषी चिकित्सालयाचे मोबाईल व्हॅनकडून मार्गदर्शन घेऊन नव्या उमेदीने शेतावर राबणे. ४)दूरदर्शनवरील शेती विषयक कार्यक्रमांचा लाभ घेणे त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करणे.

८) शेतीमध्ये होणारी गुंतवणूक:

कृषी क्षेत्रात कमी गुंतवणूक होत आहे. असे देशाचे तत्कालीन कृषीमंत्री शरद पवार यांनी कबूल केले. कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीचा आलेख मागील अनेक वर्षापासून भारतात दिसत आहे. वाढती लोकसंख्या आणि लागवडी खालील शेतजमीन तसेच शेती व्यवसायात गुंतलेल्या संख्येचे गुणोत्तर व्यस्त होत चालले आहे. देशातील ४० टक्के शेतकरी हा व्यवसाय सोडण्याच्या मनस्थितीत असल्याचे दिसून आले. विदर्भातील केवळ १५ ते १८ टक्के जमिन सिंचनाखाली आहे. ८२ ते ८५% शेती कोरडवाहू आहे. ती ओलीताखाली आणण्यासाठी गुंतवणूक आवश्यक आहे. संपूर्ण विदर्भात अल्पभूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. २-३ एकर शेतीच्या बळावर कुटुंबाचे पालन-पोषण सोपे नाही. अनेकदा शेतीसाठी कर्ज, आजारपण, विवाह, पाल्यांचे शिक्षण या सारख्या कौटुंबिक गरजा पूर्ण करण्यासाठी परत करावे लागाते. त्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे.

९) सिंचनाच्या सोयी व चोविस तास विद्युत पुरवठा गरजेचा-

शेतीच्या विकासात सिंचन सोयी आणि स्वस्त विजपुरवठा यांचे महत्व सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे हे ध्येय भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांचे होते. त्या दृष्टीने लहान

प्रकल्प विहिरी बांधणे, तलाव दुरुस्ती व लहान नद्या नाल्यांवर लघुसिंचन प्रकल्प उभारणे, ट्युबवेल निर्मिती करणे इत्यादींचा समावेश होता. अमरावती सारख्या कमी पाण्याच्या भौगोलिक जिल्ह्यामध्ये गाव तेथे तलाव व नदी नाला तेथे धरण- तलाव जिथे- जिथे शक्य असेल तिथे- तिथे शासकीय नियमाचा अडथळा दुर सारून व पुरेपुर निधीचा पुरवठा करुन राज्य सरकारने योजना कालबध्द पद्धतीत पुर्ण करणे गरजेचे आहे. तसेच कृषीसाठी चोविसतास विद्यूत उपलब्ध करुन देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. परंतु या बाबी दूर्लक्षिल्या जात आहे. यातून शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोर जावे लागते. रात्रीचे ओलीत करावे लागते. त्यातुन जीविताला हानी होत आहे. पाणी व विद्युत गाव तथा शेतीच्या आजु-बाजू परिसरात उपलब्ध करुन दिल्यास शेतकऱ्यांना शेती करण्याविषयी उत्साह निर्माण होईल व आपोआपच कालवे, बंधारे, विहीरी, ट्युबविहीरी, तुषार सिंचन, ठिंबक सिंचन इत्यादीव्दारे शेतकरी पाण्याचा शेतीसाठी वापर करतील, ही व्यवस्था निर्माण झाल्यास शेतीमध्ये गुंतवणूक होईल, रोजगार निर्मिती होईल व शेतकऱ्याचे उत्पन्नात निश्चीतच वाढ होईल.

१०)सामान्य उपाय योजना:

शुध्द व पायाभूत बी - बियाण्याचा वापर करणे.
पिकांची फेरपालट करणे.
पिके घेतांना मिश्र पिके घेणे.
पिकांचा लागवड खर्च कमी करणे.
जागच्या जागी मृदू व जलसंधारण करणे.
शेणखताचा वापर जास्त करून जमिनीची पोत सुधारणे.
सेंद्रीय शेती पद्धतीचा अवलंब करणे.
घरच्याघरी सरळ बियाणे तयार करणे.
एकात्मिक कीड नियंत्रण पद्धतीचा अवलंब करणे.
केवळ परंपरागत शेतीवरच अवलंबून न राहता कोरडवाहू फळ पिके जसे आंबा, डाळींब, बोर, आवळा, सीताफळ, खजूर इ. पिकांची लागवड करणे.
फळ व फळे प्रक्रिया उद्योग उभारणे.
शेळ्या मेंढ्या पालन.
मसाला, हळद, पापड तयार करणे.
फळांचा रस थंड पेये तयार करून विक्री करणे.
दुधदुभते, किराणा दुकान सारखे पुरक व्यवसाय करणे.
शेती विस्तार व विकासा करिता खरीप, रब्बी, पिक हंगामात बिजोत्पादन कार्यक्रम राबविणे.
मधमाशीपालन.

## जागतिकीकरणाच्या विळख्यात कृषीव्यवसाय व सरकार:

जागतिक भांडवलशाहीच्या मदतीने आपल्या देशाच्या प्रगतीचे स्वप्न पाहणारे राज्यकर्ते आणि नवश्रीमंत आज शेतकऱ्यांना उद्धवस्त करून देशाची संपूर्ण शेती उत्पादन व्यवस्थाच उधळायला निघाले आहे. मोटारगाडी साठी ६ ते ८ टक्के व्याजदराने मिळणारे कर्ज शेतीसाठी १२ ते १६ टक्के नी मिळत असल्यामुळे गरीब व अल्पभूधारक शेतकरी टिकाव धरू शकत नाही. त्याला संरक्षण देण्याचे सोडून सरकार अमेरिकेच्या स्वस्त कापसाची आयात करते. त्यामुळे शेती व्यवस्थेचे कंबरडे मोडण्याचे काम सुध्दा सरकारी निती व्दारे होत आहे.

संदर्भ सूची:

१)जहागिरदार दि.व्यं., कदम धीरज, *शेतकऱ्यांच्या आत्महत्या : संदर्भ यवतमाळ जिल्हा,* २००८.

२) तायडे पुष्पा, *विदर्भातील साखर उद्योगाचे अर्थशास्त्र*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

३) ढमढेरे एस.व्ही., *महाराष्ट्रातील जलसंपदा* २००७.

४) ढाले रविंद्र, *डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक आर्थिक विचार*, २००९.

५) देसाई, भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था.*

६) संजय फुले, *रेशीम शेती*, सकाळ प्रकाशन-पुणे-२.

७)Farmer suicide, *Meeta and Rajiv Lochan*, Yashvantrao Chavhan Academy of Development Administration.

**विविध अहवाल:**

१)*Suicide of farmer in Maharashtra* - Indira Gandhi Institute of Development Research Mumbai 2006. submitted to the Govt. of Maharashtra - Srijit Mishra.

२) डॉ. स्वामीनाथ समितीचा अहवाल.

३)संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार कार्यसेवा विभागाने केलेला सर्वेक्षण अहवाल.

४)शेतकरी आत्महत्या आणि कृषीक्षेत्रापुढील आव्हाने, कर्जमाफी आणि समग्र महाराष्ट्र समतोल - डॉ. नरेंद्र जाधव यांच्या एक सदस्यीय समितीचा अहवाल, २००८

५)Casses of farmer suicides in Maharashtra : By Tata Institute of Social Sciences Tuljapur, Dist. Usmanabad.

६)Farmers suicide in Maharashtra on over view Dr. S.K. Goyal (Maharashtra Govt.)

**मासिके:**

१)योजना मे, २००८.

२)*Economic & Political Weekly*, Dec. 25, 2004 by B.B. Mohanty, Sangeeta Shroff.

**वर्तमानपत्रे:**

१) दै. लोकमत, दि. ७ जून २००४, ७ जुलै २००७, २६ एप्रिल २००८, १४ नोव्हें. २००९.

२)लोकसत्ता, दि. ११ मे २००९.

३)हितवाद, दि. १ जुलै २००७.

४)दै. सकाळ, दि. १५ नोव्हे. २००१

५)दै. देशोन्नती, दि. १९ डिसें. २००६, २१ फेब्रु. २००९, १२ सप्टेंबर २००७, १५ नोव्हे. २००७, २१ फेब्रुवारी २००९.

६)दै. हिन्दूस्थान, दि. ४/११/२००८, दि. ९ डिसें. २००८.

७)जनमाध्यम, दि. ९ डिसें. २००८.

८)उपाशी शेतकरी, दि. २५ मार्च २००८, १० जाने २००९.

९)Hitawada, १ जुलै २००७.

# विश्वासाचे विज्ञान आणि विकास

रसूल गफूर कोरबू, कोल्हापूर,
डी. डी. शिंदे सरकार कॉलेज.
भ्रमणध्वनी: ९४२३८६०२८३

साधारणपणे विश्वास म्हणजे एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीवर अथवा घटकावर विवेकी श्रद्धा असणे होय. जगामध्ये सर्वत्र विश्वासावर आर्थिक विकास आधारलेला दिसून येतो. नेतृत्त्व करण्यासाठीसुद्धा विश्वास संपादन करणे अत्यावश्यक असते. दुसऱ्याच्या मनामध्ये विश्वास निर्माण करणे हा महत्त्वाचा गुण नेतृत्त्व करणाऱ्यांच्या जवळ असावा लागतो. नुसता करीश्मा असून चालत नाही, माणसाप्रमाणे प्राणिजगतामध्येसुद्धा शक्तीबरोबर सहकार्य व विश्वासाची गरज भासत असल्याचे दिसून येते. एखादी व्यक्ती अनोळखी व्यक्तीबरोबर सहकार्य किंवा व्यवहार करते. त्याचे मूळ कारण म्हणजे विश्वास होय. साधारणपणे कुटुंबापासून अर्थव्यवस्थेपर्यंत तसेच सर्व संस्थात्मक पातळीवरील कामकाज, व्यवहार हे विश्वास या गोष्टीमुळे शक्य होतात. त्याचप्रमाणे हे सुद्धा सत्य आहे की, विश्वास ठेवल्यामुळे विश्वासघात होऊ शकतो; पण त्याचे प्रमाण १०% ते १५% इतके असते. थोडक्यात याचा भावार्थ असा की, विश्वास दिल्याने विश्वास वाढतो आणि एकदा दिले की त्याची परतफेड होतच असते. याठिकाणी एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, विश्वासाचे तंत्र जाणीवपूर्वक वापरल्यास लोकसंग्रह वाढू शकतो आणि या लोकसंग्रहातून नेतृत्त्व उदयास येऊ शकते. याच विश्वासाबद्दल पॉल झॅक व इतर तज्ज्ञ मंडळींनी यशस्वीपणे मांडणी केली. त्यांच्यामते निसर्गतः विश्वास ही एक जैवरासायनिक प्रक्रिया आहे. ती म्हणजे ऑक्सिटोसिन ज्यामुळे विश्वास निर्माण होतो; पण त्याची उत्पत्ती मेंदूमध्ये होते. म्हणजे मेंदूद्वारे अंतस्राव होणाऱ्या शरीरातील रसायनास ऑक्सिटोसिन असे म्हटले जाते. आपत्ती संभवासाठी होणारे मिलन व आपत्यजन्म येथूनच परस्परावरील विश्वासाची सुरुवात होत असते आणि मग ती विस्तारत जाते.

**चेता अर्थशास्त्र:**

सामान्यपणे अर्थशास्त्रात निर्णयप्रक्रिया ही व्यक्तीच्या आवडी-निवडीवरून ठरते. तसेच ती वस्तू किंवा सेवा यांच्यावर असणारा विश्वास यावरसुद्धा अवलंबून असते. सन १९९४ मध्ये विश्वास या संकल्पनेचा जगातील ४२ देशांमध्ये सर्वेक्षण करण्यात आले. त्या सर्वेक्षणावरून पॉल झॅक यांनी विश्वासाची भावना समजावून घेण्यासाठी मज्जासंस्था आणि अर्थशास्त्र यांच्यातील परस्पर संबंधावर काम सुरू केले. या दोहोतील संबंध म्हणजे न्यूरोकोनॉमिक्स (चेता अर्थशास्त्र) म्हणून ओळखले जाते. न्यूरोइकॉनॉमिक्सची व्याख्या पुढीलप्रमाणे मांडण्यात आली.

Neuroecoonomics studies measure brain activity decision making in order to predict the behavious of consumer.

चेता अर्थशास्त्र : चेता अर्थशास्त्राच्या अभ्यासामध्ये उपभोक्ता निर्णय घेताना व होत असलेले वर्तनाचे अंदाज विषद करण्यासाठी मेंदूतील कार्यशैलीचे केलेले मापन होय.

(चेता अर्थशास्त्र) न्यूरोइकोनॉमिक्सवर काम करणाऱ्या प्राध्यापकांची अशी धारणा आहे की, ज्या देशामध्ये परस्परांवरील विश्वासाची भावना उत्कट, बळकट असते. अशा देशांमध्ये आर्थिक समृद्धी लवकर साध्य करता येते. एखाद्या देशाची मोठ्यात मोठी गुंतवणूक ही त्या देशातील अर्थधोरणावर असणाऱ्या विश्वासावर अवलंबून असते. ज्या ठिकाणी करार पाळले जात नाहीत, कोर्टातून दाद मागण्यास फार वेळ लागतो, त्या देशामध्ये आर्थिक प्रगती मंदावते. जागतिक बँकेच्या मतानुसार भारतात गुंतवणुकीसाठी कमी प्राधान्य असण्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील अविश्वसनीय आर्थिक धोरण होय. येथे आर्थिक समृद्धीसाठी विश्वास आवश्यक आहे, हे सिद्ध झाल्यानंतर विश्वासाची प्रक्रिया कशी असते, ते तपासून पाहण्यास झॅक यांनी सुरुवात केली. याठिकाणी मागे उल्लेख केल्याप्रमाणे ऑक्सिटोसिनचे शरीरातील प्रमाण व विश्वास देणे-घेणे यांचा थेट संबंध असल्याचा वेगवेगळ्या प्रयोगातून दिसून येते. आता आपण विश्वाचा खेळ, विश्वासातून आर्थिक विकास, शासनाचे धोरण आणि विश्वास या गोष्टीचा संबंध पाहू.

**विश्वाचा खेळ** (Trust Game):

झॅक यांनी आपल्या ट्रस्ट गेम च्या प्रयोगाद्वारे न्यूरोझकोनॉमिकची व्याप्ती मांडण्याचा छोटासा प्रयत्न केल्याचे दिसून येते. ट्रस्ट गेममध्ये काही स्वयंसेवकांच्या जोड्या असतात आणि त्यांना आपल्या जोडीदाराबद्दल माहिती नसते. समजा प्रत्येक स्वयंसेवकास रु. १००/- देण्यात आले आणि त्यांचे अ व ब असे गट निर्माण करण्यात आले. प्रथमतः अ गटास दोन पर्याय देण्यात आले. १) त्यांनी दिलेली पूर्ण रक्कम स्वतः जवळ ठेवायची अथवा २) अनोळखी ब गटातील जोडीदारास पूर्ण किंवा काही रक्कम द्यावयाची; पण येथे एक माहिती अशी देण्यात आली, की अ गटातील स्वयंसेवक ब गटातील जोडीदार किती रक्कम देतील त्याच्या तिप्पट रक्कम ब गटातील स्वयंसेवकास मिळेल. म्हणजेच अ गटाने ब गटास विश्वासाने संपूर्ण किंवा अंशतः रक्कम द्यायची; पण परतफेडीची अपेक्षा न करता.

समजा अ गटातील व्यक्तीने रु. १०० पैकी

रु.८० ब गटातील जोडीदारास दिले. येथे ब गटातील व्यक्तीस रु.८० च्या तिप्पट म्हणजे रु.२४० मिळतील. ही रक्कम ब गटातील जोडीदार स्वतःजवळ ठेवू शकतो किंवा त्यातील पूर्ण किंवा काही रक्कम अ गटातील जोडीदारास परत देऊ शकतो. अ गटाला जशी अजिबात पैसे न देण्याची मुभा होती तशीच मुभा ब गटातील व्यक्तींनासुद्धा देण्यात आली. हे खरे आहे की, अनोळखी व्यक्तीसाठी स्वतःचा पैसा किंवा वेळ खर्च करणे अत्यंत कठीण काम आहे आणि हा खेळ नेमका हेच करावयास सांगतो. एकतर रु.१०० स्वतःजवळ ठेवा किंवा दुसऱ्याला द्या. त्याच्याकडून परताव्याची अपेक्षा न करता... या ठिकाणी एक श्लोक आठवतो, *कर्मण्येवाधिकारस्ते माफलेषु कदाचन.*

वरील प्रकारचे प्रायोगिक अर्थशास्त्रामध्ये विश्वासाचा खेळ यामध्ये झॅक यांना पुढीलप्रमाणे तथ्ये आढळून आली.

१. अ गटातील जवळजवळ ८५% लोकांनी ब गटातील लोकांच्यावर विश्वास टाकला अन् अनोळखी माणसाला पैसे दिले.
२. या विश्वासार्ह कृतीस ब गटातील ९८ टक्के लोकांनी प्रतिसाद दिला.
३. या प्रयोगाच्या दरम्यान ऑक्सिटोसिन रक्तातील प्रमाण आणि विश्वास यांचा सहसंबंध असल्याचे आढळून आले.
४. अ गटातील ट्रस्ट सिग्नल मिळाल्यानंतर ब गटातील जोडीदाराच्या रक्तातील ऑक्सिटोसिनचे प्रमाण वाढल्याचे दिसून आले. तसेच ब गटाच्या परतफेडीमुळे अ गटाच्या व्यक्तीच्या रक्तातील ऑक्सिटोसिन वाढल्याचे दिसून आले.
५. जेव्हा बाह्यतंत्राने ऑक्सिटोसिन देण्यात आले, तेव्हा अ गटाकडून ब गटास पैसे देण्याचे प्रमाण १७ टक्क्यांनी वाढले. त्याचप्रमाणे सर्व रु.१०० देणारे अ गटामधील लोकांची संख्या दुपटीने वाढली.
६. अ व ब गटातील ५ टक्केस्वयंसेवक कृपण अर्थात कंजूष होते. त्यांच्यामध्ये ऑक्सिटोसिन प्रक्रिया बंद पडलेली दिसून आली; पण हेच लोक दुसऱ्याच्या मनात तशी भावना निर्माण करण्यात यशस्वी ठरले व मिळालेला फायदा स्वतःकडे ठेवला.

एकंदरीत वरील मुद्यावरून असे दिसून आले की, ज्या लोकांचा विश्वासघात झाला त्यांच्या शरीरामधील ऑक्सिटोसिनच्या जागी टेस्टोस्टरॉनचे प्रमाण वाढलेले दिसून आले होते. टेस्टोस्टेरॉन हे अंतस्राव, आक्रमकता, मारामारी यांसाठी उपयोगी ठरते. स्पर्धेसाठी तर फारच उपयुक्त असते. आजच्या स्पर्धात्मक जगामध्ये टेस्टोस्चेरॉनचे प्रमाण वाढत आहे आणि याउलट ऑक्सिटोसिनचे प्रमाण घटत चालले आहे. याचा परिणाम असा की समाजमन दुभंगलेले दिसून येते. खरे तर स्पर्धेतील यश हे क्षणभंगूर असते; पण विश्वासातील यश मात्र टिकाऊ असते. परस्पर विश्वास निर्माण करणे ही काळाची गरज आहे. परस्पर विश्वासाचे संदेश देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मोकळेपणाने आलिंगन देणे. मुन्नाभाईच्या प्यार की झप्पी या ट्रस्ट सिग्नलचा डॉ. झॅक हा जोरदार समर्थक आहे.

ज्या समाजात परस्परांना मैत्रीपूर्ण दृढ अलिंगन देण्याची प्रथा आहे तेथे एकोप्याची भावना तीव्र स्वरूपाची दिसून येते. कदाचित भारतात स्पृश्य-अस्पृश्य विचार रुजलेला व दृढ

झाला असल्यामुळे भारतीय समाज अन्य समाजाप्रमाणे एकसंघ झालेला दिसून येत नाही; पण वारकरी संप्रदायात हा विचार दिसून येतो. जसे की प्रथम भेटी-अलिंगन मग वंदावे चरण ही विठ्ठलाला भेटण्याची वारकरी परंपरा विश्वास निर्माण करते, कारण हा समाज विठ्ठलास सखा मानतो आणि सखा विश्वासास पात्र ठरतो.

**बदलते सर्वसाधारण समतोल प्रारूप:**

*Zak and Knack (2001)* यांनी बदलते सर्वसाधारण समतोल प्रारूप *Dynamic General equilibrium* विकसित केले; पण याचा आधार मात्र *Hamilton's Rule* हा आहे. जो जीवशास्त्रीय उत्क्रांतीशी निगडीत आहे. येथे हॅमिल्टनचा नियम असे प्रतिपादन करतो की एका व्यक्तीची दुसऱ्या व्यक्तीच्या कल्याणाबाबतची अपेक्षित काळजी यांचा सहसंबंध, गुणसूत्र सहभागाच्या प्रमाणाशी असतो. या नियमाचा विस्तारित भाग असा आहे की व्यवहारामधील बदलाचे परिणाम हे एखाद्या व्यवहार करणाऱ्या भागीदाराचा विश्वासूपणा हा असमान विस्तृत माहिती आणि कराराच्या अंमलबजावणीच्या खर्चाशी निगडीत असतो. याचप्रमाणे *Zak and Knack (2001)* यांच्या मतानुसार एखाद्या देशातील सर्वसाधारण विश्वासाची तीव्रता अथवा बदल हा व्यवहार खर्च आणि गुंतवणूक कराराच्या अंमलबजावणीच्या विरुद्ध दिसून येतो. या प्रारूपाच्या समर्थनात त्यांनी विश्वास ही संकल्पना खालील गोष्टीवर अंवलबून आहे, असे निर्देशनास आणून दिले.

१. सामाजिक व्यवस्था आणि नीतीमत्ता : सामाजिक व्यवस्था आणि नीतीमत्ता ही समाजात नियम म्हणून जर का त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असेल तर विश्वास वाढीस लागतो. उदा. नॉर्वे या देशामध्ये नीतिमत्ता किंवा नीतिशास्त्र समाजातील नियम बनलेले आहेत. त्यामुळे तेथे विश्वास-प्रामाणिकपणा जास्त आहे.

२. कायदा व्यवस्था/वातावरण : साधारणपणे कायदा व्यवस्था/वातावरण म्हणजे करारनिवारक संस्था. कायदा व्यवस्था आणि वातावरण/ करनिवारक संस्था तटस्थपणे कार्य करीत असतील तर विश्वास प्रक्रिया वाढीस लागते. उदाहरण द्यायचे झाल्यास सन १९-०९-१९९१ ते १९९९ पर्यंत विधीव्रत नियुक्त केलेल्या प्राध्यापकांना नेट/सेटमधून सूट देण्याचा निर्णय जर का *U.G.C.* ने घेतला, तर तिची अंमलबजावणी करण्यात येईल असे महाराष्ट्र सरकारने प्राध्यापक महासंघाला तोंडी आश्वासन दिले. तसेच लेखी करारसुद्धा करण्यात आले; परंतु त्यांचे पालन करण्याऐवजी ही करार निवारक किंवा पालन करणारी संस्था मनमानी करू लागली. तेव्हा गोंधळ निर्माण झाला आणि उच्च शिक्षणक्षेत्रातील काही प्राध्यापकांमध्ये रोष निर्माण झाला. अत्याचार, दहशतवाद, नक्षलवाद अशाप्रकारचे प्रश्न निर्माण होऊन वाढण्याचे कारण म्हणजे येथे सरकारच्या यंत्रणेवर विश्वास पूर्णपणे कमी झालेला दिसून येतो.

३. आर्थिक व्यवस्था : उत्पन्नामधील विषमता व किमती असमतोल असतील, तर विश्वास ढासळतो. उदा. उत्पन्न वाढल्यानंतर लोकांची विश्वासदर्शक वर्तणूक वाढीस लागते, कारण त्यांना आपल्याबरोबर व्यवहार करण्यासाठी जोडीदार शोधायला भरपूर वेळ मिळतो. तसेच फसवणुकीचे प्रकार कमी होतात; पण त्याउलट उत्पन्न विषमतावाढीमुळे व्यवहार करणाऱ्या

जोडीदारामध्ये गैरविश्वास वाढीस लागतो आणि फसवणूक, ठकगिरीचे प्रकार वाढलेले दिसून येतात. याचा अर्थ असा की, सगळ्याच गोष्टी मोठ्या लागल्या मोठ्या प्रमाणात वाढल्यास विश्वास वाढून विकास होतो; पण जर का विषमता असेल, तर गैरविश्वास वाढीस लागतो.

५. विश्वास आणि आर्थिक विकास:

सन १९९४ मध्ये ४२ देशांमधील विश्वासूपणाचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणातून *Zak and Knack* यांनी तयार केलेल्या समतोल प्रारूपाचा वापर केल्यानंतर खालील निष्कर्ष दिसून आले.

१. काही देशातील समाजामध्ये भिन्नता उदा. उत्पन्न, भाषा, नैतिकता इत्यादींमध्ये भिन्नता असली तरीसुद्धा विश्वास वाढलेला दिसून येतो, कारण येथे करारांची अंमलबजावणी योग्यप्रकारे होत असल्याचे दिसून येते.

२. काही देशांमध्ये सामाजिक व आर्थिक भिन्नता दिसून येते; पण त्या देशांमध्ये करारांची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था सशक्त असल्यामुळे विश्वास व विकास वाढलेला दिसून येतो. उदा. अमेरिकेत काही ठिकाणी भाषा, नैतिकता यामध्ये भिन्नता आहे; पण विश्वासूपणा अधिक असून आर्थिक विकाससुद्धा झालेला आहे.

३. विश्वासामुळे विकासदर वाढतो याचे मुख्य कारण म्हणजे व्यवहार खर्च कमी होतो आणि गुंतवणुकीस चालना मिळते.

४. त्यांच्या अभ्यासामध्ये असेही दिसून आले की जर एखाद्या देशातील लोकांना फक्त इतके वाटले, की इतर लोक विश्वासू आहेत, तेव्हा त्या देशातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी उत्पन्न १ टक्क्यानी वाढले.

५. त्याचप्रमाणे एखाद्या देशामध्ये विश्वासाची पातळी ३० टक्के कमी झाली असेल, तर त्या देशामध्ये गुंतवणुकीचा दर कमी व राहणीमानाचा दर्जा खालावलेला दिसून येतो. तसेच शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे सर्वसाधारण विश्वासाची पातळी कमी झालेली दिसते आणि गरिबीचा सापळा वाढलेला दिसतो. याचा अर्थ इथे असा स्पष्ट होतो की, गरिबीचा सापळा कमी करण्यासाठी सर्वसाधारण विश्वाच्या पातळीमध्ये वाढ होण्यासाठी सुयोग्य अर्थधोरणाची अंमलबजावणी करावी लागेल.

६. शासनाचे धोरण आणि विश्वास

झॅक आणि नॅक या संशोधकांच्या मते शासनाची विविध प्रकारची धोरणे ही विश्वासाच्या पातळीमध्ये वाढ निर्माण करू शकतात. ती धोरणे खालीलप्रमाणे असावेत.

१. शिक्षण धोरण - शिक्षणामुळे करार अंमलबजावणी संस्थांची गुणवत्ता वाढते, उत्पन्न विषमता कमी होऊ शकते. तसेच विश्वास वाढल्यामुळे उत्पन्नपातळी वाढते.

२. वृत्तपत्र आणि समाजस्वातंत्र्य धोरण चांगले असलेल्या देशातील विश्वास वाढून विकासाचा दर वाढलेला दिसून येईल.

३. टेलिफोन व वाहतूकव्यवस्थेचे धोरण चांगले असल्यास त्या देशातील विश्वासामध्ये वाढ होऊन आर्थिक विकास होऊ शकेल.

४. हस्तांतरण (उत्पन्न पैसा) Income Transfer - गरीब लोकांना याचा फायदा होऊ शकतो. उदा. *UPA* सरकारने गॅस सबसिडी खात्यावर जमा करणारे धोरण राबविल्यामुळे भ्रष्टाचारास आळा बसला.

वरील शासनाच्या धोरणामध्ये मुख्यत्वे शिक्षण व उत्पन्नाचे हस्तांतरण यांमुळे विकासाला चालना मिळाली असल्याचे दिसून येते. सरतेशेवटी असे वाटते, की विश्वास ही संकल्पना मोठ्या प्रमाणात असल्यास व्यवहार तसेच व्यावहारिक गुणवत्ता वाढलेल्या दिसून येतात.

## ७. समारोप

झॅक व नॅक यांच्या विचारानुसार विश्वास वाढविण्यास योग्यप्रकारच्या आर्थिक धोरणांची अंमलबजावणी करावी लागेल. त्याचा परिपाक म्हणजे देशाची आर्थिक समृद्धी होईल.

## संदर्भ सूचीः


१. प्रशांत दीक्षित, *विश्वासाचे विज्ञान*, दै. लोकसत्ता.

2. Paul Zak, *The Neuroeconomics of Trust.*

3. Paul Zak, Karl Borja, William T. Matzner, Robert Kurzban. *The Neuroeconomics of Distrust Sex Differences in Behaviourial and Physiology.*

4. Zak Park J. and Knack, Stephen, *Trust and Growth.* Economic Journal 2001, 111 (470) P. P. 295 - 321.


---

## निवेदन

### अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र शहाद्याच्या पत्त्यावर पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा. मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# सामाजिक सुरक्षा योजना - केंद्र सरकारचा एक धोरणात्मक निर्णय

उदय श्रीकृष्ण काळे, मेहकर,

वाणिज्य विभाग प्रमुख

मे.ए.सो.महाविद्यालय,

जिल्हा बुलडाणा.

भ्रमणध्वनी: ९४२२३२३३३४

ई-मेल: udaykale871@gmail.com

---

**प्रास्ताविक:**

असंघटीत क्षेत्रातील कामगार व दारिद्र्य रेषेखाली जीवनमान जगणाऱ्या लोकांकरिता सामाजिक सुरक्षेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना होत्या. परंतु जीवन विमा सारख्या योजना नव्हत्या. केंद्र सरकारने गेल्या आठवड्यामध्ये ९ मे २०१५ ला सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना या तीन नव्या योजना कार्यान्वित केल्या आहेत. तत्पूर्वी भारत सरकारने दारिद्र्य रेषेखालील ज्या लोकांचे कोणत्याही बँकेमध्ये खाते नाही अशा लोकांचे प्रधानमंत्री जनधन योजना या योजनेअंतर्गत जवळपास एकाचवेळी २ कोटी लोकांचे खाते उघडून, इतक्या मोठ्या वर्गाला, जो अधिकोषण क्षेत्राशी जुळलेला नव्हता त्यांना अधिकोषण क्षेत्राशी जोडून विश्वविक्रमच केला आहे. त्यानंतर या तीन योजना गरीब व मध्यमवर्गीय लोकांकरीता कार्यान्वित केल्या.

मग असा प्रश्न निर्माण होतो की, यापूर्वीच्या सरकारने सामाजिक सुरक्षा अंतर्गत काहीच काम केले नाही काय? गरीब व मध्यमवर्गीय लोकांकरीता विमा योजना नव्हत्या काय? होत्या तर त्यांची किंमत जास्त होती काय? या तीन योजनांचे नविन्यपूर्ण वैशिष्ट्ये कोणती आहेत? हे या लेखातंर्गत पाहणार आहोत.

सामाजिक सुरक्षा अंतर्गत जगामधील विविध देश आपल्या उत्पन्नातील मोठा भाग हा जनतेसाठी खर्च करीत असतात. सामाजिक सुरक्षा अंतर्गत, सार्वत्रिक विमा योजनांची सुरुवात अमेरिकेमध्ये १९५६ पासून सुरु झाली.

अमेरिकेमध्ये डिसेंबर २०१३ पर्यंत ५८ दशलक्ष लोकांना सामाजिक सुरक्षा अंतर्गत लाभार्थी करण्यात आले होते. या संस्थेमध्ये गतवर्षाच्या सन २०१२ च्या तुलनेत १२,२०, ४२५ इतक्या संख्येने वाढ झाली. अमेरिकेमध्ये सामाजिक सुरक्षिततेबद्दल इतकी जागरुकता आहे की, राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची राष्ट्राध्यक्षपदाची दुसरी निवडणूक याच मुद्यावर लढली गेली. भारतामध्ये सामाजिक सुरक्षा अंतर्गत काही योजना राबविल्या जात आहे. जसे संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना किंवा दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीचा नैसर्गिक आपत्तीमध्ये अचानक मृत्यू झाल्यास पंतप्रधान सहाय्यता निधी किंवा मुख्यमंत्री सहाय्यता निधी यामधून मदत मिळते. तर मध्यमवर्गीय लोकांनी पूर्वी एकाधिकार असलेल्या भारतीय जीवन विमा महामंडळाच्या महागड्या परंपरागत विमा योजना किंवा जागतिकीरणामुळे आता खाजगी कंपन्याचे स्वस्त झालेले टर्मप्लॅन आणि पेंशन योजनेअंतर्गत सुरक्षा प्राप्त केली आहे. पूर्वीच्या सरकारने सामाजिक सुरक्षे अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी फक्त अनुदान योजना राबविल्यामुळे शासनाच्या तिजोरीवर मोठा भार पडत असे. तसेच मध्यमवर्गीय जनतेला या विमा कंपन्यांच्या विमा योजना महाग पडत होत्या. सरकारने नुकत्याच कार्यान्वित केलेल्या या तीन योजनांचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना: ही सर्वसाधारण विमा जीवन योजना आहे. याकरीता केंद्र शासन, भारतीय जीवन विमा महामंडळ आणि शासकिय व खासगी बँका यांच्या सहयोगातून ही योजना अंमलात आणली आहे. या योजनेची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत. १) ज्या व्यक्तीचे वय १८ ते ५० वर्ष आहे ते सर्व बँक खातेदार लाभार्थी होवू शकतात. २) विमा कालावधी वार्षिक १ जून ते ३१ मे असून विमा हप्त्याची रक्कम एकदा अर्ज भरल्यानंतर दरवर्षी बँक खात्यातून ॲटोडेबीट होणार आहे. ३) अत्यंत महत्त्वाचे म्हणजे फक्त ३३० रुपयामध्ये २ लाख रुपयाचे विमाधन प्राप्त होणार आहे.

थोडक्यात तुम्ही प्रदान केलेल्या रुपये ३३० विमाहप्ता रक्कमेच्या ६०६ पट विमाधन प्राप्त होणार आहे. इतके विमाधन हे सद्यस्थितीत कोणत्याही विमा कंपनीच्या, कोणत्याही विमा योजनेमध्ये ग्राहकाला प्राप्त होत नाही. परंपरागत विमा योजना व टर्म प्लॅनमध्ये तुमचे वय व मुदत यानुसार तुम्हाला मिळणारे विमाधन हे साधारणत: परंपरागत विमा योजनेमध्ये १० ते २० पट तर टर्म प्लॅनमध्ये ५० ते २५० पट असते. त्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या विमा कंपनीच्या विमा योजना (प्लॅन्स) या अत्यंत महागड्या आहेत. त्या तुलनेत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही अत्यंत स्वस्त आहे. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील तसेच मध्यमवर्गीय लोकांना सुध्दा परवडणारी आहे.

२. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना: ही अपघात लाभ विमा योजना असून शासन व सार्वजनिक चार सामान्य विमा कंपन्यांच्या (PSGICS) प्रयत्नातून ही योजना अस्तित्वात आली आहे. या योजनेची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे:

१) ज्या व्यक्तीचे वय १८ ते ७० वर्ष आहे असे सर्व बँक खातेदार लाभार्थी होवू शकतात.

२) विमा कालावधी वार्षिक १ जून ३१ मे असून विमा हप्त्याची रक्कम एकदा अर्ज भरल्यानंतर

दरवर्षी बँक खात्यातून ॲटोडेबीट होईल.

३) महत्त्वाचे म्हणजे विमा हप्त्याची रक्कम फक्त १२ रुपये आहे त्यामध्ये २ लाख रुपयाचे विमाधन प्राप्त होणार आहे.

या योजनेतील विमाधन, वार्षिक विमा हप्ता १२ रुपये रक्कमेच्या १६,६६७ पट इतके आहे. याची तुलना याच चार सामान्य विमा कंपन्यांच्या (ओरिएंटल, न्यु इंडिया, युनाटेड वेस्टर्न विमा कंपनी) विमा योजनांशी (प्लॅन्स) केल्यास केल्यास ६० रुपयाच्या विमा हप्त्यामध्ये १,००,००० रुपयाचा अपघात विमा मिळेल म्हणजेच १६६७ पट विमाधन मिळेल. तर एस.बी.आय.लाईफ कंपनीची अशीच योजना १०० रुपयामध्ये ४,००,००० विमाधन देते म्हणजेच ४,००० पट विमाधन देते याचाच अर्थ असा आहे की, केंद्र शासनाने आणि जनरल इश्यु. कंपन्यांनी जी प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना अमलात आणली ती दारिद्र्य रेषेखालील लोक आणि सर्व सामान्यांकरिताच कार्यान्वित केली आहे.

३)अटल पेन्शन योजना: ही योजना भारताचे माजी पंतप्रधान मा. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने कार्यान्वित केली आहे. ही योजना भारत सरकार व पेंशन निधी नियामक आणि विकास प्राधीकरण (PFRDA) यांच्या संयुक्त प्रयत्नातून अमलात आणली आहे. या योजनेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ही योजना असंघटीत क्षेत्रातील (शेतकरी, शेतमजुर, कामगार, घरगुती कामगार इत्यादी) सर्व नागरिकांकरीता आहे. एन.एस.एस.ओ. च्या ६६ च्या सर्वेक्षणानुसार ४७.२९ कोटी कामगार वर्ग हा असंघटीत क्षेत्रात काम करीत आहे. या वर्गाला त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक सुरक्षितता प्राप्त नाही. अशा लोकांकरीता ही योजना कार्यान्वित केली आहे. या योजनेची इतर वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

१) या योजनेतील लाभार्थ्यांचे वय १८ ते ४० वर्षापर्यंत असले पाहिजे.

२) त्याला या योजनेमध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे दरमहा अंशदान घ्यावे लागेल.

| सहभागी होतांना वय | वार्षिक योगदान | सांकेतिक मासिक अंशदान रु. | लाभार्थ्यांचे मासिक पेन्शन रु. | लाभार्थ्यांच्या नाम निर्देशीत व्यक्तीला मिळणाऱ्या मुळ निधीचा सांकेतिक तपशील (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| १८ | ४२ | २१० | ५,००० | ८.५० लाख |
| २० | ४० | २४८ | ५,००० | ८.५० लाख |
| २५ | ३५ | ३७६ | ५,००० | ८.५० लाख |
| ३० | ३० | ५७७ | ५,००० | ८.५० लाख |
| ३५ | २५ | ९०२ | ५,००० | ८.५० लाख |
| ४० | २० | १४५४ | ५,००० | ८.५० लाख |

३) तो इतर वैधनिक सामाजिक सुरक्षेअंतर्गत लाभधारक नसावा.

४) तो आयकर दाता नसावा.

५) अंशदान देणाऱ्या असा लाभार्थ्याला वयाच्या ६० व्या वर्षानंतर किंवा त्याच्या मृत्युच्या पश्चात त्याच्या कुटुंबाला ५००० रु.महिना पेन्शन मिळेल.

६) यामध्ये केंद्र शासन २०१५-२०१६ ते २०१९-२020 या कालावधीत १००० रु. वार्षीक अनुदान जमा करेल.

थोडक्यात असंघटीत क्षेत्रातील लोकांकरीता त्यांच्या वृध्दापकाळात ही अटल पेन्शन योजना नवसंजीवनीचे काम करेल. त्यांना इतरांवर अवलंबून राहण्याची अथवा वयाच्या ६० व्या वर्षांनतर त्यांना काम करण्याची गरज भासणार नाही.

**समारोप:**

वरील विवेचनावरुन असे लक्षात येते की, अशाप्रकारे दारिद्र्य रेषेखालील लोक, सर्वसामान्य जनता आणि असंघटीत क्षेत्रातील कामगारांकरीता या सामाजिक सुरक्षा योजना अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी करणार आहेत. त्यामध्ये लोकांना शासनाच्या मदतीवर अवलंबून राहावे लागणार नाही. तसेच या योजनामध्ये त्यांना घावे लागणारे अंशदान हे त्यांचे उत्पन्न लक्षात घेऊनच शासनाने ठरविले आहे. म्हणून त्यांना किफायतशीरसुध्दा आहे. तसेच या माध्यमातून जो निधी जमा होणार आहे तो रेल्वे, विजनिर्माण, रस्ते, मूलभूत सुविधा या सारख्या विकास कामामध्ये गुंतविला जाणार आहे. त्यामुळे गरिब व मध्यमवर्गीय लोकांचा राष्ट्रीय विकासात सहभाग वाढणार आहे. पूर्वीच्या शासनाने अशा प्रकारच्या विमा योजना अंमलात न आणल्याने तसेच निधीस्त्रोतांचा विचार न करता दारिद्र्य रेषेखालील लोकांकरीता विविध योजना राबविल्यामुळे वित्तीय तूट ही सतत वाढती होती. ती वित्तीय तूट कमी होण्यास मदत होईल म्हणून या योजनाचे कार्यान्वयन हा एक मोदी सरकारचा क्रांतीकारी निर्णय आहे. म्हणून मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची सबका साथ सबका विकास ही घोषणा सार्थ वाटते.

**संदर्भ सूची:**

1) *www.Social Services in USA*

2) *www.financialservices. gov.in*

# भारतीय शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास

**धर्मा रानबा धेडे**, वारणानगर,
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर
भ्रमणध्वनी: ९९२२२४४२७३

जागतिक व्यापार संघटनेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार सन २०११ मध्ये शेतमाल निर्यातीतून जगातील सर्व देशांना एकूण १६५९ अब्ज डॉलरचे उत्पन्न मिळाले. या तुलनेत भारताचे शेतमाल निर्यात उत्पन्न ३४.३२ अब्ज डॉलर म्हणजेच २.०६% इतके होते. देशाची लोकसंख्या अधिक असल्यामुळे अन्न उत्पादनाची स्थानिक मागणी अधिक आहे. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारताची शेतमाल निर्यात कमी आहे. असे असले तरी तांदूळ आणि मांस निर्यातीत भारत सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये अग्रस्थानी राहिलेला आहे. सदरच्या शोधनिबंधातून भारताच्या निवडक शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास करण्यात आलेला आहे.

भारतीय तांदूळ, गहू, साखर, खाद्यतेल व भुईमूग निर्यातीचा तौलनिक अभ्यास करणे, हे अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. सदरच्या शोधनिबंधातील घटकांचा अभ्यास करण्यासाठी सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या चार वर्षाची निवड करण्यात आलेली आहे.

भारताच्या शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी तांदूळ, गहू, साखर, खाद्यतेल, भुईमूग या शेतमालाची (वस्तू) निवड करण्यात आलेली आहे. हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी मुख्यत्त्वेकरुन द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतलेला आहे. तसेच आवश्यक त्या ठिकाणी आकडेवारी देण्यात आलेली आहे.

## भारतीय शेतमाल निर्यातीचा तौलनिक अभ्यास:

भारतातून जगातील विविध देशात जो शेतमाल निर्यात होतो त्यामध्ये तांदूळ, गहू, साखर, खाद्यतेल आणि भुईमूग यांचा समावेश होतो. सन २००९-

२०१० ते २०१२-२०१३ या कालावधीत संबंधित शेतमाल निर्यातीतील बदलांचा तौलनिक अभ्यास करण्यात आलेला आहे.

**तांदूळ निर्यातीचा तौलनिक अभ्यास:**

भारतातून जगातील विविध देशात बासमती तांदूळ आणि बिगर बासमती तांदूळ यांची निर्यात केली जात आहे. भारतीय तांदळाची निर्यात जगातील विविध देशांकडे किती प्रमाणात झालेली आहे यासंबंधीचा उहापोह यामध्ये करण्यात आलेला आहे. सन २००९-२०१० मध्ये भारतातून संयुक्त अरब अमिरात, सौदी अरब, इराण, कुवेत, इराक व इतर काही देशांकडे बासमती तांदळाची एकूण निर्यात २०,१६,८६९ टन झालेली आहे. त्यामध्ये सौदी अरबचा वाटा सर्वात जास्त आहे. सन २०१०-२०११ मध्ये याच देशाकडे बासमती तांदळाची एकूण निर्यात २३,७०,६८४ टनापर्यंत झालेली आहे. त्यामुळे संयुक्त अरब अमिरातचा वाटा सर्वात जास्त आहे. तसेच भारतातून संयुक्त अरब अमिरात, सौदी अरब, इराण, कुवेत, इराक व इतर काही देशांकडे बासमती तांदळाची एकूण निर्यात सन २०११-२०१२ मध्ये ३२,११,८०१ टन इतकी झालेली आहे. त्यामध्ये संयुक्त अरब अमिरातचा वाटा सर्वात जास्त आहे. तसेच सन २०१२-२०१३ मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर) भारतातून संयुक्त अरब अमिरात, सौदी अरब, इराण, कुवेत, इराक व इतर देशांकडे बासमती तांदळाची एकूण निर्यात २१,३२,८६९ टनापर्यंत झालेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त वाटा इराकचा ५,९७,५५४ टन आहे. त्या खालोखाल सौदी अरबचा क्रमांक लागतो.

तसेच सन २००९-२०१० मध्ये भारतातून नायजेरिया, सेनेगल, कोस्टा डी आमव्हरी, इंडोनेशिया, संयुक्त अरब, अमिरात व इतर देशांकडे बिगर बासमती तांदळाची एकूण निर्यात १,३९,५४४ टन झालेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त वाटा ११,८१६ टन संयुक्त अरब अमिरातचा आहे. तसेच सन २०१०-२०११ मध्ये या राष्ट्रांकडे बिगर बासमती तांदळाची एकूण निर्यात ४०,९९,००० टन झालेली आहे. तसेच सन २०११-२०१२ मध्ये बिगर बासमती तांदळाची एकूण निर्यात याच राष्ट्रांकडे ४०,९९,००० टनापर्यंत झालेली आहे. त्यामध्ये ४,५६,३३१ टन श्रीलंकेकडे केलेल्या निर्यातीचा आहे. तसेच सन २०१२-२०१३ (एप्रिल-नोव्हेंबर) याच राष्ट्रांकडे भारतातून बिगर बासमती तांदळाची एकूण निर्यात ४३,२७,२२८ टनापर्यंत केलेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त ६,९५,५७४ टनाची नायजेरियाकडील आहे.

**भारतीय गहू निर्यातीचा तौलनिक अभ्यास:**

जगातील विविध देशांकडे भारतातून गव्हाची निर्यात केली जात आहे. भारतातून कोणकोणत्या देशांकडे किती प्रमाणात गव्हाची निर्यात वर्षनिहाय केलेली आहे याबाबतची चर्चा यामध्ये करण्यात आलेली आहे.

भारताने सन २०१०-२०११ मध्ये संयुक्त अरब अमिरात व थायलंड आणि इतर देशांकडे एकूण ३९६ टन गव्हाची निर्यात केलेली आहे. तसेच सन २०११-२०१२ मध्ये भारताने बांग्लादेश, संयुक्त अरब अमिरात, पाकिस्तान, अफगाणिस्तान, थायलंड व इतर देशांकडे एकूण ७,४१,१८६ टन गव्हाची निर्यात केलेली आहे. या एकूण निर्यातीत सर्वात जास्त निर्यात ३,१२,६२७ टन बांग्लादेशाकडे केलेली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये (एप्रिल ते नोव्हेंबर)

भारताने याच देशांकडे गव्हाची एकूण निर्यात ३८,३५,६४३ टन इतकी केलेली आहे. या एकूण निर्यातीपैकी सर्वात जास्त ११,८१,४८८ टन गव्हाची निर्यात बांग्लादेशाकडे केलेली आहे.

**साखर निर्यातीचा तौलनिक अभ्यास:**

भारतातून जगातील विविध देशांकडे साखरेची निर्यात केली जात आहे. जगातील कोणकोणत्या देशांकडे व किती प्रमाणात भारतातून साखरेची निर्यात झालेली आहे याचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला आहे.

भारताने सन २००९-२०१० मध्ये संयुक्त अरब अमिरात, बांग्लादेश, येमेन, सुदान व इतर काही देशांकडे एकूण ४४,७३५ टन साखरेची निर्यात केलेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त निर्यात श्रीलंकेकडे ५,९९० टन केली आहे. तसेच याच राष्ट्रांकडे सन २०१०-२०११ मध्ये साखरेची एकूण निर्यात १७,१४,३७४ टन केलेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त निर्यात २,२३,४५० टन श्रीलंकेकडे केलेली होती. सन २०११-२०१२ मध्ये भारताने श्रीलंका, संयुक्त अरब अमिरात, बांग्लादेश, येमेन, सुदान व इतर काही देशांकडे एकूण २७,४७,३५४ टन साखरेची निर्यात केली आहे. त्यापैकी ४,५६,३३१ टन साखरेची निर्यात एकट्या श्रीलंकेकडे केलेली आहे. तसेच सन २०१२-२०१३ मध्ये (एप्रिल-नोव्हेंबर) भारताने श्रीलंका, संयुक्त अरब अमिरात, बांग्लादेश, येमेन, सुदान व इतर काही देशांकडे एकूण २४,२१,३०५ टन साखरेची निर्यात केलेली आहे. त्यापैकी ३,५८,४५१ टन साखरेची निर्यात एकट्या बांग्ला देशाकडे केलेली आहे. थोडक्यात जगातील विविध देशांमध्ये साखरेची निर्यात करणारा भारत हा एक महत्त्वाचा देश आहे.

**खाद्यतेल निर्यातीचा तौलनिक अभ्यास:**

मानवी आहारातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून खाद्यतेलाकडे पाहिले जाते. भारतामध्ये तेलबियांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात असल्यामुळे या तेलबियांपासून मोठ्या प्रमाणात खाद्यतेलाची निर्यात होत आहे. उत्पादित खाद्यतेलाची निर्यात जगातील विविध देशांकडे केली जात आहे.

सन २००९-२०१० मध्ये भारताने जपान, व्हिएतनाम, थायलंड, पाकिस्तान, बांग्लादेश व इतर काही देशांकडे खाद्यतेलाची एकूण निर्यात ४६,७१,१३१ टन केलेली आहे. त्यापैकी व्हिएतनामकडे ११,२४,४७१ टन केलेली आहे. याच देशांकडे सन २०१०-२०११ मध्ये भारताने खाद्यतेलाची एकूण निर्यात ६९,३६,९३१ टन केलेली आहे. त्यापैकी १२,८४,०६७ टन खाद्यतेल व्हिएतनामकडे निर्यात केलेले आहे. तसेच सन २०११-२०१२ मध्ये भारताने जपान, व्हिएतनाम, थायलंड, पाकिस्तान, बांग्लादेश व इतर देशांकडे खाद्यतेलाची एकूण निर्यात ७४,३६,२२२ टन केलेली आहे. त्यापैकी १२,०८,६४७ टन खाद्यतेलाची निर्यात जपानकडे केलेली आहे. याचबरोबर सन २०१२-२०३ (एप्रिल-नोव्हेंबर) मध्ये भारताने याच देशांकडे खाद्यतेलाची एकूण निर्यात ३२,९९,३९७ केलेली आहे. त्यापैकी २,८७,४२७ टन खाद्यतेल जपानकडे निर्यात केलेले आहे. थोडक्यात भारतातून विविध देशांना खाद्यतेलाची निर्यात मोठया प्रमाणात केली जात आहे.

**कडधान्ये निर्यातीचा तौलनिक अभ्यास:**

भारतातील हवामानात व जमिनीत विविधता आढळून येते. त्यामुळे ज्या त्या

प्रकारच्या जमिनीत हवामानाला अनुकूल विविध प्रकारच्या कडधान्यांचे उत्पादन घेतले जाते. उत्पादित कडधान्यांपैकी काही कडधान्याची निर्यात जगातील विविध देशांकडे केली जाते.

भारताने सन २००९-२०१० मध्ये पाकिस्तान, अल्जीरिया, तुर्की, श्रीलंका, संयुक्त अरब अमिरात आणि इतर देशांकडे कडधान्याची एकूण निर्यात ९९,९१५ टनाची आहे. यापैकी २८,८२९ टनाची निर्यात पाकिस्तानकडे केलेली आहे. सन २०१०-२०११ मध्ये याच देशांकडे कडधान्याची एकूण निर्यात २,०८,०२२ टन इतकी केलेली आहे. या एकूण निर्यातीपैकी ७३,१२७ टन कडधान्याची निर्यात पाकिस्तानकडे केलेली आहे. तसेच सन २०११-२०१२ मध्ये याच राष्ट्रांकडे एकूण १,७४,२०२ टन कडधान्याची निर्यात केलेली आहे. त्यापैकी एकट्या पाकिस्तानकडे ४२,४८४ टन कडधान्ये निर्यात केले आहेत. याशिवाय सन २०१२-२०१३ मध्ये (एप्रिल-नोव्हेंबर) याच राष्ट्रांकडे कडधान्याची एकूण निर्यात ९१,९८७ टनाची होती. त्यापैकी ३१,९६५ टन कडधान्याची निर्यात पाकिस्तानकडे केलेली आहे.

### भारताची शेतमाल निर्यात:

भारतातून ज्या शेतमालाची निर्यात होते त्यातील प्रमुख शेतमाल उत्पादनाचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे. २०१२-२०१३ मध्ये जगात तांदूळ या शेतमालाचे एकूण उत्पादन ३९.२ दशलक्ष टन झालेले आहे त्यापैकी १०.२५ दशलक्ष टन भारतातील आहे. जागतिक एकूण तांदूळ उत्पादनात २६.२६% वाटा एकट्या भारताचा आहे. तसेच जगात मांसाचे एकूण उत्पादन ८.३२ दशलक्ष टन झालेले असून त्यापैकी १.६८ दशलक्ष टन भारतातील आहे. जागतिक एकूण मांस उत्पादनात २०.१९% वाटा एकट्या भारताचा आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, तांदूळ व मांस यासारख्या शेतमाल उत्पादनात व निर्यातीत भारत २०१२-२०१३ मध्ये अग्रस्थानी आहे.

### शेती व पूरक उत्पादनांच्या निर्यातीतील वाढ:

भारताच्या शेती व पूरक उत्पादनांच्या निर्यातीतील दरवाढ पुढील तक्त्यात दर्शविलेली आहे.

तक्ता क्रमांक १

| वर्ष | निर्यात वाढ (%) |
|---|---|
| २०१०-२०११ | ३२.०३% |
| २०११-२०१२ | ६७.९६% |
| २०१२-२०१३ | ४८.८०% |

तक्ता क्रमांक १ वरुन असे स्पष्ट होते की, भारताच्या शेती व पूरक उत्पादकांच्या निर्यातीतील वाढीचा दर सन २०१०-२०११ मध्ये ३२.०३% होता तो सन २०११-२०१२ मध्ये ६७.९६% पर्यंत वाढलेला आहे तर सन २०१२-२०१३ (डिसेंबर पर्यंत) मध्ये शेती व पूरक उत्पादकांच्या निर्यातीतील वाढीचा दर ४८.८०% होता.

### निष्कर्ष:

१) सन २००९-२०१० च्या तुलनेत २०११-२०१२ मध्ये बासमती तांदळाच्या निर्यातीत ६२.७९% नी वाढ झालेली आहे.
२) सन २०१२-२०१३ (एप्रिल-नोव्हेंबर) मध्ये एकूण २१,३२,८६९ टन बासमती तांदळाची निर्यात झालेली आहे.
३) बासमती तांदळाची सर्वात जास्त निर्यात खनिज तेल उत्पादक राष्ट्राकडे झालेली आहे.

४) सन २०१०-२०११ च्या मानाने सन २०११-२०१२ मध्ये साखरेच्या निर्यातीत ६२.४०% नी वाढ झालेली आहे.

५) सन २०१२-२०१३ (एप्रिल-नोव्हेंबर) मध्ये एकूण २४,२१,३०५ टन साखरेची निर्यात भारताने केलेली आहे.

६) भारतीय साखरेची निर्यात सर्वात जास्त श्रीलंकेकडे केली जाते.

७) सन २००९-२०१० च्या तुलनेत २०११-२०१२ मध्ये खाद्यतेलाच्या निर्यातीत ६२.८% नी वाढ झालेली आहे.

८) सन २०१२-२०१३ (एप्रिल-नोव्हेंबर) मध्ये एकूण ३२,९९,३९७ टन खाद्यतेलाची निर्यात केलेली आहे.

९) भारतीय खाद्यतेलाची निर्यात सर्वात जास्त व्हिएतनाम व जपानकडे केली जात आहे.

१०)भारतीय गव्हाची निर्यात सन २०१२-२०१३ मध्ये ३८,३५,६४३ टन होती.

११)भारतीय गव्हाची सर्वात जास्त निर्यात बांगलादेशाकडे केली जाते.

१२)सन २००९-२०१० च्या मानाने सन २०११-२०१२ मध्ये भारताच्या कडधान्ये निर्यातीत ५७.३५% नी वाढ झालेली आहे.

१३)सन २०१२-२०१३ मध्ये भारतीय कडधान्याची एकूण निर्यात ९१,९८७ टन झालेली आहे.

१४)सर्वात जास्त भारतीय कडधान्याची निर्यात पाकिस्तानकडे झालेली आहे.

१५)जगात भारताचा तांदूळ निर्यातीमध्ये २६.२६% वाटा आहे तर मांस आयात निर्यातीमध्ये २०.११% वाटा आहे.

१६)सन २०१०-२०११, २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ मध्ये भारताच्या शेती व पूरक उत्पादकांच्या निर्यातीतील वाढीचा दर अनुक्रमे ३२.०३%, ६७.९६% व ४८.८०% होता.

**संदर्भ सूची:**

१) सकाळ ॲग्रोवन, १२ मार्च २०१३, पृ.२, *जागतिक कृषी निर्यातीत भारताचा वाटा दोन टक्के.*

२) NET Information, Economic Survey

३) *आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत व धोरणे,* डॉ.गंगाधर कायंदे पाटील (२००७).

४) *अर्थसंवाद,* एप्रिल-जून २०१२, खंड ३६, अंक १, भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक.

# जलनियोजन, जलसाक्षरता ही काळाची गरज

**दादाजी रघुनाथ बच्छाव, नासिक,**
उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागप्रमुख
के.एस.के.डब्ल्यू. कॉलेज, उत्तमनगर, सिडको-४२२००९.
भ्रमणध्वनी: ७५८८१७३८६२
ई-मेल: drbachhav@gmail.com

भारतासारख्या विकसनशील देशात भूगर्भातील पाणी उपसण्यावर कुठलेही फारसे बंधन नाही. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर पाणीप्रश्न निर्माण झालेला आहे व आजही स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या ५८ वर्षात ग्रामीण व शहरी भागात शुद्ध पेयजल लोकांना मिळत नाही. त्याला कारण आपल्या देशात पाणीप्रश्न हा अनेक अंगांनी लक्ष्यवेधी व महत्त्वाचा विषय झालेला आहे. त्यासाठी असलेल्या पाण्याचा योग्य व काटकसरीने वापर करण्याबाबत सामाजिक प्रबोधन करणे गरजेचे आहे. कारण पाण्याचे दुर्भिक्ष्य या गंभीर संकटाकडे अजूनही ग्रामीण व शहरी लोक गांभीर्याने पाहत नाहीत. या संकटावर मात करण्यासाठी समाजात जलसाक्षरता मोहीम राबविणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची व योग्य आहे. अशा या संकटावर मात करण्यासाठी सोयी व कमी खर्चाची अशी पाण्याचे पुनर्भरण हा सर्वात कमी खर्चाचा उपाय आहे. याशिवाय इतरही अनेक गोष्टींचा अवलंब जलसाक्षरतेच्या संदर्भात करता येईल.

पाण्याचेच दुसरे नाव जीवन असे आहे. पाण्याशिवाय आपण जगूच शकत नाही. त्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. म्हणजेच जोपर्यंत पाण्याचा वापर सुरक्षित व योग्य पद्धतीने होत नाही तोपर्यंत पाणीप्रश्न समाप्त होणे अशक्य आहे. त्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांना याचे महत्त्व समजले पाहिजे. नाहीतर नजिकच्या काळात फार मोठ्या प्रमाणात पाणी संघर्ष उद्‌भवणार आहे. म्हणजे शेतीविरूद्ध उद्योग, एका तालुक्याविरूद्ध दुसरा तालुका, एका जिल्ह्याविरूद्ध दुसरा जिल्हा आणि एका राज्याविरूद्ध दुसरे राज्य इत्यादी. या संदर्भातील कावेरी जलवाटप हा प्रश्न

आहेच. याठी समाजातील लोकांमध्ये साक्षरता, ज्ञान, दृष्टिकोन आणि वागणूक यात बदल होणे काळाची गरज आहे. तरच पाण्यासंबंधी योग्य ते वाटप नियोजन होऊ शकेल. यासाठी जलसाक्षरता मोहीम राबविणे आवश्यकच आहे. जलसाक्षरता याचा अर्थ एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला काहीतरी शिकविते व दुसरी व्यक्ती तिसऱ्या व्यक्तीला काहीतरी शिकविते व तिसरी व्यक्ती साक्षर होते, असा सरळ सरळ अर्थ नसून, या सर्व कार्यक्रमांकडे एक परस्पर विचारांचा कार्यक्रम अशा दृष्टीने बघितले पाहिजे. यासाठी संप्रेक्षणाची जी विविध माध्यमे आहेत त्याचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे. उदा. रेडिओ, दूरचित्रवाणी, भित्तीपत्रके, वर्तमानपत्रे, नियतकालिके तर ग्रामीण भागात ग्रामसेवक, तलाठी आणि सरपंच यांची भूमिका यासंबंधी अत्यंत महत्वाची आहे.

आपल्या देशाची लोकसंख्या शंभर कोटींच्या वर गेलेली आहे. देशात सुमारे पाच लाख खेडी आहेत. त्यापैकी ७५% खेड्यांत उन्हाळ्यात स्थानिक पाण्याचे स्त्रोत कमी झालेले दिसतात. त्यामुळे महाभयंकर संकटांना तोंड द्यावे लागते. शुद्ध पाणी तर सोडाच अशुद्ध पाणी देखील मिळत नाही. मग कोणत्याही स्थितीत असलेल्या पाण्यासाठी खेड्यातील महिलांना, पुरूषवर्गाला १० ते १५ कि.मी. ची पायपीट रोज करावी लागते. याला अपवाद लहान मुले व म्हाताऱ्या व्यक्तीदेखील नाहीत. त्यातल्या त्यात यासंबंधीचा अधिक त्रास ग्रामीण महिलांना जास्त प्रमाणात सोसावा लागतो, याची फारशी जाणीव शहरी भागातील लोकांना होत नाही. भारतात पाऊस बऱ्यापैकी पडतो परंतु अयोग्य नियोजनामुळे पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. अशा पाण्याचा पिण्यासाठी व शेतीसाठी फारसा उपयोग होत नाही. अर्थात यासंबंधीचे संशोधन प्रगतीपथावर आहे पण त्यात जेव्हा यश येईल तेव्हा पाहता येईल.

भारतात पाण्याचे योग्य धोरण ठरविण्यासाठी जल आयोग निर्माण केलेला आहे. आयोगाने मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. परंतु तरीदेखील पाण्याचे नियोजन करतांना प्रथम ते पिण्यासाठी वापरावे नंतर ते शेतीसाठी आणि शिल्लक असेल तर औद्योगिकीकरणासाठी पाण्याचा वापर करावा. परंतु महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक औद्योगिकीकरणाला आहे व नंतर ते शेतीसाठी दिले जाते. आज पृथ्वीचे तापमान मोठ्या प्रमाणात वाढत आहे. कारण कार्बन डायऑक्साईडचे प्रमाणे वाढत आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. याचा परिणाम हळूहळू उत्तर ध्रुव व दक्षिण ध्रुवाजवळील बर्फ वितळत आहे. त्यामुळे समुद्राच्या पाण्याची पातळी वाढू लागली आहे. याचादेखील गंभीर परिणाम जागतिक पातळीवर होऊ शकेल. याकरीता जलनियोजन करणे काळाची गरज आहे. याशिवाय इतरही गोष्टी केल्या तर पाण्यासंबंधी नियोजन होऊ शकेल.

उदा- पाण्याचे पुनर्भरण - यात पावसाचे पडणारे पाणी टाकीत साठविणे किंवा भूगर्भातील निरनिराळ्या पद्धतींचा वापर करून मुरविणे, यासाठी आपल्या स्वतःच्या घराच्या छतावर पडणारे पाणी साठविणे आावश्यक आहे.

वनराई बंधारा : सिमेंटच्या रिकाम्या बॅगा घेऊन त्यात दगड-गोटे, निरूपयोगी मटेरियल घालून पोत्याचे तोंड बांधून झऱ्यांना येणारे पाणी

अडवावयाचे असे केले तर झऱ्याचा दीर्घकाळ असा बंधारा पक्का होऊन जातो व असे करणे आर्थिकदृष्ट्या अतिशय कमी खर्चाचे आहे.

अंडरग्राऊंड बंधारा : यात मुख्यत: छोट्या छोट्या नाल्यांना चर खोदून असे चर सिमेंटयुक्त मातीने भरावयाचे व त्यामुळे पाणी अडविले जाते.

पाझर तलाव : यामुळे पाणी जमिनीत मुरते व त्याचा फायदा विहीरीतील पाणी वाढविण्यासाठी होतो.

दगडी बंधारा : दगडांचा बांध बांधून पाणी अडविणे, यामुळे जमिनीची धूप कमी होऊन जमिनीचे सपाटीकरण होते.

रूफ वॉटर हार्वेस्टींग : यात शेतात एक खड्डा खोदून त्यात दगड-गोटे टाकून त्या खड्ड्यात छतावरचे पाणी साठवावयाचे व त्यामुळे खड्ड्यांतील पाणी स्वच्छ व शुद्ध होते. ते पिण्यासाठी किंवा शेतीसाठी वापरता येते.

पाणी अडवा पाणी जिरवा - यामुळे समाजाला पाण्याचे महत्त्व समजेल व पाणी वाया जाणार नाही, यासाठी समाजप्रबोधन करावे.

अर्थात पाण्याचे जतन करणे, पाणी वापराविषयी जनतेमध्ये जाणीव निर्माण करणे यालाच खऱ्या अर्थाने जलसाक्षरता निर्माण करणे असे म्हटले जाते. म्हणून जलसाक्षरता हा एक पथदर्शक कार्यक्रम सर्व स्तरावर राबविणे आवश्यक आहे. यादृष्टीने पाण्याची बचत करण्यासाठीच्या काही साध्या, सोप्या गोष्टी सांगता येतील व त्याची अंमलबजावणी करणे फारसे अडचणीचे नाही.

१)पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवा, प्रत्येक वेळी पाण्याचा नळ चालू करण्यापूर्वी पाण्याचा कमीत कमी वापर होईल, याचे समाजातील प्रत्येक व्यक्तीने भान ठेवावे.

२)दात घासतांना पाण्याचा नळ वाहता ठेवू नये. शॉवरऐवजी बादलीमध्ये पाणी घेऊनच आंघोळ केली तर पाण्याचे योग्य नियोजन होऊ शकेल, म्हणजेच अर्थशास्त्रीय दृष्टीने त्याची काटकसर करावी, म्हणजेच पाणी या मर्यादित साधनाचा पुरेपूर वापर करावा.

३)पाण्याची बचत कशी करता येईल, याविषयी आपले नातेवाईक, मित्र यांच्याशी चर्चा करावी.

शेतीसाठी पाणी मिळाले तर शेतीसाठीच्या वेगवेगळ्या पाणी वाचविणाऱ्या जलसिंचनाच्या योजनांचा वापर करावा.

टाकाऊ पाणी पुन्हा पुन्हा वापरून किंवा त्यावर प्रक्रिया करून औद्योगिक कारखान्यांसाठी या पाण्याचा उपयोग करावा. शहरी विभागातील फ्लॅट संस्कृतीमध्ये घरकाम करण्यासाठी (धुणे-भांडी) असलेल्या मोलकरणीस पाण्याचा कमीत कमी वापर करण्यासाठी मार्गदर्शन करा. कारण प्रेशरने पाणी टाकले तर भांडी धुण्यासाठी श्रम कमी लागतात, असा त्यांचा दृष्टिकोन झाला आहे तर त्यांच्या दृष्टिकोनात बदल करावा व त्यांना पाण्याचे महत्व समजावून सांगावे.

पाण्याचे योग्य व्यवस्थापन व नियोजन कसे करावे, यासाठी सार्वजनिक ठिकाणी भित्तीपत्रके व प्रदर्शने भरवून पाण्याचे महत्व पटवून दिले तर खऱ्या अर्थाने जलसाक्षरता अभियान यशस्वी होऊ शकेल. महाराष्ट्रात जलनियोजनाचा विचार करताना प्रथमत: महाराष्ट्र जलसिंचनाच्या सोयीचा विचार करता महाराष्ट्रात ज्या काही सुविधा आहेत त्यामध्ये १९६०-६१ ते २०१३-२०१४ ह्या काळात जे

तक्ता क्रमांक १

महाराष्ट्रातील जलसिंचन नियोजन आणि शेतीविकास (००० हेक्टरी)

| अ.नं. | वर्ष | सिंचनाची साधने विहिरी व कूपनलिका | इतर साधने धरणे, तलाव, पाटबंधारे प्रकल्प | एकूण सिंचना खालील क्षेत्र(हेक्टर) | पिका खालील एकूण क्षेत्र (हेक्टर) | पिका खालील क्षेत्राशी सिंचन क्षेत्राचे प्रमाण(%) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,२२० | १८८२३ | ६.४८ |
| ०२ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,५७० | १८७३७ | ८.३८ |
| ०३ | १९८०-८१ | १०५५ | ७८० | २,४१५ | १९६४२ | १२.३० |
| ०४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | ३,३१९ | २१८५९ | १५.१८ |
| ०५ | १९९५-९६ | १,८७० | १,०१० | ३,५५० | २१५०४ | १६.५१ |
| ०६ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,८५२ | २१६११ | १७.८२ |
| ०७ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | ३,६३६ | २२११० | १६.३९ |
| ०८ | २०१३-१४ | २,१५१ | १,१६० | ४,०३७ | २२६५५ | १७.९० |

*स्त्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पहाणी.*

जलनियोजन केले होते त्याची माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये स्पष्ट करता येईल. वरील तक्त्यावरून महाराष्ट्राच्या जलसिंचन क्षेत्राच्या प्रगतीचे स्वरूप समजते. महाराष्ट्रात प्रामुख्याने विहिरी आणि इतर साधनांच्या साह्याने जलसिंचन केले जाते. महाराष्ट्रात विहिरींच्या जलसिंचन क्षेत्रामध्ये १९६१ ते २०१३-१४ या कालावधीत जलनियोजन आणि कृषीसिंचन यात कसे बदल झालेले आहेत हे तक्ता क्र. १ वरून समजते. तसेच महाराष्ट्रात जलनियोजन वस्तुतः अतिशय महत्वाचे आहे, परंतु याला लोकांनी जलसाक्षर होणे गरजेचे आहे. तरच महाराष्ट्र शासनाचे जलनियोजन धोरण यशस्वी होईल. याकरीता समाजातील शिक्षीत, अशिक्षित, अडाणी व अज्ञानी लोकांनी जलसाक्षर होणे गरजेचे आहे. पाणी प्रश्नाविषयी व पाण्याच्या योग्य नियोजनासाठी कार्य करणाऱ्या विविध सेवाभावी संस्थांनी जलसाक्षरतासंबंधी अभियान कार्यक्रम राबवावा की, ज्यामुळे लोकांना पाण्याचे महत्त्व कळू शकेल. आज रशियासारख्या विकसित देशात कारखान्याकरीता लागणारे पाणी ७५% पुनर्वापराच्या मार्गाने उपलब्ध केले जाते व अशाप्रकारे पाणी वाचविले तरच आपण वाचू, याची जाणीव जगातील व भारतातील सर्व नागरिकांनी ठेवावी व अशा प्रकारचा संदेश जगभर द्यावा मग चला जलसाक्षर होऊ या! आणि जलसाक्षर करू या !

संदर्भ सूची :

१) *समाज प्रबोधन पत्रिका,* एप्रिल - जुन २०१५.

२) *महाराष्ट्र जलसिंचन आयोग अहवाल* महाराष्ट्र शासन मुंबई जून १९९९,पृ.४७५.

३) *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१३-२०१४,* अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र, पृ.क्र. ८८.

४) *India Economy,* 53 revised edition Ruddar Datt. K.P.M. Sundharam India Economy Today Deep and Deep Pulication, B.N.P. Singh.

५) *Indian Edonomy,* Himalaya Publishing house, S.K. Misra, V.K. Puri.


## 'अर्थसंवाद' चे लेखक व्हा
## शेतीआधारित उद्योग विशेषांक

***अर्थसंवाद: जानेवारी-मार्च २०१६*** हा **शेतीआधारित उद्योग विशेषांक** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ६ ते ८ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे **दि.१० फेब्रुवारी २०१६** पर्यंत पाठवावा. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे. विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१) भारतातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, २) महाराष्ट्रातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, ३) मराठवाड्यातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, ४) विदर्भातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, ५)पश्चिम महाराष्ट्रातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, ६) उत्तर महाराष्ट्र/खान्देशातील शेतीआधारित उद्योग: सद्यस्थिती व भवितव्य, ७) भारतीय व विदेशी शेतीआधारित उद्योग, ८) इस्राईलमधील शेती आधारित उद्योगाची स्थिती, ९) भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीआधारित उद्योगांचे स्थान, १०) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीआधारित उद्योगांचे स्थान, ११) शेतीआधारित उद्योग व ग्रामीण विकास, १२) शेतमाल बाजारपेठ व शेतीआधारित उद्योग, १३) जिल्ह्यातील शेतीआधारित उद्योग, १४) शेतीआधारित उद्योग व सहकार.

**शोधनिबंध पाठविताना कृपया लेखकांनी फॉण्ट व इतर बाबींसंबंधी या अंकातील पृष्ठ क्र.१४२ वरील चौकट पहावी.**

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# महाराष्ट्राची रोजगार हमी योजना व फळझाड लागवड कार्यक्रम

**बाजीराव ज्ञानू इंगवले, वैभववाडी,**
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, जिल्हा सिंधुदुर्ग.
भ्रमणध्वनी: ९४२११४४६४७

ग्रामीण भागातील बेकारी, दारिद्र्य यावर उपाय म्हणून राज्य शासनाने १५ कलमी कार्यक्रमाचा भाग म्हणून राज्य स्तरावर रोजगार हमी योजना एक खास कार्यक्रम म्हणून १९६५ पासून, काही मर्यादित भागात राबविण्यात आला. ही वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होते. २६ जानेवारी १९७८ ला अधिनियम अमलात येऊन रोजगार हमी योजनेचा कायदा संमत करण्यात आला व योजनेस कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले. १९७७ ला महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचा अधिनियम करण्यात येऊन २६ जानेवारी १९७९ ला हा अधिनियम अंमलात आला. मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाच्या विकासाचा पल्ला गाठण्याच्या दृष्टीने लोकोपयोगी आणि विकासाच्या पायाभूत सुविधांची कामे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात आली आहेत. ही योजना जरी दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी म्हणून निर्माण केली गेली असली तरी काळाच्या ओघात ही योजना बारमाही विकासाची योजना म्हणून स्वीकारली गेली आहे.

२० डिसेंबर १९७४ रोजी राज्य विधी मंडळाने रोजगार हमी योजनेचा प्रस्ताव एकमताने सादर केला. त्या वेळेचे सदनातील हे विवेचन, ही योजना पूर्णतः राबविली जाईल आणि कुठल्याही परिस्थितीत प्रशासकीय अकार्यक्षमतेमुळे, निधीअभावी आणि राजकीय मतभेद अथवा समाज कार्मकर्त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे या योजनेची अंमलबजावणी स्थगित होणार नाही असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला होता. १९७४ मध्ये सादर झालेल्या रोजगार हमी योजनेच्या प्रस्तावानंतर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी

विविध क्रांतीकारी निर्णय सरकारने घेतले. त्यातूनच महाराष्ट्रात आज लोकविकासाची चळवळ या रोजगार हमी योजनेने उभी केली आहे.

राज्यातील कोरडवाहू शेतीचे प्रमाण जवळपास ८५% असल्याने या शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लहान, अल्प आणि अत्यल्प भू-धारकांच्या शेती पद्धतीत परिवर्तन घडवून आणून, पावसाच्या लहरीपणामुळे या शेतकऱ्यांच्या वाटेला सदैव येणारी आर्थिक दुर्बलता घालविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आठव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात संपूर्ण राज्यात फळझाड लागवडीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमांची रोजगार हमी योजनेशी सांगड घालण्यात आली आहे.

राज्यात फलोत्पादनाखाली जवळपास केवळ ५ लक्ष ८५ हजार हेक्टर क्षेत्र असून राज्यातील एकूण १८२ लाख हेक्टर कृषी लागवडीखाली असलेल्या क्षेत्राच्या तुलनेने हे प्रमाण फारच कमी आहे. आजही २९ लाख हेक्टर लागवडी योग्य पडीक जमिनीवर फळपीकांच्या उत्पादनाला फार मोठी संधी आहे. गावाचा विकास हे सूत्र मानून सन १९९०-९१ वर्षापासून रोजगार हमी योजनेशी फळझाड लागवड कार्यक्रमांची सांगड घालण्यात आली आहे. वार्षिक सुमारे अडीचशे कोटीच्या जवळपास रक्कम ग्रामीण भागातील शेतकरी आणि शेतमजूर यांच्या उन्नतीसाठी खर्च व्हावी व त्यासाठी गाव आणि गावातील परिसर सुधारावा, शेती आणि ओलीत व्यवस्था सुधारावी व त्यातूनच शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी ही जी अपेक्षा आहे ती अतिशय रास्त होती.

लाभधारक पात्रता :

१. गावात ज्याच्या नावावर जमीन आहे, असे सर्व शेतकरी, विश्वस्त कायद्याखालील संस्था, सहकारी कायद्याखालील प्रमाणित झालेल्या मान्यताप्राप्त संस्था (सहकारी साखर कारखाने व सूत गिरण्या वगळून) या योजनेत भाग घेऊ शकतात.

२. या योजनेचा लाभ मात्र सर्व वर्गातील शेतकऱ्यांना होणार आहे. (अनुसुचित जाती-जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती/विमुक्त जाती)

३. राज्यातील कृषी विद्यापीठे (क वर्ग नगरपालिका व ग्रामीण भागातील क्षेत्रावर) या योजनेत भाग घेऊ शकतात.

४. रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रमाचा ज्यांनी लाभ घेतलेला आहे परंतु ज्यांनी ही योजना यशस्वीपणे राबविली नाही, त्यांचा लाभार्थी म्हणून विचार करण्यात येऊ नये.

क्षेत्र मर्यादा :

१) ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यातील सर्व तालुके आणि पश्चिम घाट क्षेत्रातील काही तालुक्यामध्ये प्रती लाभार्थी कमीत कमी क्षेत्र मर्यादा ०.१० हेक्टर राहील.

२) कोकण विभागाकरिता प्रती लाभार्थी लागवडीची जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा १० हेक्टर राहील. राज्यातील इतर भागात प्रती लाभार्थी लागवडीची क्षेत्र मर्यादा जास्तीत जास्त हेक्टर राहील.

३) लाभधारकांचे ७/१२ उताराच्या नोंदणीनुसार जर तो संयुक्त खातेदार असेल तर त्याच्या

हिश्याच्या क्षेत्राच्या प्रमाणानुसार लाभ देण्यात येईल.

योजनेत सहभागी होण्याची पद्धती:

गावाचे कृषी सहाय्यक मंडळ, कृषी अधिकारी तालुका, कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधणे. नमुन्यातील विहीत अर्जासोबत जमिनीचे ७/१२ व ८-अ चे उतारे यांची पूर्तता करून योजनेत सहभागी होता येते.

लाभार्थींच्या जबाबदाऱ्या:

योजनेत भाग घेणारा लाभार्थी हा गावातील त्याच्या स्वतःच्या जमिनीवर रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रमाणित मजूर म्हणून घोषित करीत असतो.

लाभार्थीस अनुदान मंजूर करण्यात येतात. प्रमाणपेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी स्वतः घेण्याबाबत त्याची लेखी संमती घेण्यात येते.

लाभार्थ्यांना देय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी राष्ट्रीयकृत बँक अथवा सहकारी बँकेत खाते उघडावे व खाते क्रमांक तालुका कृषी अधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे.

संपूर्ण लागवड कार्यक्रमासाठी पूर्व हंगामी मशागत कामे, खड्डे खोदणे, झाडांची लागवड, पाणी देणे, किटकनाशके, औषधे फवारणी करणे व झाडांचे संरक्षण करणे या गोष्टी लाभधारक शेतकऱ्याने स्वतः करणे आवश्यक आहेत.

फळझाड लागवडीसाठी मुदत:

फळझाड लागवड वेळापत्रकानुसार कोकण विभागासाठी प्रत्येक वर्षाचा सप्टेंबर महिना व उर्वरित विभागासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत लागवड करण्यात यावी.

अनुदानाचा दर:

योजनेअंतर्गत समाविष्ट झालेल्या सर्व लाभार्थींना त्यांनी केलेल्या कामानुसार मजुरीसाठी देय असलेले अनुदान १००% देण्यात येईल. तथापि सामग्रीसाठी देय असलेले १००% अनुदान हे अनुसुचित जाती/जमाती, नवबौद्ध, भटक्या जमाती विमुक्त जमाती तसेच नाबार्डच्या व्याख्येनुसार असलेले अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकऱ्यांना देण्यात येईल तर उर्वरित शेतकऱ्यांना सामग्रीसाठी देय असलेल्या अनुदानाच्या ७५% अनुदान देण्यात येईल.

अनुदान वितरीत करण्याचे निकष:

पहिल्या वर्षी लाभार्थ्याने केलेल्या कामाच्या प्रमाणानुसार मापन पुस्तिकेत नोंद घेऊन मापदंडानुसार तपासणीनंतर देय असलेल्या ५०% अनुदान देण्यात मावे. यामध्ये ५०% अनुदेय अनुदानापेक्षा मापदंडाप्रमाणे फरकाची रक्कम दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी तपासणीनंतर, कामाच्या प्रमाणकानुसार मापन पुस्तिकेत नोंद घेवून देय अनुदान अधिक पहिल्या व दुसऱ्या वर्षीचे उर्वरीत देय अनुदान प्रमाणकानुसार अनुदेय असेल त्याप्रमाणे देण्यात यावे.

लाभार्थी प्रस्तावास प्रशासकीय-तांत्रिक मान्यता:

१) पाच लाखापर्यंत - उपविभागीय कृषी अधिकारी.
२) पाच ते आठ लाखापर्यंत - जिल्हा अधिक्षक कृषीअधिकारी.
३) आठ ते १६ लाखापर्यंत - विभागीय कृषि सह संचालक हे सर्व प्रस्तावास तांत्रिक मान्यता देतात.

नारळ बागेतील मसाला आंतर पिके:

कोकण विभागातील सर्व जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत नारळ बागेत आंतर पीक

म्हणून मसाला पीकांची लागवड सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे.

कातळ जमिनीत आंबा लागवडः

सन २००७-०८ मध्ये कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात कातळ जमिनीवर आंबा लागवडीची योजना, रोजगार हमी योजनेशी निगडीत फळ विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यासंबंधी मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या.

समितीः रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग लागवडीच्या कामाचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी तसेच संनियंत्रण करण्यासाठी ग्रामपातळी व जिल्हा पातळीवर समित्यांचे गठण करण्यात येत आहे. सदर समितीची सभा महिन्यातून एकदा घ्यावी या समितीच्या अध्यक्षपद जिल्ह्याचे पालकमंत्री असतात.

आंबा, फणस, काजू, सीताफळ, संत्री, मौसंबी, चिकू, पेरु, बोर आदि फळांची शेती करण्यासाठी एक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम १९९०-९१ या वर्षापासून राबविण्यात आला. या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल आणि त्याचबरोबर गावांचा विकास होऊन पर्यावरणाचा समतोलही साध्य होईल.

योजनेचे उद्देशः

१) तरुण बेरोजगार शेतकऱ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

२) पडीक जमीन लागवडीखाली आणणे.

३) कोरडवाहू फळपीके शेतीचा विकास करणे.

रोजगार हमी योजनेअंतर्गत लावायची फळझाडेः

१) सलग लागवड अ) कोरडवाहू पिके:१) आंबा, २) काजू, ३) बोर, ४) सीताफळ, ५) आवळा, ६) चिंच, ७) फणस, ८) कोकम, ९) जांभूळ, १०) कवठ, ११) चारोळी, १२) जोजोबा, १३) बांबू, १४) जट्रोफा (मोगली एरंड) ब) बारामती पीके : १५) नारळ, १६) संत्री, १७) मोसंबी, १८) चिकू, १९) डाळिंब, २०) पेरु, २१) अंजीर, २२) कागदी लिंबू , २३) सुपारी (सलग पीक), २४) तेलताड, २५) खैर

२) नारळ बागेत आंतर पीके : अ) मसाला पीके : १) मिरी, २) लवंग, ३) जायफळ, ४) दालचिनी, ५) सुपारी.

३) भात खाचराचे बांधावरील लागवडः १) आंबा, २) काजू, ३) पेरु, ४) नारळ, ५) आवळा, ६) बांबू.

४) औषधी व सुगंधी वनस्पतीः १) आईरन २) अर्जुना ३) असन ४) अशोका ५) बेल ६) गुग्गुळ ७) लोध्रा ८) रक्त चंदन ९) शिवण १०) टेटू ११) बेहडा १२) बिब्बा १३) डिकेमाली १४) हिरडा १५) रिठा १६) वावडींग १७) करंज १८) पानपिंपरी

कोकण विभागामध्ये आंब्यांच्या हापूस जातीची सलग लागवड करताना २०% आंब्यांच्या इतर जातीची लागवड करणे आवश्यक राहील. १९९०-९१ ते २००७-०८ या काळाचा विचार करता एकूण १४ लाख लाभार्थी शेतकऱ्यांपैकी कोकण विभागातील ३.३७ लाख (२४%) इतके लाभार्थी आहेत. त्या खालोखाल पुणे विभागातील २.६८ लाख (१९.१%) लाभार्थी असल्याचे आढळून येते. याच काळात सर्वात कमी लाभार्थी नागपूर विभागातील १.०८ लाख (६.७%) लाभार्थी शेतकरी असल्याचे संशोधनात आढळते.

२०००-०१ मध्ये फळझाड लागवडीच्या बाबतीत कोकण विभागाने २६११६ (४६.९%)

सर्वाधिक प्रगती केली. याच २००६-०७ मध्ये लातूर विभागाचे सर्वाधिक क्षेत्र असून कोकणातील फळझाड लागवड (१२.१%) पर्यंत कमी झाली.

एकूण रोजगार हमी योजनेतंर्गत १२,५४०,२२ हे. इतके क्षेत्र असून त्यापैकी कोकणात ३,१०,०९४ (२४.७%) नाशिक १,२२,९३६ (९.८%) पुणे २,०१,२७६ (१६.०%), कोल्हापूर ९८,९७२ (७.८%), औरंगाबाद १,३०,९२९ (१०.४%), लातूर १,४९,९९२ (११.९%), अमरावती १,४१,०४२ (११.२%) तर नागपूर विभागात ९९५८१ (८.२%) इतकी फळझाड लागवड झालेली आढळून येते. यावरुन, महाराष्ट्रातील विविध विभागांचा विचार करता रोजगार हमी योजनेपूर्वी असलेल्या क्षेत्रात वाढ झाली असून कोकणात ३,६६,६९४ (२४.५%) सर्वाधिक क्षेत्र आहे ही नक्कीच उल्लेखनीय बाब आहे.

१९९०-९१ पासून आजपर्यंत फळझाड लागवडीची निश्चित केलेली उद्दिष्ट्ये, योजनेवर करण्यात आलेला खर्च, लाभार्थी शेतकऱ्यांची संख्या, लागवडीची टक्केवारी इत्यादी क्षेत्रात महाराष्ट्रात या योजनेमध्ये कोकण विभागाची सर्व क्षेत्रातील आकडेवारी ही इतर सात विभागापेक्षा निश्चित सरस असल्याचे आढळते. आजही महाराष्ट्रात जिथे अन्न धान्य किंवा इतर पिके घेणे शक्य होत नाही, अशा हजारो हेक्टर पडीक जमीन महाराष्ट्रात उपलब्ध आहे. अशा जमिनीवर फळबाग लागवड केल्यास त्या-त्या भागाचा विकास होईल. शेतकऱ्यांना स्वतःच्याच शेतात कायमस्वरुपी रोजगार प्राप्त होईल. म्हणून ज्या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता, या कार्यक्रमाच्या दीड दशकाच्या वाटचालीवर नजर टाकल्यास हे उद्देश निश्चित साध्य झाल्याचे संशोधनातून दिसून येते.

**संदर्भ सूची:**


१. कृषी, पशुसंवर्धन, उच्च व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग दिनांक ७ ऑगस्ट, २००७,महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रो.ह.यो. ४००७/प्र.क्र.११२/९ अे मंत्रालय,मुंबई ३२.

२. गांगुर्डे किशोर, *हमी रोजगाराची साथ केंद्राची*, लोकराज्य मासिक, प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ.२३, २४, २५.

३. *Economics Survey of Maharashtra*, 1994, Government of Maharashtra, Page 34.

४. महाराष्ट्र शासनाचे माहिती व जनसंपर्क महासंचालय, *रोजगार हमी योजनेतून फलोत्पादन विकासाची महत्त्वाकांक्षी योजना*, १९६३, पृ. १, २, ३, ४.

५. महाराष्ट्र शासनाचे माहिती व जनसंपर्क महासंचालयाने, *रोजगार हमी योजनेतून फलोत्पादन विकासाची महत्त्वाकांक्षी योजना*, १९६३, पृ. ३०.

६. आवळे मनोज, *रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम*, २००८, चौधरी लॉ पब्लिशर्स, पृ.३१,३२,१४२,१४३, १४४.

७. Shroff Sangeeta & Jayanti Kajale, *The Case of Maharashtra*, 2008, Government Intervention in Horticulture Development.

८. Indian Journal of Agricultural Economy, Vol. 63, No. 3, Page 325, 326, 327.

# मागास दूर्बल सम आणि शासनाची भूमिका

**नारायण चिंतामण पाटील, लासूर,**
ता.चोपडा, जिल्हा जळगाव.
भ्रमणध्वनी: ९६५७१६१८४४

मागास किंवा आदिवासी म्हणजे देशात आधीपासून, समाजाच्या मुख्य प्रवाहापासुन लांब राहणारे, स्वतःच्या जीवनमानाची प्रगती, विकास, राहणीमान आधुनिक सोयी-सुविधांपासुन लांब राहणारे, पारंपरिक पद्धतीनेच जीवन जगणारे होय. मागास किंवा आदिवासी ही विशिष्ट जातीला केले जाणारे संबोधन नसून, विशिष्ट अशा जातीचा पारंपरिक राहणीमान व मागास जीवन पद्धती जगत असल्याने, अशा जातीच्या समुहांना मागास जाती संबोधले जाते. उपरोक्त घटक हे विशिष्ट चालीरिती मागास जीवन यामुळे मुख्य प्रवाहापासून लांब राहिल्याने व इतर समाज नेतृत्वामुळे सार्वजनिक सत्तेत राहून नवनवीन शोध संशोधन, आधुनिक प्रगत विचारवाद यांचा स्वीकार करत असल्यामुळे समाजाच्या मुख्य प्रवाहात पुढे येत गेला. कालांतराने सत्तेत सहभागी झाला, मात्र स्वातंत्र्यानंतर (१९४७) या मुख्य प्रवाहातील बुद्धीवंतांनी आपल्या मागे राहिलेला मानवी समुह/ वर्ग यांच्या उत्थानासाठी घटना तयार करून काही आवश्यक कायदे बनवून मागास गटांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवण्याचा चंग बांधला. परंतु आपल्या माहितीप्रमाणे आपण अशी समज करून घेतो की, पुढारलेल्या समाजाने मागास वर्गावर अन्याय केला, मात्र हे अर्धसत्य आहे. पुढारलेल्या समाजाकडून काही प्रमाणात मागासवर्गावर अन्याय झाला. काही प्रमाणात मागास समाज स्वतःच या अन्यायाला (मागासपणामुळेच) कारणीभूत होय. म्हणजेच काय तर मागास समाज स्वतःहून कधी मुख्य प्रवाहात येण्यासाठी फारसा धडपडला नाही. शिक्षण, सत्ता, संशोधन, कला, संस्कृती वगैरे बाबतीत सहभागी होऊन पुढे येण्यासाठी पुरेसा संघर्ष केला नाही. म्हणून मागास समाज मागास राहण्यास प्रगत पुढारलेला समाज व मागास दोन्ही घटक समान कारणीभूत आहेत आणि या बाबतीत सार्वजनिक सत्तेच्या माध्यमातून १९४७ नंतर पुढारलेल्या समाजानेच मागास समाजाला पुढे येण्यास राज्यघटनेच्या माध्यमातून प्रवृत्त केलेले दिसते.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२(१) यानुसार राष्ट्रपतींनी घोषीत केलेल्या जमातींना मागास जाती संबोधले जाते. जंगलात व दुर्गम भागात राहणारे व मुख्य प्रवाहातील समाजापासून लांब राहून डोंगराळ, अतिदुर्गम भागात, तुरळक वस्तीत वसणारे आदिवासी किंवा मागास समाज म्हणून ओळखले जातात. हे लोक मुख्य प्रवाहापसून लांब राहून हजारो वर्षापासून परिवर्तनापासून, उन्नती विकास अशा गोष्टी त्यांना माहीतच नव्हत्या मात्र स्वातंत्र्योत्तर काळात सार्वजनिक सत्तेच्या माध्यमातून व कायद्याच्या प्रभावी वापराने सरकारने विशेष बदल घडवण्यास सुरूवात केली.

आपण आदिवासींचे सामाजिक जीवन याबाबत विचार केला तर प्रवाहाच्या विरूद्ध असणाऱ्या मागास किंवा आदिवासींच्या जीवनात अभूतपूर्व असे परिवर्तन झालेले दिसते. भारत सरकारने व महाराष्ट्र शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी व मागास जमातीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा अतोनात प्रयत्न केला परंतु आजही काही समाज आपल्या रूढी, परंपरा यांना चिकटून राहिल्याने व काही भ्रष्ट पुढाऱ्यांमुळे देखील मागास जाती यापुढे येण्यापासून वंचित राहिल्या. आदिवासींचे राहणीमान आणि जीवन पद्धती सण, उत्सव, दैवते, विधी सामाजिक निती नियम हे इतर समाजापेक्षा वेगळे दिसतात, मात्र देशातील इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्रातील मागास, आदिवासी समाज बराच सुधारलेला वाटतो.

**मागास दुर्बल समाजाच्या प्रमुख समस्या:**

१. स्थलांतर - आदिवासी किंवा मागासपणामुळे गरिबीमुळे उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे हंगामी किंवा कायमस्वरूपी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी उदरनिर्वाहासाठी जाणे, उदरनिर्वाहासाठी वारंवार स्थलांतर केल्यामुळे निश्चित एका ठिकाणी आदिवासी किंवा मागास लोकांचे जीवन स्थिर होवू शकत नाही, म्हणून त्यांचे व मुलाबाळांचे भविष्य सुध्दा धूसर होऊन जाते.

२. रोजगाराची समस्या - रोजगाराची उपलब्धता कायमस्वरूपी नसणे हेच मुळ स्थलांतराचे कारण असते.

३. शिक्षणाची आबाळ होणे- मुलाबाळांचे शिक्षणांबाबतचे भविष्य देखील वारंवार स्थलांतरामुळे टांगणीला लागते.

४. कायमस्वरुपी निवारा किंवा चांगले हक्काच्या घरापासून गरीब व मागासांना वंचित रहावे लागते. याशिवाय आरोग्य, व्यसनाधीनता याबरोबरच शासनांच्या विविध योजनापासुन वंचित राहणे, रेशनकार्ड, आधारकार्ड, मतदान कार्ड अशी शासनाची ओळखपत्रे नसल्याने योजनांच्या लाभापासून गरिबांना वंचित रहावे लागते.

५. दारिद्र्य आरोग्याच्या समस्या- व्यसनाधिनता कुपोषण आदिवासी व मागास जातींमध्येच जास्त प्रमाणात आहेत. याचे कारण म्हणजे स्थलांतर भूमिहीनता, रोजगार, शिक्षणाचा अभाव या गोष्टी आहेत. तसेच अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, बुवाबाजी, अंधश्रध्दा अशा विविध कारणांमुळे देखील समस्या येतात.

वरील सर्व कारणांमुळे एका कारणामुळे दुसरी समस्या वाढत आहे व समस्यांमध्ये भर पडत असते.

एकंदरित मागास आदिवासी समाज डोंगराळ दुर्गम भागात राहिल्यामुळे किंवा कायम स्थलांतरीत असल्यामुळे पुढील सर्व समस्या एकमेकांशी निगडीत राहतात. याचा अर्थ असा की, अज्ञान, अशिक्षितपणापासुन हे दुष्टचक्र सुरू होते. ते रूढी परंपरा अंधश्रध्दा या मार्गाने जात असतांना रोजगाराचा अभाव, पैशांचा अभाव, सोयी सुविधांच्या अभावाच्या मार्गाने कुपोषण, व्यसनाधीनता, भूकबळी, दारिद्र्य, रोगराई, विविध आजार यांचा सामना करत असतांना कायमस्वरूपी रोजगाराचा अभाव निर्माण होतो. शेवटी वारंवार होणारे स्थलांतर यामुळे शासनाच्या विविध ओळखपत्रे, रेशनकार्ड, आधार, मतदान कार्ड यांच्यापासुन वंचित राहिल्याने शासनाच्या विविध जनकल्याणाच्या योजनांपासुन अनभिज्ञ राहण्यापर्यंत हे दुष्टचक्र चालत राहते. एवढ्या सर्व समस्यांवर राज्यकर्त्यांनी शासनाने मोठ्या प्रमाणावर उपाययोजना, विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत.

आदिवासींची आर्थिक स्थिती मजबूत होण्यासाठी दळण-वळणाची साधने, शैक्षणिक सुविधा, स्थायी उत्पादन पद्धती माहिती तंत्राच्या माध्यमातून जगाची माहिती तसेच जंगल डोंगराळ भागात नवाड जमिनीची उपलब्धता, शेतीला जोडधंदा, शेळी, कोंबडी, म्हशी पालनासाठी आर्थिक मदत अशा विविध बाबतीत भरीव मदतीच्या माध्यमातून सरकारने आदिवासींना खूप पुढे आणण्याचा प्रयत्न केला. काही आदिवासी समाजांनी प्रामाणिक सहकार्य घेवून स्वतःच्या जीवनात परिवर्तन घडवले, परंतु काहीनी आजही आळशीपणामुळे, पारंपरीक रूढींना चिकटून राहिल्यामुळे व काही प्रमाणात पुढाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याने देखील आजची मागास स्थिती दिसून येते. परंतु कुठल्याही समाजासाठी काम करताना त्याच्या विकास व उन्नतीसाठी प्रयत्न करताना सरकारचे कायदे, नियम किंवा बळजबरी उपयोगात पडत नाही, तर त्यासाठी संबंधित घटकांचे प्रयत्न त्यांना स्वतःचा विकास करून घेण्याची आसक्ती म्हणजेच लोकसहभाग हा भाग जास्त महत्वाचा असतो. केंद्र व राज्य शासनातर्फे स्वातंत्र्यानंतर विशेष करून महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मागास व दलित समाजांसाठी सरकारने बरेच असे भरीव काम केलेले दिसते. राज्यातील अनुसूचित जाती विमुक्त, भटक्या व इतर मागासवर्ग, विशेष मागास यांच्या विकास कल्याणासाठी शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षण, संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ, सेवानिवृत्ती योजना, घरबांधणी, कर्ज, दुभत्या जनावरांचे वाटप, सह. सुतगिरणी, साखर कारखाने यांचे भाग खरेदी करण्यास अर्थसहाय्य, दलित वस्ती सुधारणा अशा एक ना अनेक योजना सरकारने पुरवून लहान शेतकरी वर्ग विकसीत करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचप्रमाणे मागासवर्गातील बेरोजगार निराधारांसाठी विविध प्रकारची कर्जे देऊन छोटे मोठे व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम देखील राबवण्यात आले. त्याचबरोबर दलित मागासवर्गीयांमध्ये कृषी, सहऔद्योगिक क्षेत्रात मोठे उद्योजक तयार होण्यासाठी २०० व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर अर्थसहाय्य दिले त्यातील काहिंनी गरूडझेप घेवून सरकारचा हेतू सार्थ केला. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक बाबतीत विचार करता यामध्ये निरक्षरतेचे प्रमाण बरेच आहे.

आदिवासी व मागास समाजामध्ये अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, रूढीवादी हे दूर्गुण भरल्याने हा समाज मुख्य प्रवाहापासुन लांब राहिला त्यासाठी शासन स्तरावर सर्व पद्धतीने प्रयत्न करून साक्षरतेवर, शिक्षणावर भर देण्यात आला. त्यासाठी आदिवासी सेवा समिती, सर्वोदय मंडळ भिल्ल सेवा मंडळ आदि संस्थांनी व कै. पुण्य ठाकर बाप्पा, आचार्य पिसे, बाळासाहेब खरे, श्रीमती अनुताई वाघ, अॅड. नटावदकर, जनार्दन महाराज आदि मान्यवरांनी आदिवासींच्या शिक्षण प्रसारावर भर देवून शासनास मदत केली. १९४७ नंतर शासनाने मागास/आदिवासींच्या शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. त्यामध्ये सक्तीचे प्राथमिक शिक्षण, सर्वांना शिक्षणाचा कायदा, मागास दुर्गम भागात आश्रमशाळा, रहिवासी वस्तीगृहे, त्यासाठी मोठे प्रमाणावर आर्थिक मदत देवून मोफत वह्या, पुस्तके, पेन, शालेय गणवेश, वैद्यकीय सुविधा पोषण आहार तसेच अलिकडील काळात इंग्रजी माध्यमांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळांमध्ये आमुलाग्र बदल होणे व उच्च शिक्षणासाठी, विविध कोर्सेससाठी व सैनिकीशाळा पोलीस भरती एवढेच नव्हे तर उच्च अधिकारी पदाचा तयारीसाठी देखील मागास व आदिवासींसाठी सरकारने सोयी सुविधा अर्थसहाय्य उपलब्ध करून त्यांना पुढे येण्यासाठी प्रोत्साहित केलेले आहे. एवढेच नव्हे तर विदेशातील शिक्षण, शिष्यवृत्ती अभ्यास वगैरे या मध्ये देखील मागास आदिवासी यांना भरीव सहकार्य केले आहे.

तसेच मागास अदिवासांच्या आरोग्याबाबत आपण चर्चा केली असता, त्यांचे राहणीमान पारंपरीक पद्धतीचे निकृष्ट जंगली स्वरूपाचे असल्याने त्यांना आरोग्य, स्वच्छता या बाबींशी काही घेणे देणे नसते. तसेच कोणी आजारी पडल्यावर अंधश्रद्धा गंडे, दोरे, दैवीमंत्र, उपचार या माध्यमातून ते उपचार करतात. म्हणून अशा समाजाला आरोग्याच्या बाबत जनजागृती करण्याची, शासकीय तसेच गैर सरकारी संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न केले, साथीच्या रोगाचे निर्मुलन सकस पोषक आहार कार्यक्रम, आरोग्य तपासण्या कुष्ठरोग, क्षयरोग विविध स्वच्छतेचे मार्गदर्शन अशा विविध बाबतीत शासकीय प्रयत्न केल्याने आदिवासी मागास समाजास जागृत होवून मोठ्या प्रमाणावर आज निरोगी जीवन जगण्यास प्रवृत्त झाला.

एकंदरित गेल्या ५०/६० वर्षात केंद्र व राज्य शासानमार्फत आदिवासी मागास गटाबाबत आरोग्य, शिक्षण, आर्थिक विकास याबाबत मोठ्या प्रमाणावर भरीव मदत करण्याचे कार्य केल्यामुळे, आज या घटकांमध्ये बऱ्याच प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाकडून मागास, दलित व दुर्लक्षित तसेच अविकसीत समाजाच्या प्रगती व विकासासाठी विविध माध्यमातून प्रयत्न झालेत. त्यांची थोडक्यात माहिती अशी १) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन हे राज्यातील सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी उभारण्यात आलेले आहे. ते तीन इमारती मध्ये विभागलेले असून या अंतर्गत सर्व मागास दलित महामंडळ जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालये, सर्व प्रकारचे प्रशासकिय कार्यालये वाचनालये कॉन्फरन्स हॉल कॉम्प्युटर सेंटर आर्ट गॅलरी व सांस्कृतिक कल्याणकारी योजना राबवल्या जाणार आहेत. २) शाहू, फुले, आंबेडकर दलित वस्ती विकास व सुधारणा

अभियानांतर्गत राज्यातील दलित वस्त्या मधील लोकांचे राहणीमान उंचावणे सामाजिक विषमता नष्ट करणे एकात्मता बंधुभाव वृध्दिंगत करणे, स्वच्छता, रोगराई, कमी करण्यास प्रोत्साहन यासाठी १७ फेब्रुवारी २००६ पासून हे अभियान सुरू आहे. त्यासाठी पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायतीसाठी बक्षिस ठेवले आहे. ३) घरकुल योजना ४) अनु.जाती व नवबौद्ध कुटुंबाचे राहणीमान उंचावणे निवाऱ्याचे प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा घराच्या जागेवर २६९ चौ. फुटाचे पक्के घर बांधून देणारी घरकुल योजना शासन निर्णय दि.१५ नोव्हेंबर २००८ पासून सुरू करण्यात आली. ५.विभागीय स्तरावर जिल्हास्तरावर तालुकास्तरावर मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे बांधण्यात आले. ६.सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना ही इयत्ता ५ ते १० पर्यंतच्या मागासवर्गीय मुला-मुलींसाठी शिक्षणाच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या हेतूने सुरू करण्यात आली. ७. सैनिक शाळेत अनुसुचित व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता त्याच्यासाठी सैन्य व पोलीस भरती मोफत पुर्व प्रशिक्षण. ८. सफाई कामगारांच्या मुलींसाठी निवासी शाळा. ९. मागास व अनुसूचित जातीच्या मुला मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती. १०. देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती. ११. व्यवसाय शिक्षण संगणक मोटारवाहन अशा अनेक प्रकारच्या मागासवर्गांना प्रशिक्षणाच्या योजना सुरू आहेत. त्याचप्रमाणे मागास व अनुसुचित जातीजमाती व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना आय.पी.एस., यु.पी.एस.सी, एम.पी.एस.सी. व इतर स्पर्धा परीक्षांसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण तसेच संबंधित अभ्यास करण्यासाठी व्यावसायाभिमुख अभ्यासक्रम अभियांत्रिकी वैद्यकिय माहिती व संगणक प्रशिक्षण व्यवसाय स्थापन आदिसाठी प्रशिक्षण केंद्र पुणे मार्गदर्शन संस्था आहे. विभागिय स्तरावर मागास जातीच्या मुला-मुलींना औद्योगिक प्रशिक्षण व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न वसतीगृहामधील मागास विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण स्वाभिमान योजना, अनुसूचित व मागास जातीच्या औद्योगिक संस्थांना अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना पॉवर टीलर विविध औजारे यांचे वाटप, मागास गरीबांना पादत्राणे चामड्याच्या व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांना गटई स्टॉल योजनेच्या माध्यमातून १०० टक्के अनुदानातून पत्र्याचे शेड उपलब्ध केले. पुणे येथे बाबसाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ही दूर्बल व मागास वर्गासाठी सुरू केली. अस्पृष्यता निर्मूलनार्थ सामाजिक कार्यकर्ते व प्रचारकांसाठी परिषद शिबीरे यांचे आयोजन सरकारी अनुदानातून करणे. अनुसुचीत जाती/मागास दलित मुलींकरीता हवाई सुंदरी प्रशिक्षण योजना.

अशा अनेक योजना राज्यशासनामार्फत बाकीच्या केंद्रातील सहाय्य होवून राबवल्या जातात. त्यासाठी विविध सामाजिक महामंडळे असून त्यांना मोठ्या आर्थिक निधींची तरतूद देण्यात येते ती महामंडळे पुढील प्रमाणे आहेत.

१. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ
२. लोक शाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ
३. संत रोहिदास चर्मकार व चर्मोद्योग विकास महामंडळ

४. महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व आर्थिक विकास महामंडळ

५. इतर मागास वर्गीय आर्थिक विकास महामंडळ इत्यादी.

अशा प्रकारे अनेक विकास महामंडळे विभागिय स्तरावर स्थापन करून सर्व राज्यात सामाजिक न्याय, विकास, मागासवर्गाचे पुनरुत्थान, कल्याण साधण्याचे काम राज्य सरकारकडून सातत्याने होत आहे. बऱ्याच योजना या शासकिय पातळीवर केंद्र व राज्य सरकारकडून सुरू आहेत.

विविध योजनांसाठी तरतूदः

मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित केल्या आहेत. दहावी आणि बारावीच्या परीक्षेत प्रशंसनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत २१८ विद्यार्थ्यांना रु.१.६७ कोटींचे अर्थसहाय्य असून सन २००९-१० मध्ये रु.३.७५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील शिक्षण घेता यावे यासाठी९५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. दुर्बल घटकातील मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविली जात आहे. माध्यमिक शाळेतील अनुसूचित जातीच्या दोन लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अंतर्गत १४ कोटींचे अर्थसहाय्य केले असून सन २००९-१० मध्ये रु.४.१६ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

पोलीस किंवा सैन्य भरतीमध्येही दुर्बल घटकातील तरूण मागे पडू नयेत म्हणून पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. प्रत्येक उमेदवारामागे रु.८५००/- खर्च करून एकूण १२९७ तरुणांना या योजनेचा लाभ आतापर्यंत मिळवून दिला आहे. सामाजिक न्याय विभागाने राज्यात ३४ ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर न्याय भवन बांधण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. यासाठी सन २००९-१० मध्ये रु.७१.२७ कोटींची तरतूद केली आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी विभागीय स्तरावर सहा उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अमरावती व नाशिक येथील इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून औरंगाबाद व नागपूरचे काम प्रगतीपथावर आहे. अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी दहावीनंतर देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत सन २००९-१० मध्ये रु.२६२.९२ कोटींची तरतूद केली आहे. तसेच विना अनुदानित व्यवसाय अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सन २००९-१० मध्ये रु.८५.६९ कोटींची तरतूद केली आहे. त्याशिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेला स्वायत्त दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय याच पाच वर्षांच्या काळात घेण्यात आला आहे. गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्यासाठी रु.१० कोटींची तरतूद केली आहे आणि विद्यार्थ्यांना शिकवणी शुल्क व परीक्षा शुल्क यांची प्रतिपूती करून सन २००९-१० मध्ये रु.६.८५ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अडचणी येऊ नयेत म्हणून जाती प्रमाणपत्रांची विधिग्राह्यता तपासण्यासाठी राज्यात १५ समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. निवासी विद्यार्थ्यांच्या

अनुदानात रु.५००/- वरून रु.६३०/- पर्यंत वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. तसेच
१)सावित्रीबाई फुले शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करून राज्यातील ९६,२९,७७९ मुलींना रु.१७०८०.७९ लाखाचे अर्थसहाय्य दिले आहे.
२) जिल्हा-तालुक्याच्या ठिकाणी १०० नवीन वसतिगृह बांधण्याच्या कामास सुरुवात केली आहे.
३)सैन्य-पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणाचा १२९७ अनुसूचित जाती-नवबौध्द तरुणांना लाभ मिळाला आहे.
४)विविध आर्थिक विकास महामंडळांकडून रु.१२४३.०३ कोटींचे कर्जवाटप केले असून ८६४५६४ रोजगार निर्मिती झाली आहे.
५) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेतून ३४६३६ लाभार्थ्यांना १२ हजार एकर जमिनीचे वाटप झाले आहे.
६) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी २६९ चौरसफुटांची पक्की घरे देणार आहेत.
७)सामाजिक न्याय विभागांतर्गत महामंडळांनी लाभार्थ्यांना दिलेले कर्ज माफ करण्याचा निर्णय झाला आहे.

अशा प्रकारे राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजना आहेत. अनेक प्रकारे शासन दुर्बल वंचितांना पुढे येण्यास प्रवृत्त करते फक्त गरज आहे ती दुर्बल वंचितांनी धडपडण्याची, स्वत: योजना माहिती करून तात्काळ त्यांचा पाठपुरावा करण्याची, अन्यथा शासन देत राहते व मध्येच लोक, नोकरशहा, नेते हे सुदृढ होऊन जातात.

खरे म्हणजे महाराष्ट्रातील मागास समाजाबाबत कमी वेळात मर्यादित लेखनातून त्यांची गेल्या अनेक दशकांचे मागासपणाचे वर्णन करणे अशक्य आहे. परंतु गेल्या एका दशकाचा विचार केला तर आपल्या देशात खास करून महाराष्ट्र व पश्चिम बंगाल सारख्या राज्यात इतर राज्यांच्या तुलनेने जास्त समाज सुधारक होऊन गेले. त्यांनी मोठ्या प्रमाणावर मागास रूढी परंपरा, अनिष्ट प्रथा यांचे उच्चाटनाचे कार्य करून मागास दलितांना न्याय मिळवून दिला. त्यात प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, राजाराम मोहनराय यांनी सवर्ण व शुद्र या मधील संघर्ष कमी करण्याचे कार्य केले. शिक्षण आरक्षण याबाबत संघर्ष करून समता प्रस्थापित केली तसेच महाड येथे १९२७ सालचा चवदार तळे सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदीर प्रवेश, घटनात्मक आरक्षण आदि बरीच कामे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केली. मागास दलित समाजाला पुढे येण्यासाठी त्यांच्या उत्थानासाठी समाज सुधारकांनी प्रभावी काम केल्यामुळे महाराष्ट्रातील मागास दलित इतर राज्यांच्या तुलनेने सुधारलेला आहे. कारण उत्तर भारतात आजही अनेक अनिष्ट रूढी परंपरामुळे तेथील आदिवासी मागास अजूनही दुर्लक्षित असून विकासापासून वंचित आहे.

आज आपण विविध व्यासपीठावरून चर्चा, संमेलन, परिषदांच्या माध्यमातून समाजातील विविध समस्या मागास, आदिवासीपणा अशा विविध बाबींवर मंथन करून संबंधित उपाय योजना सुचवतो. अशाच माध्यमातून समस्यांना, प्रश्नांना वाचा फुटतात व प्रश्न सुटण्यास मदत होते. मात्र या उपाययोजना शासनांच्या, समाजाच्या निदर्शनास आणून देणे तेवढेच आवश्यक आहे.

समाज सुधारक एन.जी.ओ. प्रत्यक्ष समाजात राहून समाजाच्या प्रश्न समस्या यांचा अभ्यास करून उपाय सांगतात, परंतु सरकारकडे

जास्त अपेक्षेने दूर्बल दुर्लक्षित मागास समाज बघत असतो व सरकार हे पालनकर्ता रक्षण कर्ता, विकास व कल्याण कर्ता आहे, असे म्हणून मुलांचा जसा पालकांकडे इच्छा प्राप्तीसाठी हट्ट असतो, तसा तो सरकारकडे मागास दुर्लक्षितांचा असतो. त्यासाठी जनजागृती खूपच महत्त्वाची आहे. सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. दुसरी बाजू म्हणजे समाज सुधारक, गैर सरकारी संस्था व शासन हे खूपच मोठ्या प्रमाणावर मागासांना पुढे येण्यास प्रवृत्त करत असतांना संबंधित समाज घटकांची स्वतःची सुद्धा खूप मोठी जबाबदारी आहे. त्यांना स्वयंसिद्ध होऊन स्वतः विकास कल्याण करण्याची स्वतः अस्वच्छता, रोगराई सोडून बाहेर येण्याची अनिष्ट प्रथा सोडण्याची आपण देखील समाजाचे देणे लागतो, राज्य देश विकसित करण्यास पुढे नेण्यास आपली कर्तव्ये आहेत, हे भान ठेवून काम करण्याची खरी गरज आहे. फक्त आपल्याला कायद्याचे बळ आहे. आपल्याला आरक्षण आहे. आम्ही आदिवासी मागास आहोत आम्हाला सर्वच माफ अशा दुराग्रहात, भ्रमात राहून स्वतःला मागे ठेवण्यास कारणीभूत होवू नये. त्यासाठी स्वतःजागे व्हावे, स्वतःचे कल्याण विकासाबरोबर समाजाचे व देशाचे हित साधावे.

केंद्र व राज्य सरकारच्या पातळीवर दूर्बल मागास व अविकसित समाजांसाठी सातत्याने वेगवेगळ्या योजना मोहिमा सर्व प्रकारच्या मंत्रालयाच्या स्तरावरून राबवल्या जात असतात. खरी गरज आहे ती संबंधित मागास, अविकसित समाजाच्या भागापर्यंत त्याची माहिती व कायदे पोचवण्याची याबाबत शासकिय स्तरापासून विविध प्रसार माध्यमे दूरदर्शनचे विविध वाहिन्या, आकाशवाणी, विविध वृत्तपत्रे, मॅगेझीन तसेच सर्व शासकिय व निमशासकिय कार्यालये त्यांचे कर्मचारी, शाळा महाविद्यालये विविध समाजाच्या संघटना, गैरसरकारी संघटना, अशा सर्व माध्यमातून केंद्र व राज्य सरकार राबवत आलेल्या जवळ जवळ ३१५ योजनांचा प्रसार व प्रचार व कायदे पोहोचवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न झाले पाहिजेत. याबाबत एक जनजागृती वाढली पाहिजे, ती तशी केली जात असली तरी त्यात आणखी तीव्रता आणली पाहिजे. ही एक बाजू संबंधित मागास अविकसित दुर्बल घटकांसाठी आपण बघत असताना दुसरी बाजू म्हणजे संबंधित समाज जो दुर्बल अविकसित व मागास आहे त्याची स्वतःची एक महत्त्वाची जबाबदारी आहे. ती म्हणजे स्वयंविकासासाठी झटणे. विविध योजना झळकणाऱ्या कार्यक्रमांची स्वतःहून माहिती घेण्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणे. मागास दुर्बल समाजाने जास्तीत जास्त या जनजागृती कार्यक्रमांचा स्वतः लाभ उठवून आपल्या समाजाचा दुर्गम भागाच्या विकासासाठी स्वतः देखील प्रयत्न करणे आवश्यक आहे.

या पद्धतीने जन्मताच बाळापासून ते वृद्धापकाळापर्यंतच्या सर्व मागास दलित दुर्लक्षित दुर्बल घटकांसाठी योजना सुरू आहेत. गरज आहे ती मागास, दुर्लक्षित घटकांना जागरूक होण्याची, शिक्षीत समजंस होण्याची, अनिष्ट प्रथा परंपरा सोडून विकास कल्याणाच्या प्रगतीच्या वाटेवर स्वतःहून सहभागी होवून मुख्य प्रवाहात येण्याची गरज आहे. ईश्वराने सर्व प्रकारच्या व्यक्तींना समान बुद्धी, मन, शरीर, दोन हात, दोन पाय, दिलेले असतात. गरज आहे ती योग्य ठिकाणी उपयोगात आणण्याची.

त्याच प्रमाणे विद्यापीठ स्तरावर देखील विविध डिपार्टमेंटच्या माध्यमातून संबंधित विषयाच्या अनुषंगाने समाजातील दुर्बलता कमतरता शोधून काढण्याचा प्रयत्न आपल्या प्राध्यापक/स्कॉलर विद्यार्थ्यांच्या माध्यमातून केला जावा. तसा तो काही प्रमाणात केला जात असला, तरी जे विषय अतिगंभीर व संवेदनशिल आहेत, देशाच्या विकासाच्या मार्गातील अडथळे ठरत आहेत, अशा विषयांना प्राधान्य देऊन उच्चशिक्षणात प्रोजेक्ट, संशोधन विषयांतर्गत समाविष्ट केला जावा.

विद्यार्थी किंवा संस्था स्तरावर प्रयत्न होत असताना उच्च शिक्षणातील वैयक्तिक स्तरावरच्या विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी, शिक्षक यांच्या स्तरावरसुद्धा असे प्रयत्न होऊ शकतात. याचे उत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास मागास दुर्गम अविकसीत भागाच्या विकासाची तळमळ असलेला मुंबईतील ध्रुवराज भाटीया नावाच्या एका फक्त सतरा वर्षाच्या विद्यार्थ्याची गोष्ट सांगता येईल. ध्रुवराजाने मुंबईपासून खुप लांब असलेल्या आसाममधील सोनीतपुर जिल्ह्यात जाण्याचा निर्णय घेतला. त्या जिल्ह्यातील कामत पठार, सिराजुली, बोरडूबी, आणि हबीगांव येथे जावून तेथील समस्या जाणल्या. तेथे विजेची समस्या खूप गंभीर असल्याची बाब त्याच्या लक्षात आली. आदिवासी दुर्बलांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी त्याने निश्चय केला. मुंबईतील चिराग फाउंडेशनच्या मदतीने त्याने आसाममधील दुर्गम भागात १६५ सोलर दिवे बसवण्यासाठी मोलाचे कार्य केले. अशा प्रकारे खूप मोठ्या व लहान गटाच्या स्तरावर केले जावू शकते.

**संदर्भ सूची:**


१. *विकासाच्या मार्गावर आदिवासी* - पंडित नलावडे - योजना २००८ पृ.१३.

२. *लोकराज्य*, ऑगस्ट २००९, पृ.३०

३. *वाटचाल सामाजिक न्यायाच्या दिशेने* - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन.

४. *योजना* (२००८) पंडीत नलावडे.

५. मार्मिक, जुलै २०१५ चा अंक



हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.आर.बी.भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

## पुस्तक परिचय

# मानवी अर्थशास्त्र

उत्तम दे. वाकोडकर, अंबाजोगाई,
सेवानिवृत्त प्राध्यापक,
रागिणी हौ. सोसायटी, मांडवा रस्ता,
जिल्हा बीड.
भ्रमणध्वनी: ९८८१८५९९९४.

गेल्या २५-३० वर्षात विविध पातळीवरील अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनातून, चर्चासत्रातून व संशोधनपर नियतकालिकेतून श्रीराम पेडगावकर यांची जे अभ्यासपूर्ण शोध निबंध प्रसिध्द झालेत त्यातून ११ निवडक लेखांचा समावेश नुकत्याच प्रकाशित झालेल्या *मानवी अर्थशास्त्र* या पुस्तकात आहे.

सैध्दांतिक स्वरुपाचे चिकित्सक शोधनिबंध लिहिण्याचा लेखकाचा व्यासंग उल्लेखनीय वाटल्यामुळे या पुस्तकाचा परिचय करणे आवश्यक ठरते.

अमर्त्य सेन यांनी नवसनातनी अर्थशास्त्रातील उपयोगितावाद व आर्थिक मानव याला छेद देणारी विकासाची व कल्याणाची संकल्पना मांडून अर्थशास्त्राला नवे रूप देण्याचा प्रयत्न केला व सेन यांनी मानवकेंद्रित अर्थशास्त्राची पुनर्मांडणी केली. व पूनर्मांडणीत त्यांना स्मिथ, रिकार्डो व मार्क्स यांची परंपरा, रॉल्स यांची न्यायतत्त्वे व भारतीय तत्त्वज्ञानातील नीतितत्त्व याचा भाग महत्त्वाचा वाटला. रॉल्स, सेन, मार्क्स व मेहता यांच्यावरील लेखात मानवी अर्थशास्त्राचा जो समान धागा आढळून आला त्यावरुन प्रस्तुत लेखकाने *मानवी अर्थशास्त्र* हे नाव या पुस्तकास दिले असावे. प्रस्तुत लेखसंग्रहात रॉल्स आणि सेन यांच्या विचारावरील लेखाबरोबरच उत्तर आधूनिकता, स्त्रीवाद व अर्थशास्त्र तसेच प्राध्यापक मेहता यांच्या कल्याण व उत्तर वेदकालीन आर्थिक विचार या लेखाचा समावेश करणे लेखकाला औचित्यपूर्ण वाटते.

या पुस्तकातील ११ निबंधापैकी ८ निबंध सैध्दांतिक स्वरुपाचे निवडले आहेत. त्याच बरोबर दारिद्र्य, विषमता व बेकारी या विषयावरील अनुभवाधिष्ठीत असे तीन लेख निवडण्यात आले आहेत. चांगल्या दर्जाचे अर्थशास्त्रीय लेखन मराठी भाषेच्या ग्रंथाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचा प्रस्तुत लेखकाचा प्रयत्न स्तुत्य आहे.

*प्रभावी मागणीचे रिकार्डो मार्क्स परंपरेतून विश्लेषण* हा पहिला निबंध सनातनी व नवसनातनी संबंधातील विवेचनावर आधारलेला आहे. मार्क्सचा वर्गीय विभाजनावरील परिणाम स्पष्ट करणे हा हेतु या लेखामागे आहे. जोन रॉबिन्सन यांनी रिकॉर्डो - मार्क्स उपपत्ती केन्सच्या अर्थशास्त्राला लावल्यामुळे ते नवअभिमत अर्थशास्त्रापेक्षा अभिमत अर्थशास्त्राच्या जवळ आहे. असा प्रमुख निष्कर्ष प्रस्तुत लेखकांनी आपल्या विवेचनातून मांडला आहे.

*जॉन रॉल्स यांची न्यायसंकल्पना* या दुसऱ्या लेखात रॉल्स यांच्या न्यायसंकल्पनेचे विवेचन काही प्रमुख टिकाकारांची मते लक्षात घेऊन भारतातील दारिद्र्य व बेकारीचे प्रश्न सोडविण्यास रॉल्स यांची न्यायतत्त्वे उपयोगी पडतील हे दाखविण्याचा प्रस्तुत लेखकाचा प्रयत्न त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट करते. रॉल्स यांच्या विचाराचे महत्त्व व प्रभाव मान्य करूनही अमर्त्य सेन यांना रॉल्स यांची न्यायतत्त्वे प्रत्यक्ष न्यायाच्या स्थापनेसाठी अपुरी वाटतात. सेन यांच्या *Idea of Justice* या ग्रंथातील विचाराचा आढावा प्रस्तुत लेखकांनी जागतिकीकरण, लोकशाही व सेन या लेखात घेतला आहे. सेन यांच्या न्यायसंकल्पनेत लोकशाहीला अनन्य साधारण महत्व आहे. सेन यांच्या विचाराचा भर संसदिय लोकशाही, प्रसार माध्यमे व गैरशासकिय स्वयंसेवी संघटना (NGOS) मानवी हक्क आंदोलने या मार्गानेअधिक न्यायसमाज व्यवस्था निर्माण करण्यावर आहे. एकंदरीत जागतिकीकरणाच्या संदर्भात सेन यांनी तटस्थ प्रेक्षक व लोकसहभागातून लोकशाही या संकल्पनेतून अखंड जागरुकता व जनआंदोलनाचा पुरस्कार केला व याचा उल्लेख लेखकांनी केला आहे.

चौथ्या लेखात सेन यांची आर्थिक विषमता संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत लेखात सेन यांच्या विवेचन पध्दतीचे वैशिष्ट्ये स्पष्ट करुन असा निष्कर्ष काढला आहे की सेन यांचे विवेचन विषमता संकल्पनेचा अर्थ व मापन यावर भर देत असले तरी त्याचे निश्चीत उपयोजन कसे असावे यासंबंधी पुरेसे स्पष्ट नाही.

*विषमतेचा प्रश्न अंतर विद्याशाखीय विश्लेषण* हा पाचवा निबंध प्रदीर्घ असून प्रस्तुत शोधनिबंधात रूसो, रॉबर्ट मायकल, रॉल्स, मार्क्स, आदि राजकिय व सामाजिक तत्त्ववेत्त्यांच्या विचारांचा परामर्श घेऊन विषमतेचा संबंध सत्तेशी असल्यामुळे त्यासबंधी राजकिय विचारवंतांची मते स्पष्ट करण्यात आली आहेत. प्रस्तुत निबंधात विषमता विचारांचा राजकिय, सामाजिक व आर्थिक पैलूंचा अत्यंत अभ्यासपूर्ण उहापोह करण्यात आला आहे. विषमतेची बिजे सामाजिक रचनेत आढळतात तर निर्मुलनाचा प्रश्न राजकिय इच्छाशक्तीशी निगडीत असतो असे विवेचन लेखकाने काही प्रमुख संदर्भाच्या आधारे केले आहे. या निबंधात समाजशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ या प्रश्नाकडे कसे पाहतात याचा आढावा घेऊन आर्थिक विचारांचे विवेचन केले आहे व शेवटच्या भागात जागतिकीकरण व विषमता यांच्यातील संबंधाचे विवेचन करुन लोकशाही व जनआंदोलनाचे योगदान अधोरेखीत केले आहे.

उत्तर वेदकालीन आर्थिक विचार या सहाव्या निबंधातून भारतीय तत्त्वज्ञान संपत्ती व भौतिक विकासाला महत्त्व देत नाहीत या मताचे खंडण करण्याचा प्रयत्न चिकित्सापूर्वक केला आहे. प्रस्तुत निबंधात एकंदरीत प्राचीन भारतीय

तत्त्वज्ञान माणसाला ऐहिक सुखाचा त्याग करून निवृत्तीपर जीवन जगायला लावते. ते गृहितक तत्त्वज्ञान व व्यवहार या दोन्ही कसोटीवर सिध्द होत नाही असा निष्कर्ष लेखकाने मांडला आहे.

प्रा. मेहता यांची इच्छा मुक्ती संकल्पना व सामाजिक कल्याण विषयक विचार या सातव्या निबंधात गरजांची तृप्ती म्हणजेच समाधान या उपयोगितावादी अर्थशास्त्रातील प्रमेयाला छेद देणारे व मोक्ष या संकल्पनेवर आधारित मानवी कल्याणाचा विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदरीत या लेखातून स्पष्ट होते की, प्रा. जे. के. मेहता यांचे अर्थशास्त्र हे केवळ अर्थशास्त्र नाही तर ती एक संपूर्ण जीवन पध्दती आहे.

उत्तर आधुनिकता, अर्थशास्त्र व स्त्रीवाद या आठव्या लेखात लेखकांनी उत्तर आधुनिकतेचा अर्थ स्पष्ट करुन कॅलमर, लॅटॉर्ड यांनी आधुनिकतेच्या स्थितीची जी वैशिष्ट्ये सांगितली त्याचा उहापोह केला आहे.

स्त्रीवादी अर्थशास्त्र व उत्तर आधुनिकता यांच्या संबंधाचा विचार फोलबे, हार्टसन आदिंच्या विवेचनाचा संदर्भ देऊन स्पष्ट करतानाच उत्तर आधुनिकतेने स्त्रीवादातील अनेक पैलूंना स्पर्श करुन अर्थशास्त्रातील अपूर्णता व पुरुषी वर्चस्व यावर प्रकाश टाकला आहे ते मान्य करावे लागेल असा निष्कर्ष लेखकाने मांडला आहे.

अर्थशास्त्रातील मुख्य प्रवाहात म्हणजेच नवसनातनी, नवकेन्सवादी, मुद्रावादी व नवसनातनी अर्थशास्त्रात उत्तर आधुनिकता शोधतानाच स्त्रीवादी अर्थशास्त्रातील अनेक प्रश्नांची उकल करण्यासाठी उत्तर आधुनिकता वादाची कामगिरी महत्त्वाची आहे. ती स्पष्ट करुन लेखकांनी उत्तर आधुनिकतेचा अर्थशास्त्रातील प्रवेश स्त्रीवादापुरताच मर्यादित राहिला असला तरी त्यामुळे आर्थिक विकासाच्या संकल्पना बदलत आहेत, याकडे लक्ष वेधले आहे.

प्रस्तुत पुस्तकात तीन उपयोजीत लेखांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर जिल्हा तफावत या द्वितीयक सामग्रीवर आधारित लेखात महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर दरातील घट व कारणे यांची चर्चा केली आहे. लिंग गुणोत्तराचे तीन प्रमुख निर्धारक स्पष्ट करुन बहूचल प्रतिपगमन विश्लेषण करुन निष्कर्ष मांडले आहेत, महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तरात सुधारणेसाठी धोरणाबाबत शिफारशी केल्या आहेत.

सुशिक्षितासाठी स्वयंरोजगार योजना- एक मूल्यमापन हा लेख सर्वेक्षणावर आधारित असून प्राथमिक माहितीवर आधारित आहे व त्यातून या योजनेचे फायदे व आवश्यकता सुधारणा करण्यासाठी प्रस्तुत लेखकांनी काही महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत.

विषयाच्या तांत्रिकतेला बाधा न आणता सोप्या व प्रभावी भाषेत विवेचन हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे. प्रस्तुत पुस्तकातील लेख कालबाह्य वाटत नाहीत. श्रीराम पेडगावकर यांची विविध आर्थिक प्रश्नावरील पकड व अभ्यासू वृत्ती तसेच चिकित्सक विश्लेषण करण्याचे कौशल्य या सर्व विविध लेखातून दिसून येते. प्रस्तुत पुस्तक केवळ अर्थशास्त्राच्या अभ्यासकांकरीता उपयोगी नसून अन्य विषयाच्या अभ्यासकांसाठी देखील उपयुक्त आहे. अर्थशास्त्राचे जिज्ञासू व अभ्यासक या पुस्तकाचं स्वागत करतील असा विश्वास आहे. (मानवी अर्थशास्त्र, लेखक- श्रीराम पेडगावकर, प्रकाशक - निर्मल प्रकाशन, नांदेड, जानेवारी २०१५, पृष्ठे- २१०.)

International Research Journal
मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.५,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.६,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. सुहास आव्हाड,
अध्यक्ष
ज्ञानदीप, गोल्डन सिटी,
अकोले बायपास रोड, संगमनेर,
जिल्हा अहमदनगर, ४२२ ६०५
भ्रमणध्वनी: ९९२२४३५८७१

प्रा. चारुदत्त गोखले,
कार्याध्यक्ष
प्लॉट नं.१०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा-जळगाव-४२५००१,
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

डॉ. आर. बी. भांडवलकर,
कार्यवाह खजिनदार
गजानन नगर,
पिंपळगावरोड,
यवतमाळ-४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४८८६

डॉ.अविनाश निकम,
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
भ्रमणध्वनी:९८२२६६५१४१

# अर्थ शब्दांची वाट पाहे
# ओढ
# (Traction)

**ज. फा. पाटील, कोल्हापूर,**
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२०४६३८२

**ओढ/आकर्षण/खेच** (Traction):

अलिकडच्या काळात वाणिज्य विषयात, विशेषत: विपणन क्षेत्रात अनेक नवे शब्द रूढ होत आहेत. त्यापैकी एक शब्द Traction असतो. मूळ शब्द संग्रह अर्थ लक्षात घेतला तर - ओढ, आकर्षण, कर्षण, खेच, ओढणारी शक्ती असे विविध शब्द लक्षात घ्यावे लागतात. नवे उत्पादन, नव्या उत्पादक संस्थेची वस्तू किंवा सेवा सुधारित उत्पादन यांच्या संबंधात विपणन धोरणाची चर्चा करताना बाजारपेठेच्या कोणत्या भागात संबंधित वस्तूस / सेवेस अधिक मागणी आहे, अशा भागात संबंधित वस्तू/सेवेसाठी अधिक Traction आहे असे समजले जाते. म्हणून मराठीत मागणी असे न म्हणता आकर्षण, ओढ किंवा खेच असे तीन पर्याय सुचतात. भाषाशास्त्राप्रमाणे व शब्दांचा स्वाभाविक अर्थ लक्षात घेतला तर या शब्दासाठी ओढ हा शब्द विपणन क्षेत्रात रूढ करणे योग्य ठरेल असे वाटते.

(निवेदन: अर्थसंवादच्या खंड ३९, अंक १ (एप्रिल-जून २०१५) या अंकात प्रथम पृष्ठावर सल्लागार मंडळ (२०१२-१५) याऐवजी (२०१५-१८) असे वाचावे. द्वितीय पृष्ठावर कार्यकारी मंडळ (२०१४-१५) याऐवजी (२०१५-१६) असे वाचावे. - प्रमुख संपादक अर्थसंवाद.)

जिल्हा:..................................

विद्यापीठ क्षेत्र: ..........................

# मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई.

## आजीव / साधारण सभासदत्वासाठीचा अर्ज

(कृपया अर्ज मराठीतून भरावा)

फोटो

१. संपूर्ण नाव : ..................................................................................

२. महाविद्यालय/संस्थेचे नाव: ..............................................................................

३. शैक्षणिक पात्रता : ..................................................................................

..................................................................................

४. पत्रव्यवहारासाठी पत्ता : ..................................................................................

..................................................................................

..................................................................................

५. दूरध्वनी क्र.(कोड सह) :

महाविद्यालयाचा / संस्था:...................... निवास: ......................................

भ्रमणध्वनी क्र.: ............................. ई-मेल: ......................................

६. वर्गणी:

.आजीव सभासद रु.३०००+ इमारत निधी रु.२०००+ सभासद सूची रु.१००= **रु.५१००**/-

(साधारण सभासद रु.३००/-)

अर्जदाराची स्वाक्षरी

श्री/श्रीमती.............................................. यांचेकडून परिषदेची आजीव/साधारण सभासद वर्गणी रुपये:............. आज दि.................. रोजी रोख/मनी ऑर्डर / डीडी ने मिळाली.

कार्यवाह - खजिनदार

## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/डॉ.आर.बी.भांडवलकर, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.आर.बी.भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया, जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे, शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३ समोर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |

मी आर.बी.भांडवलकर असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.आर.बी.भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

## मराठी अर्थशास्त्र परिषद
# ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, बारामती

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ३९ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि.पुणे येथे दि.१६, १७ व १८ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. संगमनेर येथील डॉ. सुहास आव्हाड हे अध्यक्षस्थान भूषवतील. अधिवेशनासाठी प्रतिनिधी शुल्क रु.१२००/- आहे. जे परिषदेचे आजीव सदस्य नाहीत त्यांना साधारण शुल्क रु.३००/- अतिरिक्त भरून सहभागी होता येईल. संशोधक विद्यार्थ्यांसाठी शुल्क रु.८००/- आहे. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) गोपाळ कृष्ण गोखले यांचे आर्थिक विचार.

२) पंडित जवाहरलाल नेहरू आणि भारतातील आर्थिक नियोजन.

३) महाराष्ट्रातील महिला सक्षमीकरण योजना आणि त्याची फलश्रृती.

चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असून तो परिषदेच्या मा. अध्यक्षांनी अधिवेशनापूर्वीच जाहीर केला आहे. आयत्या वेळेच्या विषयासाठी शोधनिबंध मागवले जात नाहीत. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

आयत्या वेळेचा विषय: महाराष्ट्रातील नागरिकरणापुढील नवीन आव्हाने.

| | |
|---|---|
| डॉ. सुहास आव्हाड,<br>अध्यक्ष | प्रा. चारुदत्त गोखले,<br>कार्याध्यक्ष |
| प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरुमकर,<br>स्थानिक कार्याध्यक्ष | डॉ. आर. बी. भांडवलकर,<br>कार्यवाह-खजिनदार |
| डॉ. रामभाऊ खाडे,<br>स्थानिक कार्यवाह<br>भ्रमणध्वनी:९९२२८९५५४६ | डॉ.अविनाश निकम,<br>प्रमुख संपादक<br>अर्थसंवाद |

॥ सिध्दिरनेकान्तात् ॥

अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

ता. बारामती -४१३१०२, जि. पुणे

(कला, विज्ञान व वाणिज्य)

जैन धार्मिक अल्पसंख्यांक संस्था

नॅक पुर्नःमूल्यांकित B दर्जा प्राप्त

ISO - CERTIFIED 9001 : 2008

☎ : (02112) 222405, Fax : (02112) 222728

Website : www.tccollege.org * E-mail :- principal.tccollege@gmail.com, principal@tccollege.org

## * महाविद्यालयाची ठळक वैशिष्टये *

* अल्पसंख्याक दर्जा प्राप्त महाविद्यालय
* पुर्नमूल्यांकनात 'बी' ग्रेड प्राप्त झालेले महाविद्यालय,
* आय.एस.ओ. ९००१-२००८ नामांकन प्राप्त महाविद्यालय
* ११ वी पासून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विविध विषयांच्या अध्यापनाची सोय
* विषयांची विविधता आणि त्यामुळे विषय निवडीला अधिक वाव
* अनुभवसंपन्न, व्यासंगी प्राध्यापक वर्ग
* एच.एस.सी बोर्ड आणि विद्यापीठ परीक्षांच्या उत्कृष्ठ निकालाची दीर्घ परंपरा
* पदवी तसेच पदव्युत्तर परीक्षेसाठी कला शाखेत १०, वाणिज्य शाखेत १, विज्ञान शाखेत ९ स्पेशल विषयांची सोय
* कला शाखेत फंक्शनल इंग्लिश या अभ्यासक्रमाची सोय
* कॉमर्स प्रयोगशाळा
* साडे आठ हजार विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश
* एक लाखापेक्षा अधिक ग्रंथ आणि १५० पेक्षा अधिक नियतकालिकांनी सुसज्ज ग्रंथालय, क्रमिक पुस्तक विभागात विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश
* संगणक लॅबसह ११ विषयांच्या भव्य आणि अद्ययावत प्रयोगशाळा
* भाषा विज्ञान प्रयोगशाळा
* एम.बी.ए.प्रवेश पूर्व तयारी परीक्षा
* बारामती नगरपालिकेच्या हद्दीत ४० एकरांचा शांत, स्वच्छ परिसर
* प्रशस्त क्रिडांगण, ४०० मी. रनिंग ट्रॅक आणि विविध खेळांचा नियमित सराव.
* अद्ययावत व्यायामशाळा
* मुलांची व मुलींची स्वतंत्र वसतीगृहे
* योगाभ्यास केंद्र
* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र
* राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.)
* राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.)
* कमवा आणि शिका योजना
* बहि:शाल शिक्षण केंद्र
* कविवर्य मोरोपंत वाद विवाद वक्तृत्व स्पर्धांचे दरवर्षी आयोजन.
* "अनेकांत राष्ट्रीय वाद व वक्तृत्व स्पर्धा" व अनेकांत व्याख्यानमाला
* सामान्यज्ञान परीक्षांचे आयोजन आणि स्पर्धात्मक परीक्षांची पूर्वतयारी
* विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन
* विद्यार्थी ग्राहक भांडार
* रात्र अभ्यासिकेची सोय
* विद्यार्थी व विद्यार्थिनी विश्रामिका
* कॅन्टीन
* परिसरात बँकेची सुविधा
* अनेकांत मुद्रणालय
* विज्ञान प्रयोगशाळा
* बोटॅनिकल गार्डन, ग्रीन हाऊस, नर्सरी
* सुसज्ज सेमिनार हॉल
* भव्य व सुसज्ज सभागृह (जीवराज हॉल)
* गुणी विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके
* विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती आणि फ्रिशिप्स
* बॉटनी पी.जी.रिसर्च सेंटर
* व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम व यु.जी.सी.पुरस्कृत करिअर ओरिएंटेड प्रोग्रॅम्स
* इंटरनेट कॅफे
* ई. जरनल्स, ई बुक्स व डाटा बेसेस



प्राचार्य
डॉ. चंद्रशेखर वसंतराव मुरुमकर

सचिव
श्री. जवाहर मोतीलाल शाह (वाघोलीकर)

(जाहिरात सहकार्य : डॉ. रामभाऊ खाडे, स्थानिक कार्यवाह, म.अ.प.)